
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८०६



# महाराष्ट्राचे जिल्हे

## अकोला

REFBK-0028957

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

महाराष्ट्राचे जिल्हे

# आकोला

REFBK-0028957

किंमत--२५ नवे पैसे

महाराष्ट्र सरकारच्या
प्रसिद्धी खात्याचें प्रकाशन

शासन मुद्रणालय, नागपूर

## अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| (१) | प्राकृतिक भू-रचना | १ |
| (२) | ऐतिहासिक पार्श्वभूमि | ४ |
| (३) | लोकजीवन | ९ |
| (४) | शासन व्यवस्था | १५ |
| (५) | न्याय व्यवस्था | २१ |
| (६) | स्थानिक स्वराज्य व्यवस्था | २२ |
| (७) | शेतकी अर्थ व्यवस्था | २४ |
| (८) | पशुसंवर्धन | ३३ |
| (९) | वन संपत्ती | ३४ |
| (१०) | सहकारी चळवळ | ३५ |
| (११) | कुटिर उद्योग | ४० |
| (१२) | उद्योग व व्यापार | ४४ |
| (१३) | वहातूक व दळणवळण | ४८ |
| (१४) | लोक स्वास्थ्य | ५० |
| (१५) | शिक्षण व्यवस्था | ५४ |
| (१६) | समाज कल्याण योजना | ६१ |
| (१७) | सिंचन व विद्युत् प्रकल्प | ६४ |
| (१८) | सामूहिक विकास कार्य | ६६ |
| (१९) | अल्पबचत कार्य | ६८ |
| (२०) | कांही प्रसिद्ध ठिकाणें | ७० |
| (२१) | सामाजिक संस्था | ७५ |

# आकोला जिल्हा

## प्राकृतिक भू-रचना

आकोला जिल्हा हा वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांत मध्यभागीं असून त्याचे उत्तरेस अमरावती जिल्ह्याचा मेळघाट तालुका, पूर्वेस अमरावती जिल्ह्याचे दर्यापूर, अमरावती व चांदूर आणि यवतमाळ जिल्ह्याचे दारव्हा आणि पुसद तालुके, दक्षिणेस परभणी जिल्ह्याचा हिंगोली तालुका व पश्चिमेस बुलढाणा जिल्ह्याचे मेहकर, चिखली, खामगांव व जळगांव तालुके आहेत. जिल्ह्यांत एकंदर सहा तालुके असून उत्तरेस फक्त आकोट तालुका, मध्यभागीं पूर्वेकडून पश्चिमेकडे एका ओळींत मूर्तिजापूर, आकोला व बाळापूर तालुके व दक्षिण भागांत वाशिम व मंगरूळ तालुके आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,११० चौरस मैल असून त्याची दक्षिणोत्तर लांबी ९० मैल व पूर्व-पश्चिम रुंदी उत्तरेस ३० मैल, मध्यभागीं ६० मैल व दक्षिणेस ४५ मैल आहे. विस्ताराचे दृष्टीनें आकोला जिल्हा विदर्भ विभागांतील आठ जिल्ह्यांत ४ था ठरतो.

आकोट तालुक्यांत उत्तरेकडे असलेल्या सातपुड्याच्या डोंगराचा थोडासा भाग सोडला तर जिल्ह्याच्या उतर सीमेपासून दक्षिणेकडे ५० मैल पर्यंतचा भाग सखल आणि सपाट असा आहे. हा भाग पयानघाट या नांवाने ओळखला जातो. नंतर लगेच मध्यभागीं उत्तरेस आकोला व बाळापूर आणि दक्षिणेस वाशिम तालुक्याचे सरहद्दीवर अजिंठ्यांच्या डोंगरांची रांग असून ती पूर्वेस मूर्तिजापूर व मंगरूळ तालुक्यांत व पश्चिमेस बाळापूर तालुक्यांतहि पसरली आहे. ही डोंगराची पूर्वपश्चिम रांग चढून गेल्यानंतरचा जिल्ह्याचा दक्षिण भागांतील प्रदेश पुनः सपाट पण उंचवट्यावर आहे. वाशिम तालुका हा या उंचवट्यावर असून तो (उंचवटा) ईशान्य दिशेस मंगरूळ व आकोला तालुक्याचेमध्यें कारंजापर्यंत पसरला आहे. अजिंठ्याच्या दक्षिणेकडील या सपाट पठारास बालाघाट असे म्हणण्यांत येतें. एकंदरीत आकोला जिल्ह्याचा भूभाग पायरीसारखा असून पयानघाट ही खालची पायरी व बालाघाट ही वरची पायरी असे म्हणता येईल. बालाघाट हा भारतांतील एक पाणलोटाचा प्रदेश समजला जातो. यांचे उत्तरेकडील व पश्चिमेकडील पाणी पूर्णा नदींतून तापी व अरबी समुद्रास मिळते. दक्षिण व पूर्वेकडील पाणी पैनगंगेंतून, गोदावरींतून बंगालच्या उपसागरास मिळते.

पयानघाट व बालाघाट ही नांवें सध्यां नेहमीच्या प्रचारांत नसली तरी जिल्ह्याचे हे दोन भाग या नांवांनी बरेच पूर्वीपासून ओळखले जात होते असे दिसतें. कारण इ.स.१६२४ मध्यें शहाजहान बादशाहानें आपल्या दक्षिणेकडील सुभ्याचे जे दोन भाग केले त्यांतहि अजिंठ्याचें डोंगराचें उतरेकडील सखल जमीन व मेळघाट तालुका यांस पयानघाट व त्याचें दक्षिणेकडील भागास बालाघाट असेंच म्हटलें आहे. ती नांवें या भागास पूर्वीपासून होती व तीच शहाजहाननें वापरली. पण ही नांवें केव्हां व कोणत्या कारणाने पडली व अगदी सुरुवातीस त्याचा विस्तार किती होता हें ठरविण्यास आज मार्ग नाहीं. पण या भागास आजहि घाट म्हणून संबोधलें जाते व तेथें राहणारे लोक घाटावर राहणारे म्हणून ओळखले जातात. उत्तरेस सातपुड्याचे डोंगर व दक्षिणेस कांहीं भागांतून वहात जाणारी पैनगंगा सोडल्यास जिल्ह्याच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण भागास सीमा दर्शविणाऱ्या खुणा नाहींत.

### जमीन

उत्तरेकडील सातपुड्याच्या पायथ्याशीं असलेला थोडासा डोंगराळ भाग व मध्यभागीं असलेल्या अजिंठ्याच्या टेकड्यांच्या लगतचा भाग सोडल्यास आकोला जिल्ह्यांतील सर्व जमीन सपाट व काळी सुपीक अशी आहे. उतरेकडे असलेल्या पयानघाटांतून पूर्णानदी वहात असल्यामुळें त्यास पूर्णेचें खोरें असेहि म्हणतात. दक्षिणेकडील बालाघाटचा पठारावरील भाग पयानघाटाइतका सपाट नसून त्यांत चढउतार आहेत. पण तेथील जमीन देखील काळी सुपीक आहे. दोनहि सपाट प्रदेश जसजसे डोंगराकडे जातात तशीतशी जमीन हलकी व मुरमाड होत जाते.

उत्तर भागांतील पयानघाटांतून वाहात जाणाऱ्या पूर्णा नदीच्या उत्तर व दक्षिण किनाऱ्यावर दोन्हीं बाजूस मिळून १५ ते २० मैल रुंदीचा पट्टा हा खाऱ्या पाण्याचा पट्टा आहे. यांत मूर्तिजापूर, आकोट व आकोला या तालुक्यांतील मिळून सुमारें २०० खेड्यांचा समावेश होतो. यांतील जमिनींत क्लोराइडचें प्रमाण जास्त असल्यामुळें यांतील पाणी पिण्याकरितां किंवा स्वयंपाकाकरितां निरुपयोगी आहे. त्यामुळें या भागांतील लोक पिण्याच्या पाण्याकरितां नाले व ओढे यांतून वाहणाऱ्या पाण्यावर अवलंबून असतात. ते उन्हाळ्यांत आटतात त्यावेळीं लोक ओढ्यांच्या पात्रांत झरें करून पाणी पितात. पण रेतीचा थर हा फक्त २ ते ३ फूट असल्यामुळें झरे त्यापेक्षां खोल खोदले जावूं शकत नाहींत त्या खालच्या जमिनींत खारेपणा सुरूं होतो. त्यामुळें या भागांत पिण्याच्या पाण्याची फार टंचाई आहे. या भागांत विशेषत: पूर्णेच्या उत्तर काठावर दहिहांड्याच्या परिसरांत गेल्या शतकांत विहीरीच्या पाण्यापासून मीठ तयार केलें जात असे. या विहिरी १०० फूटापर्यंत खोल असत. ही प्रथा १८७० मध्यें बंद झाली.

## हवामान

आकोला जिल्हा विषुववृत्ताच्या उतरेस उत्तर-दक्षिण २१° १६′ व १९° ५१′ या अक्षांशांत व पूर्व-पश्चिम ७६° ३८′ ते ७७° ४४′ रेखांशांत वसलेला आहे. हा भाग उष्णकटिबंधांत उत्तरेस कर्कवृत्ताजवळ येतो. यांतील उत्तरेकडील पयानघाटाचा प्रदेश समुद्रसपाटीपासून ९०० ते १,१०० फूट उंच असून दक्षिणेकडील बालाघाटचें पठारावरील प्रदेश १,५०० ते १,८०० फुटावर आहे. त्यामुळें जिल्ह्याचें एकंदर हवामान उष्ण असून ते उत्तरेकडील भागांत जास्त उष्ण व दक्षिणेकडील भागांत त्यापेक्षां कमी उष्ण आहे. दिवसाचें उष्णतामान जास्त असलें तरी रात्रीं थंड व आल्हाददायक असतें. डिसेंबर व जानेवारी हे महिने अत्यंत थंड समजले जातात व त्या वेळीं साधारण तापमान कमीत कमी ४५° फॅरेनहीट ते जास्तीत जास्त ८५° फॅरेनहीटपर्यंत असते. फेब्रुवारीच्या मध्यापासून तापमान वाढावयास सुरुवात होते व हळहळू मेच्या मध्याच्या सुमारास ८०° फॅरेनहीट ते ११५° फॅरेनहीट पर्यंत असते. आकोला हे सर्वांत उष्ण शहर समजलें जात असून तेथील तापमान उन्हाळ्यांत मेच्या मध्यांत १२०° फॅरेनहीटपर्यंत देखील कधीं कधीं जातें. वाशिम व मंगरूळ हे तालुके त्यामानानें थंड असतात. एकंदरीत हवामान कोरडें व आरोग्यकारक आहे.

## पर्जन्यमान

जूनच्या सुरुवातीस साधरणत: पावसाची सुरूवात होते व सप्टेंबरपर्यंत पावसाळा समजला जातो. इतर दिवसांत तुरळक व थोडा पाऊस पडतो पण तो निरुपयोगी असतो. जिल्ह्याचें सरासरी पर्जन्यमान ३२ इंच पडते व तें पाऊस सोइस्कर वेळीं आल्यास पिकास पुरेसें होतें.

## नद्या

जिल्ह्यांत मोठ्या म्हणण्यासारख्या पूर्णा व पैनगंगा या दोनच नद्या आहेत. त्यांतहि पूर्णा हीच प्रमुख नदी आहे. ती अमरावती जिल्ह्यांतून उगम पावून मूर्तिजापूर तालुक्यांत आकोला जिल्ह्यांत शिरते व मूर्तिजापूर, आकोला आणि बाळापूर तालुक्यांत उत्तर सीमेवरून व आकोट तालुक्याच्या दक्षिण सीमेवरून पश्चिमेकडे बुलडाणा जिल्ह्यांत जावून पुढें खानदेशांत तापीस मिळते. ही वर्षभर वहात असते तरी तिला फार पाणी असत नाही. हिला उत्तरेकडून शाहाणपूर व विद्रुपा अशा दोन नद्या मिळतात.

पूर्णेस पौराणिक महत्व असून ती पवित्र मानली जाते. वैवस्वत मनूचा मुलगा राजा नृग यानें हिच्या कांठीं तप करून तो शापमुक्त झाला अशी महाभारतांत कथा आहे. शुक्राचार्य, दमन, मुग्दल व जमदग्नि या ऋषींची स्थळें विदर्भांत पूर्णेच्या कांठीं होती असा उल्लेख नलचम्पूमध्यें आहे. हिलाच पयोष्णी म्हणूनहि संबोधलें जातें.

पूर्णेस दक्षिणेच्या बाजूनें उमा, पेढी, काटेपूर्णा, मोर्णा, निर्गुणा (भुईकुंड) नद्या मिळतात. यापैकी काटेपूर्णा व मोर्णा याच थोड्या मोठ्या समजल्या जातात. काटेपूर्णा वाशिम तालूक्यांत काटा या गांवाजवळून निघून उत्तरेकडे मंगरूळ तालुक्यांतून मूर्तिजापूर तालुक्याचे पश्चिम सीमेवरून वहात जावून भटोरी या गांवाजवळ पूर्णेस मिळते. याच नदीवर आकोला तालुक्यांत एक धरण बांधण्याचें काम सध्यां सुरूं आहे.

मोर्णा ही वाशिम तालुक्यांत उगम पावून उत्तरेकडे बाळापूर तालुक्याच्या आग्नेय भागांतून नंतर आकोला तालुक्याच्या पश्चिम भागांतून व पुन: बाळापूर तालुक्याच्या ईशान्य भागांतून वहात जावून अंदूरा येथे पूर्णेस मिळते. आकोला शहर याच नदीवर वसले आहे.

उमा—राजून्याचे दक्षिणेस पोला येथें उगम पावून सांगवी येथें पूर्णेस मिळते.

पेढी—अमरावती जिल्ह्यांत उगम पावून मूर्तिजापूर विकास खंडाच्या पश्चिमेकडून वहात जावून पूर्णेस मिळते.

निर्गुणा—ही बाळापूर तालुक्यांत दक्षिणेकडे अंधार-सावंगीजवळ उगम पावून उत्तरेकडे वहात जावून पूर्णेस मिळते. हिलाच भुईकुंड असेंहि उत्तरेचे भागांत म्हणतात. बुलढाणा जिल्ह्यांतील चिखली तालुक्यांत उगम पावून बाळापूर तालुक्यांतून उत्तरेकडे वहात येणारी मन नदी बाळापूर शहराजवळ म्हैस नदीस मिळते. व या दोनहि नद्या भुईकुंड (निर्गुणा) नदीस मिळतात.

पटाड—आकोट तालुक्यांत उत्तरेकडे उगम पावून दक्षिणेकडे वहात जावून शहाणूर नदीस मिळते. पटाडलाच खाई नांवाची नदी आकोट तालुक्यांत मिळते.

नान्द—आकोट तालुक्यांतच उगम पावून आसला मिळते व त्यापुढें विद्रुपास मिळतात.

पूर्णेस दक्षिण बाजूनें मिळणाऱ्या नद्यांना वर्षभर पाणी राहतें.

जिल्ह्यांतील दुसरी महत्वाची नदी पैनगंगा. ही बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यांतून वाशिम तालुक्यांत वायव्य भागांत प्रवेश करते व कांहीं अंतरानंतर वाशिम तालुक्याच्या दक्षिण सरहद्दीवरून वहात जावून गोदावरीस मिळते. हिची आकोला जिल्ह्यांतील लांबी २८ मैल असून तिला पूर्णेइतकें मोठें स्वरूप जिल्ह्यांत प्राप्त होत नाहीं. हिला मंगरूळ तालुक्यांतून दक्षिणेकडे वहात येणाऱ्या अडाण, अरुणावती, पूस ह्या नद्या उत्तरेच्या बाजूनें मिळतात. यांना पावसाळ्यानंतर सहसा पाणी असत नाहीं.

बेंबळा—कारंजा शहरांतून उगम पावून उत्तरेकड कांही अंतर वहात गेल्यावर पूर्वेकडे वळते व वर्धेस मिळते.

साधारणत: बहुतेक नद्या जिल्ह्यांतील दक्षिण भागांत अजिंठ्याचे डोंगर व वाशिमचे पठार यावर उगम पावून पूर्णेस किंवा पैनगंगेस मिळतात व अशा रीतीनें सर्व पाणी तापीमधून अरबी समुद्र व गोदावरीमधून बंगालच्या उपसागरास मिळते. जिल्ह्याचे पर्जन्यमान कमी असल्यामुळें व सगळें पाणी नद्यांचे रूपानें वाहून जात असल्यामुळें जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं पिण्याच्या पाण्याची कमी अधिक प्रमाणांत टंचाई आहे.

# ऐतिहासिक पार्श्वभूमि

आकोला जिल्हा हा सध्याचे स्वरूपांत १९०५ सालीं अस्तित्वांत आला. इ. स. १९०५ पर्यंतचा आकोला जिल्ह्याचा इतिहास हा विदर्भाच्या इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहे.

## पौराणिक काल

आर्य लोक दक्षिणेंत येण्यापूर्वी विदर्भ म्हणून ओळखला जाणारा सर्व प्रदेश दंडकारण्याचा भाग होता. येथें त्यावेळीं गोंड व कोरकू लोकांची वस्ती असे. आर्य लोक प्रथम दक्षिणेंत सातपुड्याचे पूर्वेकडून आले. दक्षिणेंत येणारा पहिला ऋषि अगस्ती यानें कुंजर पर्वतावर आश्रम बांधला व आपल्या क्षत्रिय शिष्यांकडून मूळच्या अनार्य लोकांस धर्म व सुधारणेची दीक्षा देवून सर्व बाजूस वसाहत वाढविली. तरी पश्चिम बाजूस दंडकारण्य कायम होते ते रामायण-महाभारत कालापर्यंतहि होते.

अगस्तिच्या क्षत्रिय शिष्यांत यदुवंशीय घराणें होते. त्यांची एक शाखा भोज नांवानें ओळखली जात असे. त्या शाखेंत विदर्भ नांवाचा राजा झाला तोच विदर्भांतील आर्य राज्याचा मूळ संस्थापक. त्यानें विदर्भा नांवाची नगरी वसवून आपली राजधानी केली. तिचेच नांव कुंडिनपूर. तें वर्धेचे काठीं चांदूर तालुक्यांत आहे. याच वंशांत दमयन्तीचा बाप भीम व रुक्मिणीचा बाप भीष्मक हे राजे झाले. रुक्मिणी हरण झाल्यानंतर तिचा भाऊ रुक्मी हा पराभव पावल्यामुळें कुंडिनपुरास परत गेला नाहीं. त्यानें भोजकट हें गांव नवीन वसवून तेथेंच तो राहिला. उमरावती जिल्ह्यांतील भातकुली हें गांव भोजकट असें मानण्यांत येतें. या विदर्भ राज्याचा विस्तार उत्तरेस नर्मदेपासून तो दक्षिणेस कुंतल देशापर्यंत होता. गोदावरीच्या दोन्ही कांठावरील लोक आपणास वैदर्भीय म्हणवीत असें १४-१५ व्या शतकांतील ग्रंथकारांच्या वर्णनावरून सिद्ध होते. पूर्वेस नागपूर पलीकडे जेथपर्यंत मराठी भाषा बोलण्यांत येते तेथपर्यंत व पश्चिमेस अजिंठ्यापर्यंत म्हणजे सध्याच्या थोडी पश्चिमेस विदर्भाची मर्यादा होती.

## मध्ययुगीन काल

विदर्भाचा मध्ययुगीन कालाचा इतिहास बराच अंधुक आहे. स्थूलमानानें असें दिसतें कीं इसवी सनाच्या पहिल्या दोनतीन शतकांत वऱ्हाड हा प्रथम मौर्य व नंतर आंध्रवंशीय राजांच्या ताव्यांत होता. तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत (इ. स. २९५ ते ५२५) वाकाटक नांवाचे राजे वऱ्हाडांत झाले. त्यानंतर पहिल्या चालुक्य वंशाच्या ताब्यात वऱ्हाड गेलें. त्यानंतर राष्ट्रकूट वंश, दुसरे चालुक्य व नंतर देवगिरीचे यादव यांचे राज्य वऱ्हाडवर झाले.

वाकाटकांच्या राज्याचा विस्तार प्राचीन विदर्भाइतकाच होता. उत्तर हिंदुस्थानच्या सुधारणा व संस्कृत वाङमय दक्षिणेंत आणून त्याचा प्रसार करण्याचें श्रेय वाकाटकास आहे. यांचे संबंध उत्तर हिंदुस्थानांतील राजघराण्याशी झाले असल्यामुळें त्यांचें राज्य उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांतील साखळीसारखें होते. यांच्याच एका शाखेची राजधानी वत्सगुल्म म्हणजे हल्लीचें वाशिम येथें होती. वाकाटकांच्या नंतर विदर्भाच्या राज्याचे दोन भाग झाले. व उत्तरेस अमरावती व दक्षिणेस प्रतिष्ठान (पैठण) अशा राजधान्या झाल्या.

दुसऱ्या चालुक्य वंशास यादव वंशांतील भिल्लम नांवाच्या पुरुषानें पराभूत करून इ. स. १०८७ त देवगिरीस आपलें राज्य स्थापिलें. यांचे राज्यांत सर्व विदर्भ येत असें. यादवांच्या पूर्वीच्या काळांत विदर्भांत अनेक विद्वान, ग्रंथकार व ज्योतिषी होवून गेले. संस्कृत वाङमयांत काव्याच्या ज्या तीन रीति सुप्रसिद्ध आहेत त्यांना त्याच्या प्रदेशावरूनच नांवें पडली आहेत. त्यापैकीं विदर्भांतील काव्याची रीति वैदर्भी म्हणन अत्यंत प्रसिद्ध आहे. भवभूति (इ. स. ७००) हा विदर्भांत झाला. त्याचें जन्मस्थान पद्मपूर नांवाचें गांव होतें. कित्येक विद्वानांच्या मतें हें गांव आकोला जिल्ह्यांतील दहिहांड्याजवळ होते. आधुनिक विद्वानांच्या मतानें तें चंद्रपुर किंवा वणी यांच्या बाजूस कोठें तरी असावें.

देवगिरीच्या यादवांच्या काळांत हेमाद्रिपंत अथवा हेमाडपंत (इ. स. १२६० ते १२७१) नांवाचा विद्वान पुरुष होवून गेला. यानें व्याकरण, शिल्पशास्त्र, वैद्यक व धर्मशास्त्रावर बरेच ग्रंथ लिहिले. यानेंच मोडी लिपी शोधून काढली. हजारों देवळें बांधणारा म्हणून हा प्रसिद्ध असून त्याची बरीच देवळें अद्यापहि वऱ्हाडांत आढळतात. नुसत्या दगडावर दगड रचून इमारती उभ्या करणें हें याचें वैशिष्टच सांगता येईल. तो मोठा राजकार्य-धुरंधर मुत्सद्दी असून देवगिरीचे महादेव व रामदेव या दोन्ही राजांच्या वेळीं दिवाण होता.

## मोंगल सत्ता

यादव वंशातील शेवटचा राजा रामदेवराव याचा इ. स. १२९४ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीनें अचानक छापा घालून दौलताबादेजवळ पराभव केला व इलिचपूर (अचलपूर) व त्याचे खालचा भाग मागून तेथें अधिकारी नेमून तो परत गेला. रामदेवराव इ. स. १३०९ मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा शंकरदेव यानें खंडणी न भरल्यामुळें अल्लाउद्दीनचा सरदार मलिकाफूर यानें स्वारी करून शंकरदेवास ठार मारले व सर्व मुलूख आपले राज्यास जोडला. अल्लाउद्दीन इ. स. १३१६ त मरण पावला. त्यावेळीं उत्तरेंत माजलेल्या गोंधळाचा फायदा घेवून रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव यानें सर्व मुलूख आपले ताब्यांत घेवून राज्य स्थापलें. परत दिल्लीची गडबड शांत होवून कुतुबुद्दिन मुबारकशहा गादीवर बसला व त्यानें देवगिरीवर स्वारी करून हरपाळदेवास ठार मारले (इ. स. १३१८) व सर्व प्रदेश परत काबीज केला. या वेळेपासून वऱ्हाड मुसलमान अंमलाखालीं गेलें तें इंग्रजी आमदानीपर्यंत तसेंच राहिलें. मुसलमानी अंमलापूर्वी दक्षिणेची स्थिती फारच संपन्न होती. त्यावेळीं दक्षिणेंत सोन्याचें नाणें होते. रुप्याचे नाणें मुळींच प्रचारांत नव्हतें.

खिलजी घराण्यानंतर तघलघ घराण्याच्या सत्तेखाली असतांना दक्षिणेंतील मुसलमान सरदारांनी महंमद तघलघच्या विरुद्ध वंड करून जाफरखान यास राज्य देवून गुलबर्गा येथें अल्लाउद्दीन बहामनशहा असा किताब घेवून त्या नांवानें शिक्का व नाणें सुरूं केलें व याप्रमाणें इ. स. १३४७ त वऱ्हाडच्या अधिकाराची सूत्रें उत्तरेकडून निघून पुन्हा दक्षिणेकडे आली.

## बहामनी काल

वऱ्हाड बहामनी राज्याच्या ताब्यांत इ. स. १३४७ पासून इ. स. १४८४ पर्यंत राहिलें. बहामनी राजांनीं आपल्या सर्व राज्याचे चार भाग पाडून त्यास तर्फ असें नांव दिलें. हे भाग वऱ्हाड, दौलताबाद, बेदर व गुलबर्गा हे होते. वऱ्हाडच्या तर्फेदाराचे मुख्य ठिकाण इलिचपूर हे होते. वऱ्हाडचा विस्तार त्यावेळीं हल्लीच्या दुप्पट होता. इ. स. १४८० चे सुमारास वऱ्हाड तर्फेचे उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाड असें दोन सुभे झाले. उत्तर वऱ्हाडचे मुख्य ठिकाण गाविलगड व दक्षिण वऱ्हाडचे माहूर होते. इ. स. १४८५ त बहामनी घराण्याचा राजा निजामुलमुक याचा खून झाला व त्यानंतर झालेल्या गोंधळाचा फायदा घेवून वऱ्हाडचे सुभेदार फत्तेउल्ला इमादुलमुक व खुदावंतखान यांनी अनुक्रमें उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाडांत आपल्या नांवानीं खुत्बा पढविला व स्वतंत्र झाले. फत्तेउल्ला यानें फत्तेअल्ला इमादशहा असा किताब घेतला व गाविलगड आणि नरनाळा किल्ले दुरुस्त केले. त्यावेळीं सध्यां परभणी जिल्हयांतील पाथरी परगणा उत्तर वऱ्हाडांत होता. त्यावरून सध्याच्या आकोला जिल्हयाचा भाग इमादशाही राज्याचा भाग झाला असें म्हाणावयास हरकत नाहीं. इ. स. १५७२ त त्यावेळीं इमादशाहीच्या गादीवर असलेला तुफानखान यानें बहामनी राज्याच्या नंतर निर्माण झालेल्या निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही व बुरीदशाही यांनी मिळून केलेल्या विजयनगरवरील स्वारींत मदत न केल्यामुळें त्या चौघांनी तुफानखानवर इ. स. १५७२ त स्वारी करून त्याचा पाडाव केला व इमादशाही राज्याचा प्रदेश अहमदनगरच्या निजामशाहीचा भाग बनला. याहि वेळेस उत्तर वऱ्हाडच विस्तार हल्लीच्या मानानें बराच मोठा होता.

इ. स. १५९५ त अहमदनगरच्या गादीच्या वारसाबद्दल तंटें उपस्थित झाले. त्यापैकीं एका पक्षानें दिल्लीच्या अकबर बादशहाचा पुत्र मुराद हा त्यावेळीं गुजराथेंत होता त्यास मदतीस बोलावले पण तो येण्याचे अगोदरच त्यास बोलावणाऱ्याची सरशी झाली सबब त्यानें मुरादची मदत नाकारली. तेव्हां मुरादनें अहमदनगरचे किल्ल्यास वेढा दिला. शेवटीं अहमदनगरच्या किल्यांत असलेली निजामशहाची

आत्या चांदबिबी हिनें तह करून उत्तर वऱ्हाड मोंगलास देण्याचे कबूल करून तह केला. नंतर मुराद उत्तर वऱ्हाडांत आला व बाळापूरजवळ शहापूर येथें एक सुंदर शहर वसवून तेथें राहिला. अशा रीतीनें उत्तर वऱ्हाडवर पुन: दिल्लीच्या मोंगलांची सत्ता सुरूं झाली.

## पुन: मोंगल कारकीर्द

इ. स. १५९९ त अकबरानें स्वत: दक्षिणेंत येवून अहमदनगरच्या निजामशाहीचा पूर्ण नाश करून पूर्ण वऱ्हाडवर आपली सत्ता स्थापन केली. निजामशहाचा मुत्सद्दी मालिकंबर यानें शिंदखेडचे जाधवराव व शहाजी भोसले यांचे मदतीनें निजामशाहीची पुन: स्थापना करण्याचा प्रयत्न केला पण इ. स. १६३४ मध्यें तिघांत वितुष्ट येवून जाधवराव यांनी मोंगलांची सरदारी कबूल करून पूर्ण वऱ्हाड मोंगलांचे ताब्यांत कायमचा आला. इ. स. १५९९ ते १६३४ पर्यंत वऱ्हाडवर कांहीं काळ निजामचा व कांहीं काळ मोंगलांचा तावा असें चालत असें. इ. स. १६३४ मध्यें शहाजननें आपल्या दक्षिणेंतील राज्याची पुनर्रचना केली त्यावेळीं वऱ्हाड, खानदेश व अहमदनगर या प्रदेशांचे दोन विभाग केलें. व दक्षिणेकडील भागास बालाघाट व उत्तरेकडील भागास पयानघाट अशी पूर्वीचीच नांवें कायम केली. त्यांत सध्याचे वाशिम व मंगरूळ तालुके बालाघाटांत व आकोला, आकोट, मूर्तिजापूर व बाळापूर पयानघाटांत समाविष्ट होतें. औरंगजेब इ. स. १६३६ त दक्षिणेचा सुभेदार झाल्यावर त्यानें ही व्यवस्था मोडली व दक्षिणेकडील राज्याचे दौलताबाद, तेलंगण, खानदेश व वऱ्हाड असें चार भाग केले. औरंगजेब मरण पावला त्या वेळीं मीर कमिरुद्दीन हा दक्षिणेचा सुभेदार होता व त्यास निजाम उल्-मुलक व इतर दोन किताब होते. औरंगजेबच्या मरणानंतर निजाम कागदोपत्री दिल्लीचे अंकीत म्हणवत व वस्त्रे दिल्लीवरून आणीत पण कृतीनें पूर्ण स्वतंत्र असत. पुढें इ. स. १७२० मध्यें बाळापूर येथें व इ. स. १७२४ मध्यें साखरखेर्डा येथें निजाम व मोंगल यांच्यात लढाया होवून त्यांत मोंगलांचा साखरखेर्डा येथें पूर्ण बिमोड झाला. व पुढें निजाम हैद्रावादेस गेला व तेथें दक्षिणेंतील सहा सुभ्यांचा सुभेदार म्हणून स्वतंत्रपणें अधिकार सुरूं केला व येथून वऱ्हाड हैद्राबादच्या निजामच्या ताब्यांत गेला.

## निजामशाही

इ. स. १६६८ त छत्रपति शिवाजीस औरंगजेबाकडून संभाजीच्या नांवानें बाळापूर व आवंढे या परगण्यांची जहागीर व पांच हजाराची मनसबदारी मिळाली. तेव्हापासून वऱ्हाडचे सरहद्दीवर शिवाजीनें आपले लष्कर ठेवलें व जहागीरीचा वसूल करण्याचे निमित्तानें ते वऱ्हाडवर हल्ले व लुटालूट करूं लागले. इ. स. १६९९ त परसोजी भोसले हा वऱ्हाडांत चवथाई व सरदेशमुखी वसूल करण्याकरितां राहिला व त्यानें आपले मुख्य ठिकाण वणी तालुक्यातील भाम येथे ठेवलें. त्यानें वऱ्हाडांत पूर्वेकडील आपला अंमल बराच वसवला. इ. स. १७३४ त निजामानें हैद्राबाद येथें स्वतंत्र राज्य स्थापले त्यावेळीं वऱ्हाडचा पूर्वेकडील निम्मा भाग भोसल्यांचे ताब्यांत आलेला होता व पश्चिमेकडील भागच फक्त निजामच्या ताव्यांत आला असें दिसतें.

भोसल्यांचे कारकीर्दीत पेशव्यांचा संबंध वऱ्हाडशी फारसा येत नसें व भोसलेच आपली माणसें प्रत्येक ठाण्यावर नेमत असत. परंतु पेशव्यांना भोसल्यांच्या प्रथमारंभीच्या काळांत निजामकडून व साताराच्या गादीकडून वऱ्हाडांत मोकासे व इनामे मिळत असत. इ. स. १७४०-४१ मध्यें जे मोकासे बाजीराव पेशव्यास पूर्वीपासून होते तेच मोकासे बाळाजी बाजीरावकडे सातारकरांनीं कायम केले. त्यांत परगणा नरनाळा होता असा उल्लेख आहे. पेशवे व भोसले यांचे मोकासाच्या व्यवस्थेबद्दल तंटे होत. त्यांचे खटके उघड उघड वैर होण्यापर्यंत गेले. पुढें इ. स. १७४० मध्यें शाहूच्या मध्यस्तीनें भोसले व पेशवे यांचा तह झाला. त्यांत बंगाल, बिहार, कटक, पाटणा, वऱ्हाड व गोंडवणा यांत भोसल्यांची सत्ता रहावी व पेशव्यांनी त्यांत हात घालू नयें असें ठरलें. वाशिम, मंगरूळ वगैरे भागाची मोकासदारी मराठ्याकडेच होती. निजामानें इ. स. १७३४ त राज्य स्थापन केलें तरी भोसले व पेशवे यांच्या भांडणांत एका विरुद्ध दुसऱ्याचा पक्ष घेवून कसा तरी राज्य जिवंत ठेवून होता. इ. स. १७५१ मध्यें नरनाळा व गाविलगड हे किल्ले भोसल्यांनी घेतले व तेव्हांपासून इ. स. १८०३ मध्यें भोसल्यांचा मोड झाला तरी ते त्यांचेकडेच होते. भोसल्यांचा जोर वाढल्यामुळें निजामानें त्यांच्याशी साठचाळीशीचा करार केला. त्या करारान्वयें वऱ्हाडांतील निजामाचे सर्व मुलूखाची वहिवाट भोसल्यांनी करावी व खर्चाबद्दल ६० टक्के उत्पन्न घेऊन चाळीस टक्के निजामास द्यावें असें ठरलें. राज्य मात्र निजामाचेंच समजलें जाई.

इ. स. १७९५ त आलेल्या खर्ड्याच्या लढाईनंतर वऱ्हाडवर निजामाचें स्वामित्व नांवाचेच राहिले. सर्वत्र भोसल्यांचा अंमल बसला होता. यावेळीं हिंदुस्थानच्या राजकारणांत शिंदे, होळकर, भोसले प्रबळ झाले होते. पेशवे दुबळे बनले होते. इंग्रज प्रबळ बनत चालले होते. तेव्हां शिंदे, होळकर व भोसले मिळून इंग्रजांचा पराभव करावा असा विचार त्यांच्यांत सुरू झाला. इंग्रजांना याची चाहूल लागतांच त्यांनी एकेकास गाठून त्यांचा पराभव केला. त्यांत निजामानें त्यांस साथ दिली. सन १८०३ मध्यें अडगांव व शिरसोली येथील लढाईंत पराभव झाल्यामुळें भोसल्यांनी इंग्रजांशी देवगांव येथें तह केला. वर्धेच्या पश्चिमेकडील वऱ्हाडचा सर्व भाग (गाविलगड, नरनाळा हे किल्ले व त्यांचे खालचा भाग सोडून) इंग्रज व त्याचे साथीदारास मिळाला व इंग्रजांनी तो वाटणींत निजामास दिला. यावेळीं नरनाळा व त्याचे खालचा भाग जो भोसल्यांकडे राहिला तोहि इ. स. १८२२ मध्यें आलेल्या तहानें भोसल्यांनी इंग्रजास दिला. तोहि इंग्रजांनी निजामास दिला. भोसल्यांची चौथाईची बाकी निजामास माफ करण्यांत आली व पुढें चौथाईचा हक्क बंद झाला. अशा रीतीनें इ. स. १८२२ त वर्धेच्या पूर्वेकडील भाग वऱ्हाडपासून तुटला व बाकीचा वऱ्हाड पुन: भोसल्यांकडून निजामाचे ताब्यांत आला.

निजामाच्या ताब्यांत वऱ्हाड आल्यापासून तो त्याचे राज्याचा एक सूभा बनला. व त्याचा वसूल सावकारांना मक्त्यानें देण्याची वहिवाट पडली. तो दरसाल बावन लक्षास दिला जात असें, म्हणून बावन वऱ्हाड असा शब्दप्रयोग प्रचारांत आला. निजामानें तैनानी फौजेची पद्धत स्वीकारली होती. त्यामुळें त्यांचा रेसिडेंट हैद्राबादेस रहात असे व त्याचेच संमतीनें निजामास आपला दिवाण नेमावा लागे. नांव निजामाचें पण खरी सत्ता इंग्रजांचीं असें होतें. निजामाला राज्याचे हिशेब देखील पहावयास मिळत नसत. मक्तेदारानें किती वसूल व कशा रीतीनें करावा यावर बंधन नसे. त्यामुळें प्रांतांत फारच अशांतता व अंदाधुंदी माजली. मक्तेदार पामर आणि कंपनीचें कर्ज निजामावर इतकें झालें कीं तें फिटणें अशक्य झालें. शेवटीं इ. स. १८२० मध्यें रेसिडेंट मेटकाफ यानें ब्रिटिश सरकारकडून निजामास कर्ज देवून पामर कंपनीचें कर्ज फेडलें. विश्वासू युरोपियन अधिकारी नेमून जमीनमहसूलाची फेर आकारणी केली व मक्तेदारांची जुलूम-जबरदस्ती नाहीशी करून सुव्यवस्था केली. राज्याचे जिल्हे व जिल्हाधिकारी तेव्हांपासून सुरू झाले. ही व्यवस्था आठ वर्षे टिकली. त्यानंतर रेसिडेंटचें वर्चस्व सहन न होवून निजामानें गव्हर्नर जनरलकडे केलेली तक्रार मंजूर झाली व सर्व युरोपियन अधिकारी कामावरून काढून टाकण्यांत आले. त्यामुळें पुन: राज्यांत अंदाधुंदी माजली. इ. स. १८३१ ते ३९ पर्यंत वऱ्हाडचा मक्ता पुरणमल नांवाच्या सावकाराकडे होता. नंतर तो पेस्तमजी नांवाच्या सावकाराकडे देण्यांत आला. उद्योगधंदे वाढवून रयतेचें उत्पन्न वाढविण्याकडे त्याची प्रवृत्ती होती. शेतकरी लोकांस आगाऊ पैसे देवून कापूस पिकविण्याचा प्रघात यानेंच पाडला. इ. स. १८२५-२६ मध्यें वऱ्हाडांतून प्रथम कापूस पेस्तमजीनें मुंबईस पाठविला. पेस्तमजी आकोल्यास रहात असें. निजामाच्या दारिद्रयामुळें वऱ्हाडशिवाय राज्याचा कारभार चालत नाहीं असें दिसल्यावरून १८४५ सालीं पेस्तमजीचा कारभार बंद करविला गेला. त्यावेळी त्याचे ४० लक्ष रुपये निजामाकडे राहिलेले सबब तो ताबा देईना. शेवटीं निजामाचे माणसांनी आकोला व बाळापूर येथें पेस्तमजीचें माणसांवर हल्ला करून जबरदस्तीनें ताबा घेतला व निजामाकडे असलेले कर्ज बुडाले. एकंदरित निजामाची कारकीर्द वऱ्हाडांत अत्यंत कष्टाची गेली. पुष्कळ प्रांत ओसाड पडला. वतनदार लोक वतनें सोडून पळून गेले. शेतकरी लोक शेते सोडून निघून गेले. निजाम अगदी दरिद्री बनला. त्याच्यानें इंग्रजांचे कर्ज फेडणें होईना. शेवटी इ. स. १८५३ मध्यें पुन: तह होवून कर्ज फेडीत वऱ्हाड वहिवाटीकरितां इंग्रजांस देण्यांत आला व राज्याचे व्यवस्थेचा व तैनानी फौजेचा खर्च वजा जावून शिल्लक निजामास द्यावी असें ठरलें.

## इंग्रजी कारकीर्द

इंग्रजांनी उत्तर वऱ्हाड (सर्व पयानघाट) व दक्षिण वऱ्हाड (सर्व बालाघाट) असें दोन जिल्हे केले. उत्तर वऱ्हाडची राजधानी बुलढाणा व दक्षिण वऱ्हाडची हिंगोली होती. इ. स. १८५८ मध्यें वऱ्हाडचे पूर्व वऱ्हाड व पश्चिम वऱ्हाड असें दोन जिल्हे झाले. पूर्व वऱ्हाडचे मुख्य ठिकाण अमरावती व पश्चिम वऱ्हाडचे आकोला होतें. पश्चिम वऱ्हाडांत मूर्तिजापूर तालुका सोडून सध्याचा आकोला जिल्ह्याचा भाग, बुलढाणा जिल्हा व पुसद तालुका होता. इ. स. १८५३ च्या तहाप्रमाणें हिशेब करून निजामास पैसे देणें त्रासाचें पडले म्हणून इ. स. १८६० सालीं पुन: तह होवून निजामाकडे निघालेले ५० लक्ष कर्ज माफ करण्यांत आले. फक्त वऱ्हाड

इंग्रजाकडे राहिला. रायचूर व धाराशिव वगैरे हिंगोली व दक्षिण भाग निजामास देण्यांत आला व सध्याची वऱ्हाडची हद्द कायम झाली. इ.स. १८६४ मध्यें वणी जिल्हा नवीन केला. त्याचें नांव आग्नेय वऱ्हाड असें होते. त्यासच आतां यवतमाळ जिल्हा म्हणतात. मलकापूर, चिखली, मेहकर यांचा मिळून वायव्य जिल्हा करून जानेफळ येथें कचेरी ठेवण्यांत आली. इ.स. १८६५ सालीं जिल्ह्याचे नांव मेहकर असें करण्यांत आलें. इ.स. १८६७ मध्यें बुलढाणा हें थंड हवेचें ठिकाण म्हणून जिल्ह्याची मुख्य जागा केली व बुलढाणा हें नांव दिलें. इ.स. १८७५ मध्यें वाशिम जिल्हा नवीन केला. इलिचपूर जिल्हा नवीन केला. इ.स. १९०३ मध्यें वऱ्हाड मध्यप्रांतास जोडीपर्यंत वरील सहा जिल्हे कायम होते. इ.स. १९०५ मध्यें वऱ्हाडच्या सहा जिल्ह्यांची पुनर्घटना करण्यांत आली. त्यावेळीं आकोला जिल्ह्यांत आकोला, आकोट, बाळापूर, खामगांव आणि जळगांव तालुके होते. त्यापैकीं अमरावती जिल्ह्यांतून मूर्तिजापूर तालुका घेतला, खामगांव व जळगांव बुलढाण्यास दिले, वाशिम जिल्हा तोडून वाशिम व मंगरूळ तालुके घेतले व अशा तऱ्हेनें सध्याचा जिल्हा तयार करण्यांत आला. तो आजपर्यंत तसाच चालू आहे.

# लोकजीवन

आकोला जिल्ह्याची लोकसंख्या १९६१ सालच्या शिरगणतीप्रमाणें ११,८९,२७७ आहे. ही विदर्भ विभागांतील लोकसंख्येच्या ११¾ टक्के आहे. एकूण पुरुष ६,१४,०५७ व स्त्रिया ५,७५,२२० म्हणजे लोकसंख्येच्या अनुक्रमें ५१.६४ व ४८.३६ टक्के आहेत. स्त्रियांचे पुरुषांशी दरहजारी प्रमाण ९२० आहे. जिल्ह्यांत एकूण ९ शहरें व १,४७७ खेडीं असून ९,२६,५२१ लोक खेड्यांत व २,६२,७५६ लोक शहरांत राहतात. म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी ७७.९ टक्के लोक खेड्यांत राहतात व २२.२ टक्के लोक शहरांत राहतात. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकीं खेड्यांनी ४,०७५ चौरस मैल क्षेत्र व्यापलें असून शहरांनी फक्त १६ मैल व्यापलें आहे. जिल्ह्यांतील लोकवस्तीचें दरचौरस मैलाचें सरासरी प्रमाण २३२ आहे. विदर्भ विभागापेक्षा हें बरेंच जास्त असून जिल्ह्यांतील सुपीक काळी जमीन हें याचें कारण आहे. आकोला व आकोट तालुक्यांत लोकवस्ती दर चौरस मैलांत जास्तीत जास्त असून मंगरूळ तालुक्यांत ती सर्वांत कमी आहे.

धंद्याच्या दृष्टीनें जिल्ह्यांतील लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीनुसार खालीलप्रमाणें वाटली गेली आहे :—

| प्रकार (धंदा) | शहर | खेडीं | एकूण |
|---|---|---|---|
| (अ) शेतीवर उपजीविका असणारे— | | | |
| (१) शेतकरी, शेतमजूर व त्यांचेवर अवलंबून असणारे | ५५,९६१ | ६,३७,९३१ | ६,९३,८९२ |
| (२) स्वत: शेती न करणारें जमीन-मालक आणि त्यांचेवर अवलंबून असणारे. | ४,२७० | २०,७९२ | २५,०६२ |
| एकूण ... | ६०,२३१ | ६,५८,७२३ | ७,१८,९५४ |
| (ब) इतर रीतीनें उपजीविका करणारे— | | | |
| (३) शेतीशिवाय इतर उत्पादन करणारे ... | ४२,८१४ | २९,५९५ | ७२,४०९ |
| (४) व्यापार ... ... ... ... | ४४,७९२ | १५,८०१ | ६०,५९३ |
| (५) वहातूक दळणवळण ... ... ... | १२,८६६ | १,५९७ | १४,४६३ |
| (६) इतर नोकऱ्या वगैरे ... ... ... | ४९,५२९ | ३५,०४६ | ८४,५७५ |
| एकूण ... | १,५०,००१ | ८२,०३९ | २,३२,०४० |
| एकूण सर्व ... | २,१०,२३२ | ७,४०,७६२ | ९,५०,९९४ |

१९६१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ११,८५,६७६ झाली असून त्यापैकीं ६,१२,२७५ पुरुष व ५,७३,४०१ स्त्रियां आहेत. स्त्रियांचे पुरुषांशी दर हजारी प्रमाण ९३७ आहे गेल्या १० वर्षांत लोकसंख्या २४·६६ नी वाढली आहे.

## समाज घटक

जिल्ह्यांत राहणारे मुख्य समाज म्हणजे हिंदू व मुसलमान. या शिवाय जैन, बुद्ध, शिख, ख्रिश्चन वगैरे समाजहि आहेत पण त्यांची संख्या अत्यंत कमी आहे. जैन समाज हा श्रीमंत असून त्यांची संख्या मूर्तिजापूर तालुक्यांतील कारंजा, वाशिम तालुक्यांतील शिरपूर व बाळापूर तालुक्यांत बाळापूर येथेंच मुख्यत्वेंकरून आहे. प्रत्येक ठिकाणीं जैनांच्या वसया (देवालयें) असून कारंजा येथील वसईत जैन पंथाबद्दलची वरीचशी हस्तलिखितें आहेत. शिरपूर ही जैनांची काशी समजली जात असून तेथें अखिल भारतांतून दोनहि पंथाचे लोक तीर्थयात्रेस येत असतात. बुद्ध लोकांची संख्या डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी बुद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळेंच थोडीशीं आहे. त्यांचे पूर्वी येथे बुद्धधर्मीय लोक नव्हते म्हटलें तरी चालेल. शिखांची संख्या अगदीच अल्प असली तरी आकोला येथें त्यांचें एक गुरुद्वारा आहे.

हिंदु समाजांत मुख्य वस्ती शेती करणाऱ्या मराठा जातीची आहे. त्याच्याच अनुषंगानें त्याला लागणाऱ्या इतर गोष्टी पुरविणाऱ्या इतर जातीहि आहेत. शेतीला लागणारा पैसा पुरविण्याकरितां येथें मारवाडी आले. व्यापार करण्याकरितां बोहरी, कच्छी व गुजराथी आले. वकील, डॉक्टर, मास्तर, सरकारी नोकरी वगैरे करण्याकरितां कोकणस्थ लोक आले. न्हावी, पाणी भरणें, सुतारी, स्वयंपाक वगैरे कामाकरितां उत्तर प्रदेशांतील लोक आले. शेतीची व इतर मजूरी करण्याकरितां अहमदनगरकडून दक्षिणी (दखनी) लोक आले व आज हे सर्व समाज येथें स्थायिक होवून येथील जीवनाशी एकरूप झालेले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळांत सिंधी लोकहि या ठिकाणीं बऱ्याच प्रमाणांत येवून स्थायिक झाले आहेत. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणे लोकसंख्येची भाषावार विभागणी खालीलप्रमाणें होती :—

| भाषा | लोकसंख्या | एकूण लोकसंख्येशी प्रमाण |
|---|---|---|
| मराठी ... ... .. | ७५०,१६५ | ७८.८ |
| उर्दू ... ... ... ... | ९४,१०१ | ९.९ |
| हिंदी .. .. ... | ३०,८५६ | ३.२ |
| वंजारा. ... ... . | २८,४२५ | २.९ |
| मारवाडी ... . . | १७,११७ | १.८ |
| सिंधी . ... .. .. | २,६९२ | ०५ |
| इतर ... ... ... ... | २५,९०४ | २.० |

जिल्ह्यांतील मूळ लोक वऱ्हाडच्या इतर भागाप्रमाणेंच साधारणपणें ५ तें ६ फूट उंच, मध्यम बांध्याचें, वर्णानें सावळे, स्वभावानें भोळे, मनानें उदार, अल्पसंतोषी व किंचित आळशी असे आहेत. परंपरागत गोष्टी सोडण्यास ते लवकर प्रवृत्त होत नाहींत, त्यामुळें पूर्वीची जातीबंधनें कडकपणानें पाळणारे लोक अद्यापहि खेडे विभागांतून कित्येक ठिकाणीं आढळतात. परंतु शिक्षणाचा प्रसार वाढल्यापासून ती बंधनें नष्ट होण्याकडे दिवसानुदिवस जास्त कल होवूं लागला आहे. शिकलेले व त्यांचे संसर्गांत असलेले न शिकलेल्या लोकांनी ही बंधने वरीचशी मोडून टाकली म्हणण्यास हरकत नाहीं. कुणाच्याहि हॉटेलमधून एकाच वेळीं निरनिराळे लोक एकत्र बसून फराळ करतांना तर आढळतातच; पण शिक्षणानें एकाच पातळीवर आलेले लोकांतून रोटीबंधनहि पार निघून गेले असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

## सण व उत्सव

दसरा, दिवाळी, पोळा, शिमगा, अक्षय-तृतीया, सर्वपितृ-अमावास्या व मकर-संक्रांत हे सण हिंदू समाजांतील सर्व लोक पाळतात. पोळ्याचे दिवशीं शेतीची पावसाळ्यातील कामें संपून पीक निघेपर्यंत बैलांना विश्रांती असल्यामुळें त्या दिवशीं बैलांना सजवून त्यांची सार्वजनिक ठिकाणीं सार्वजनिक पूजा केली

जाते व मग प्रत्येक शेतकरी आपापले घरीं आपापल्या व इतर येणाऱ्या बैलांची पूजा करतो. बिगर शेतकरी समाज देखील घरीं आलेल्या बैलांची पूजा करतो. दसऱ्यास सायंकाळचे वेळीं सर्व लोक सीमेबाहेर जावून शमीच्या झाडाची पूजा करून त्याची पानें आणतात व रात्रीं एकमेकांच्या भेटीस जावून धाकटे लोक वडील माणसांस ती पानें सोनें म्हणून भेट देतात. पूर्वीची कटुता असल्यास ती विसरून पुन: चांगले संबंध सुरू व्हावेत असा भेटी घेण्याचा उद्देश आहे. दिवाळीला धनत्रयोदशीचे दिवशीं शेतकऱ्यांचे घरांत प्रथम नवीन निघालेल्या पिकाचा पैसा येतो म्हणून तो धनाची पूजा करतो. आश्विन वद्य ३० सेस व्यापारी वर्ग आपली वहीखाती व संपत्तींची पूजा करतो व नवीन व्यवहाराची सुरुवात म्हणून काहीं सौदे केले जातात. लक्ष्मी-पूजन झाल्यानंतर व्यापारी लोक एकमेकांच्या दुकानीं जावून व्यवहाराची सुरुवात म्हणून कांहीं रकम जमा करतात व इतरांची जमा परत करतात. अक्षय-तृतीया व सर्वपितृ-अमावस्येस सगळेजण आपापल्या पितरांची आठवण म्हणून श्राद्धासारखा लहानसा विधी करतात. गणेशोत्सव सार्वजनिक रीतीनें मोठ्या प्रमाणावर पाळला जातो. वसंत ऋतूंतील गौरीपूजा व त्यानिमित्त हळदी-कुंकू हा स्त्रियांचा मोठा उत्सव आहे. संक्रांत हा स्त्रीपुरुषांचा दोघांचाहि सण असून त्या दिवशीं वडील मंडळी धाकट्यांचेकडे जावून त्यांना तिळगूळ देतात, व पूर्वीची कटुता असल्यास विसरावयास सांगतात. स्त्रियां हळदी-कुंकू करतात. आश्विन शुद्ध १ पासून लहान मुली आपापल्या घरीं भुलाई बसवतात व दररोज सायंकाळीं वेटाळांतील सर्वजणी मिळून भुलाबाई माहेराहून सासरी जात असल्याच्या आशयाचें गाणे म्हणतात व दररोज एक पदार्थ खिरापत म्हणून करतात. आश्विन शुद्ध पौर्णिमेचें दिवशीं भुलाबाई सासरी जाते. त्या दिवशीं जास्तीत जास्त खिरापत करतात देवीच्या नवरात्रांत सरस्वती पूजेच्या निमित्तानें स्त्रियांमधून शारदोत्सव सार्वजनिक रीतीनें साजरा करण्याची नवी पद्धत आतां पडूं लागली आहे. शिक्षणामुळें लोकांतील धार्मिक प्रवृत्ती नष्ट होवूं लागली असून सणांना आतां नुसतें समारंभाचें व सार्वजनिक स्वरूपच येवूं लागले आहे. शिमग्याचा सण देखील उत्साहानें पाळला जातो. पण त्यांतील अश्लीलता व धुळवड आतां बरीच कमी होवूं लागली आहे.

### मागासलेले वर्ग

पूर्वास्पृश्य समजल्या जाणाऱ्या व आर्थिक आणि सामाजिक दृष्टीनें दु:स्थितींत असलेल्या मागासलेल्या वर्गाची संख्या १९५१ च्या शिरगणतीप्रमाणे २००,०७३ (दोन लक्ष) म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २० टक्के होतें. अस्पृश्यता निवारणाच्या प्रचारामुळें व सरकारी प्रयत्नामुळें या वर्गांची स्थिती सुधारण्याचें प्रयत्न जोरांत सुरू असून शहरांतून व शिकलेल्या लोकांतून अस्पृश्यता आतां बऱ्याच प्रमाणांत कमी झाली आहे. खेडे विभागांतहि या प्रचाराचें लोण पोंचलें असून जिल्ह्यांत कांही खेडी अशी आहेत कीं ज्या ठिकाणीं अस्पृश्यता मुळींच पाळली जात नाहीं. पूर्वास्पृश्य आणि स्पृश्य समाजांतील गेल्या दोन वर्षांत दोन मिश्र विवाह झाले असून त्यांचा समाजसेवा विभागातर्फे सरकारी योजनेनुसार सार्वजनिक रीतीने सत्कार करण्यात येवून त्यांना अहेर करण्यांत आला.

### इतर जमाती

मुसलमान समाज बहुसंख्य सुनी पंथाचा असून जिल्हाभर विखुरलेला आहे. बहुतेक लोक फळें विकणें, खेड्यांत कापूस घेवून शहरांत आणून विकणे वगैरे सारखे लहान लहान धंदे करतात. कित्येक शेतीहि करतात. कापूस पिंजण्याचा धंदा व बांगड्याचा व्यापार बहुतेक हेंच लोक करतात. एकंदरीत समाजाची स्थिति गरीबीची आहे. मोहरमचा सण उत्साहानें पाळतात. या समाजांत शिक्षणाचा प्रसार कमी प्रमाणांत आहे. गोशा पाळतात, त्यामुळें स्त्री-शिक्षण जवळ जवळ नाहींच. बोहरी समाज शिया पंथाचा असून हार्डवेअर म्हणजे लोखंडी सामानाचा व्यापार करतात. हे उंच, सडपातळ व गोरे असून श्रीमंत आहेत. हेहि लोक गोशा पाळतात. पण स्थानिक मुसलमान व बोहरी यांच्यांतील फरक डोळ्यांत भरण्यासारखा आहे.

### राजकीय जागृति

भारताच्या राजकीय जीवनांतील सर्व पक्षाच्या शाखा जिल्ह्यांत असून त्या आपापल्या परीनें राजकीय जागृतीचें कार्य करतात. सबब सर्वच समाजांत राजकीय जागृती झाली आहे. पण लोकांचा स्वभाव शांत असल्यामुळें विरुध्द पक्षांतील लोकांशी मारामाऱ्या, खून वगैरे घडत नाहीं. निरनिराळ्या पक्षांतर्फे केव्हां हरताळ, मोर्चे किंवा मिरवणुकी काढल्या जातात पण त्या शांततेनें पार पडतात. पोलिसांना गोळीबारच काय पण लाठीमार करण्याचा देखील प्रसंग गेल्या कित्येक वर्षांत आलेला नाहीं.

### कलात्मक दर्जा

निरनिराळ्या शाळांमधून मुलांची कलापथकें स्थापन झाली आहेत. शिक्षण विभागातर्फे त्यांच्या नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जातात. कित्येक खेड्यांतून प्रौढांचीहि कलापथकें आहेत. भजनमंडळें तर बरीच आहेत. आकोला व वाशिम येथें नाट्यस्पर्धेत भाग घेणारी वरच्या दर्जाची नाट्यमंडळें आहेत. महाविद्यालयांतून स्नेहसंमेलनांत नाटयें केली जातात. लहान मुलींना नृत्य, गायन शिकविण्याची प्रवृत्ती वाढती आहे. बहुसंख्य खेड्यांतून महिला मंडळें स्थापन झाली असून त्यांतून भरतकाम, विणकाम, शिवण-काम वगैरे शिकविण्यांत येतें व सार्वजनिक समारंभ साजरे केले जातात. एकंदरीत समाजाचा कलात्मक व सांस्कृतिक दर्जा वाढलेला आहे.

### खेळ व करमणुक

खेड्यापाड्यांतून व खालच्या वर्गांतून कुस्ती, मलखांब, दांडपट्टा, छडीपट्टा, विटीदांडु हे खेळ जास्त खेळले जातात. नगरकडून आलेल्या दखनी लोकांनी लेझीम नवीन आणला व तोही आतां सर्वत्र खेळला जातो. शाळांमधून हॉकी, फुटबॉल, क्रिकेट बरोबरच आंता हुतुतु व खो खो देखील खेळले जावूं लागले आहेत. जे क्लब आहेत त्यांत टेनिस, बॅडमिंटन जास्त प्रमाणांत खेळतात. बॅडमिंटनचा प्रसार स्त्रियामध्यें देखील होवू लागला आहे. झिम्मा, फुगडीसारखे मुलींचें खेळ मागें पडले आहेत.

खेड्यांतून दंढार हें करमुणुकीचें लोकप्रिय साधन आहे. पण फिरते सिनेमा सगळीकडे जावूं लाग-ल्यामुळें दंढार मागें पडत चालली आहे. फुरसतीचा वेळ घालविण्याकरितां समाजाच्या सगळ्याच थरां-तील लोक गंजीफ्याचा उपयोग करतात. शहरांतील सोशल क्लबांतून तो बहुतेक दररोज खेळला जातो.

विकास गटांच्या मार्फत नवीन विचार प्रत्येक खेट्यापाड्यांत पोंचलें असल्यामुळें सगळा समाज नवीन गोष्टी स्वीकारूं लागला आहे किंवा जुन्याच गोष्टी नव्या पद्धतीनें करूं लागला आहे. समाजांस जागृती निर्माण झाली असून तो प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करूं लागला आहे.

## वन्य जमाती

१. **गोंड.**—वन्य किंवा आदीवासी समजल्या जाणाऱ्या प्रमुख जमाती गोंड, कोरकू व वंजारा (लमाणी) अशा तीन आहेत. गोंड लोकांची वस्ती आकोट तालुक्यांत उत्तरेकडील डोंगराळ भागांत असून मूळ चांदा व भंडारा जिल्ह्यांतून हे सुमारें ७५ वर्षापूर्वी इकडे आले. स्वत:ला राज गोंड म्हणव-तात. इतरांपेक्षा यांचें निराळें असें वैशिष्ट्य आतां राहिलेलें नाहीं. पुरुषांचा पेहराव इतरांसारखाच आहे. स्त्रियां नऊवारी लुगडें नेसतात. पूर्वी चोळी घालत नसत. पण आतां घालूं लागल्या आहेत. बांगड्या घालतात. कुंकू लावतात. पायांत चांदीच्या करड्या घालतात. हातांत चांदीच्या पाटल्या, बांगड्या व दंडांत कोपरवाळ्या, गळ्यांत सरी, कानांत मुरक्या घालतात. आता एकदाणी सुद्धां घालूं लागल्या आहेत. हिंदु समाजांतील सर्वच सण करतात व सर्वच देवांना भजतात. जन्माच्या वेळीं पांचवीची पूजा करतात. मयत झाल्यानंतर पुरतात. जेवण देतात. लग्नांत पूर्वी कांहीं विधि नसे. मुलाचा बाप मुलीकडे जावून लग्न ठरवी. नंतर मुलगा हळद लावून मुलीच्या घरी जाई. तिला हळद लावित नंतर मुलीकडले लोक मुलाच्या गांवीं येवून लग्न लावीत . ब्राम्हण बोलवून विधीयुक्त लग्न लावण्याची चाल आतां पडूं लागली आहे. दिवाळीं हा महत्वाचा सण समजतात. शिक्षणाचा प्रसार होवू लागला आहे. यांना स्वतंत्र भाषा आहे पण लीपी नाहीं. मांसाहार करतात. यांची संख्या फारशी नाहीं. मुख्य धंदा मजूरी. आतां शेती करूं लागले आहेत.

२. **कोरकू.**—कोरकू जमातीची वस्ती ही आकोट तालुक्यांत उत्तरेकडील डोंगरी मुलखांतच आहे. हे सातपुड्यांतून उत्तरेकडून या भागांत आले. यांचा मुख्य धंदा मजूरी आहे. पण आतां शेती करू लागले आहेत. महादेव व माता या देवांची पूजा करतात. कोणत्याहि कामाला जातांना विघ्न वगैरे होवूं नये म्हणून देवाचें नांव घेवून एकाद्या ठिकाणीं दगड किंवा लाकूड ठेवतात. प्रत्येक जणांनी असें केले कीं, जो ढीग होतो त्याला फतर देव किंवा लक्कड देव असें म्हणतात. पुरुषांचा पेहराव इतरां-सारखाच आहे. स्त्रिया नऊवार लुगडी नेसतात. कित्येक कासोटा घालतात. कित्येक घालत नाहींत.

हातांत कडे, दंडांत कोपरवाळच्या, गळच्यांत सरी, कानांत तरवान (कर्णफुलें) पायांत पितळेचें कडे घालतात, मण्याच्या माळा घालण्याची हौस फार. बाया कुंकू लावीत नाहीत. कुमारीकेचे लग्न झाल्याची खुण म्हणून विशेष असें चिन्ह वापरीत नाहींत. पुर्नविवाह आहे. मुलीचें लग्न १४ ते १५ व्या वर्षी करतात. मुलगा मुलीला मागणी घालतो. मुलीचा हुंडा घेण्याची पद्धत आहे. ज्याचे जवळ पैसे नसतील तो मुलगा पैसे फिटेपर्यंत मुलीचें घरीं राहतो. व पैसे फिटल्यावर बायकोला घेवून घरी येतो. लग्नाचा ठरलेला विधी नाहीं. वधूवर मांडवांत बसून प्रमुख माणूस मांडवावर पाणी टाकतो. ते वधूवरांचें अंगावर पडले म्हणजे लग्न झालें असें मानलें जातें. या शिवाय घरघुशी म्हणून लग्नाचा दुसरा एक प्रकार रुढ आहे. वयांत आलेल्या प्रौढ मुलामुलींच्या आपसांत ओळखी झाल्यानंतर ते लग्न ठरवितात व मुलगी मुलाच्या घरीं जावून राहूं लागते. मागाहून मुलाच्या बापाकडून मुलीचा बाप कांहीं हुंडा घेतो. जन्मानंतर पांचव्या दिवशी टेंभुर्णीच्या दोन काडयांस हळद-कुंकू वाहून पांचवींच्या पुजेनिमित्य कोंवडी कापतात. मृताला गाडतात. मृत्यु झाल्यानंतर दहा दिवसांत किंवा पौष महिन्यांत लाकडाची बाहुली करून वेशीबाहेर रोवतात व पूजा करतात. यालाच शिदोली अथवा देवकरण असें म्हणतात. नागपंचमी, पोळा, दिवाळीं, शिमगा हे सण महत्वाचें मानले जातात. मंत्रतंत्र, जादूटोणा यावर जास्त विश्वास आहे. स्त्रियांमध्यें गोंदून घेण्याची पद्धत आहे. कोरकू भाषा बोलतात. लिपी स्वतंत्र नाहीं. सध्या शिक्षणाची प्रवृत्ती वाढत असून लोक स्वच्छ राहूं लागले आहेत. मांसाहार करतात.

निहाल ही कोरकूंमधील अस्पृश्य समजली जाणारी एक जात आहे. आकोला जिल्हयांत निहाल लोक नाहींत.

३. **बंजारा (लमाणी)**.—बंजारा (लमाण) लोक मूळ मारवाडचें. मोगलांनी चितोड जिकल्यावर राणाप्रतापाबरोबर हे घरदार सोडून निघाले. मालाची एका ठिकाणाहून दुसरीकडे ने-आण करणें हा त्यांचा धंदा होता. हे लोक गटानें रहात म्हणून यांच्या वस्तीला तांडा असें म्हणतात. वनांत रहातात म्हणून यांना वंजारा-बंजारा म्हणू लागले. आकोला जिल्हयांत यांची संख्या विशेषकरून मंगरुळ, वाशिम, मूर्तिजापूर व आकोला तालुक्यांत आहे. बंजारी भाषा राजस्थानी भाषेसारखी आहे. पण यांच्या भाषेला लीपी नाहीं. पूर्वीचा गो-पालनाचा व व्यापाराचा व्यवसाय सोडून हे लोक शेती करूं लागले आहेत. समाजांतील बहुसंख्य लोक मजूरी करतात. पुरुषाच्या पेहरावांत इतरांपेक्षा भिन्नता नाहीं. स्त्रिया मात्र लाल लहेंगा, लाल काचळी व लालच ओढणी वापरतात. सर्वच स्त्रिया डोक्यावर खैराच्या झाडाची काडी बांधतात. टोपली, घुगरी, नथ, सरी, कानांत कडचा व पायांत वांकडी घालतात. घुगरी टोपली केसांत बांधतात. सौभाग्यवती बाया दंडांत हस्तीदंताच्या एक दोन बांगडया व केसांत गोंडे घालतात. जन्मानंतर पांचवीचें दिवशीं मुलाला पाळण्यांत घालतांना, दात येतांना, चालूं लागतांना विशिष्ट आचार पाळतात. लग्न आईवडील ठरवतात. लग्नांत एक उतरंड, त्या भोंवती चार काड्या व दोन मुसळ रोवतात, त्यांना रुईचे व पळसाचे डहाळे बांधतात. व वर-वधू त्या भोंवती प्रदक्षिणा घालतात. पूर्वीपासून ब्राम्हण बोलावतात. आतां लग्नें वैदिक पद्धतीनें होवूं लागली आहेत. हुंडयाची पद्धत पूर्वी असे. आतां कमी झाली आहे. जवरा व शिमगा हे यांचे प्रमुख सण आहेत. श्रावण महिन्यांत मुंग्यांनी उकरून काढलेली माती टोपल्यांत भरून त्यांत गहू पेरावयाचें व धान आल्यावर त्याची गोकुळ अष्टमीस पूजा करावयाची व दुसरे दिवशीं पाण्यांत शिरवायचे असें यांचें स्वरूप आहे. शिमग्यांत स्त्रियां व पुरुष होळीजवळ अलग अलग समूहांनी बसून रात्रभर नाच-गाणीं करतात.

मृत्यूनंतर विवाहितास अग्नी देतात व अविवाहितास पुरतात. मृताचे श्राद्ध करतात. पूर्वी तें फक्त शिमगा किंवा दिवाळीची अमावस्या याच दिवशीं करीत. आतां मृत्यूतिथीच्या दिवशीं करूं लागले आहेत. याकरितां ब्राम्हण बोलावीत नाहींत, फक्त भाताची खीर करून जेवतात. पूर्वी कोणत्याहि सणांत दारू पिणें आवश्यक मानत. आतां ती पद्धत नाही.

शिक्षणाची प्रवृत्ती समाजांत वाढत आहे. स्त्री-शिक्षणास देखील सुरुवात झाली आहे. समाजांत शिकलेल्या लोकांची संख्या बरीच आढळते. त्यामुळ बायांच्या पेहरावांत देखील फरक होवूं लागला आहे.

सेवाभाया नांवाचें एक मोठे संत यांच्या जमातींत सुमारें २-२½ शे वर्षापूर्वी होवून गेले. ते मंगरूळ तालुक्यांत पोहरा येथें रहात असत. त्यांनी या समाजांत देवीची पूजा सुरू केलीं व पोहरा येथें देवीची यात्रा सुरूं केली. म्हणून पोहरा देवी असें गांवाचें नांव पडलें. पोहरा देवी ही बंजारा जमातीची काशी समजली जात असून येथें सगळ्या भारतांतून लोक दर्शनास येतात. सेवाभायानें सुरूं केलेली यात्रा रामनवमीस भरते. २५--३० वर्षापासून आश्विन शु. १५ सही यात्रा भरूं लागली आहे. मंदिरांत जाण्यास हरिजनांना पूर्वीपासून मुभा आहे. मुसलमान लोकदेखील दर्शनास येतात. मंदिरांत देवीची मूर्ति नसून फक्त निशाण आहे. सेवाभायांनी देवी म्हणून रोवलेले निशाण व एक चिंचेचें झाड आद्याप या देवळांत आहे. सेवाभायाची समाधी पोहरादेवी येथेंच देवीच्या देवळाचें बाजूस आहे.


अकोला जिल्हा
राजकीय व स्वाभाविक विभाग
जिल्ह्याचें मुख्य ठिकाण
पोलिस स्टेशन
तहसिलीची सरहद्द
तहसिलीचे मुख्य ठिकाण
सातपुडा पर्वत
गाविलगड
डोंगर
हिवरखेड
आकोट
तेल्हारा
पोहरा
दहिहंडा
पूर्णा नदी
उरळ
उगवा
पारस
बाळापूर
अकोला
बोरगांवमंजू
मुर्तिजापूर
माना
किनखेड
कारंजा
पिंजर
महान
पातूर
बार्शीटाकळी
वनोज
मंगरूळ
जऊळका
मालेगांव
सारवरडोह
अरुणावती नदी
शिरपूर
वाशिम
आसेगाव
पाळोदी
पैनगंगा नदी
अनसिंग
रिसोड
उकळी
लोणी

# शासन व्यवस्था

**जिल्हा कार्यालय.**—शासन व्यवस्थेकरितां आकोला, आकोट, बाळापूर, मूर्तिजापूर, वाशिम व मंगरुळ असे सहा तालुके केले आहेत. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आकोला आहे. जिल्हाध्यक्ष हा जिल्ह्यांतील प्रमुख अधिकारी असून याच्या कार्यालयांत लोकल फंड, फायनान्स, ट्रेझरी, क्रिमिनल, रेव्हीन्य, लॅन्ड रेकॉर्डस्, एक्साइज, फूड, डेव्हलपमेंट, निर्वासितांचें पुनर्वसन, निर्वाचन, ग्रामपंचायत, अल्पबचत, सेन्सस असें विभाग असून ते जिल्हाध्यक्षाचे हाताखालीं असणाऱ्या डेप्यूटी कलेक्टरांकडे सोंपवलेले असतात. लोकल फंड सेक्शन स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण ठेवतो तर क्रिमिनल सेक्शनमार्फत बंदूकीचे परवानें वगैरे देण्याचें काम होते. लॅण्ड रेकॉर्ड सेक्शनमध्यें शेती व शेतमालकांची नांवें, त्यांचे हक्क वगैरेच्या नोंदी, पिकांची माहिती, पर्जन्यमान वगैरेच्या नोंदी वगैरे ठेवल्या जातात. फूड (अन्न) विभागामार्फत नियंत्रित, वस्तूंच्या वाटपाची व्यवस्था होते. पुनर्वसन विभाग निर्वासितांना द्यावयाची मदत व इतर प्रश्न सोडवतो, निर्वाचन विभाग मतदारांच्या याद्या दरवर्षी तपासून अद्यावत करतो व निर्वाचनाच्या वेळीं मतदानाची सर्व व्यवस्था करतो. एक्साइज विभागामार्फत नशाबंदीचा प्रचार, स्पिरिट, परदेशी दारू, नीरा, डेंजरस ड्रग्ज, अफू, गांजा, भांग इत्यादि मादक पदार्थांचे परवानें दिले जातात व त्यावर देखरेख ठेवली जाते. या विभागाचा प्रमुख डेप्युटी कलेक्टर नसून सुपरिंटेंडेंट ऑफ प्रोहिबीशन अॅण्ड एक्साइज असतो. गुमास्ता कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख व करमणुकीवरील कराची वसूली यांचेचकडे असते. विकास कार्याची व्यवस्था पाहण्यास एक खास अधिकारी असतो त्यास जिल्हा परियोजना अधिकारी म्हणतात.

### जिल्हा पंचायत मंडळ

ग्रामपंचायती स्थापन करण्यापासून त्यांच्या कामावर देखरेख करण्याची सर्व कामें पंचायत विभागातर्फे होतात. महाराष्ट्राचा ग्रामपंचायत कायदा विदर्भ विभागास लागू करण्यांत आला असून त्यानुसार यापुढें पंचांचे एक जिल्हा पंचायत मंडळ राहील व तें या विभागास वेळोंवेळीं सल्ला देईल.

तालुकास्तरावर प्रत्येक ठिकाणीं तहसील ऑफिस असून त्याठिकाणीं एक सब-डिव्हिजनल ऑफिसर-एक तहसीलदार व कांहीं नायब-तहसीलदार असतात व जिल्ह्याचे कार्यालयांत होणारी कामें तहसील स्तरावर ते करतात. प्रत्येक तहसीलचे रेव्हीन्यू सर्कल्स पाडले असून तेथें एक रेव्हीन्यू इन्स्पेक्टर असतो. तालुक्यांतील प्रत्येक गावास एक पटवारी व एक पाटील असतो. जिल्ह्यांत ३० रेव्हीन्यू सर्कल्स असून ५८९ पटवारी आहेत.

याशिवाय निरनिराळ्या शासन विभागाच्या जिल्हा प्रमुखांची कार्यालयें जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी असतात. आकोला येथें असलेली निरनिराळ्या विभागांची कार्यालयें व त्यांची कार्यें यांची माहिती खालीं दिली आहे.

**जिल्हा पुलिस कार्यालय** (प्रमुख.—जिल्हा पुलिस अधिक्षक)—**कार्य.**—संशयित वर्तनाचे इसम, दुराचारी व ज्ञात गुन्हेगार यांच्यावर पाळत ठेवणें, गुन्हे जास्त होत असतील अशा भागांतून गुन्हेगारांना पकडणें, गुन्ह्याचा शोध करून गुन्हेगारावर खटले भरणें, यात्रा, समारंभ, मिरवुणुकी वगैरे वेळीं शांतता रक्षण करणें व सार्वजनिक उपयोगाकरितां असलेल्या वाहनांना परवानें वगैरे देणें ही कामें या विभागामार्फत होतात. या कार्यालयाच्या हाताखालीं सब्-डिव्हिजनल पोलिस अधिकारी आहेत. ते त्यांच्या क्षेत्रांतील पोलिस स्टेशन्सवर देखरेख करतात. पोलिस स्टेशनचा प्रमख सब्-इन्स्पेक्टर असतो व आऊटस्टेशनचा प्रमुख हेडकॉन्स्टेबल असतो.

सरकारी नोकरांचे लांचलुचपतीचे गुन्हे शोधून काढणें, पकडणें व त्याबाबत खटले भरण्याकरितां याच विभागांतील अधिकाऱ्यांची एक भ्रष्टाचारविरोधी शाखा आहे. त्या शाखेंत काम करणारांने जिल्हा पोलिस अधीक्षकच्या नियंत्रणापासून अलिप्त ठेवलें आहे.

**सिव्हिल सर्जनचें कार्यालय** (प्रमुख—सिव्हिल सर्जन)—**कार्य.**—आकोला येथील मुख्य सरकारी दवाखान्याची व्यवस्था. जिल्ह्यांत असलेल्या इतर दवाखान्यांवर हेच देखरेख करीत असतात, पण जे दवाखाने प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांत समाविष्ट झाले ते जिल्हा स्वास्थ्य अधिकाऱ्याचे कक्षेंत देण्यांत आले आहेत. आकोला येथें स्त्रियांचें करितांहि एक खास दवाखाना असून तेथें स्त्रियांना औषधोपचार, शस्त्रक्रिया व प्रसूतीची व्यवस्था आहे.

**जिल्हा स्वास्थ्य कार्यालय** (प्रमुख—जिल्हा स्वास्थ्य अधिकारी)—**कार्य.**—संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध व नियंत्रण, स्वास्थ्य विभागाच्या कार्याचें संयोजन व नियंत्रण, स्थानिक स्वराज्य संस्थांना लोक-स्वास्थ्याचे रक्षणाचे कामांत मार्गदर्शन करणें, प्राथमिक स्वास्थ्य केंद्रें व संलग्न औषधालयांवर देखरेख करणें.

तालुकास्तरावर यांचें हाताखालीं एक हेल्थ असिस्टंट, एक सॅनिटरी इन्स्पेक्टर व एक सॅनिटरी पथक असतें व ते खेडयांत जावून स्वच्छता ठेवण्याचें प्रात्यक्षिक करून दाखवतात. महारोगावर उपचार करण्याकरितां यांचें हाताखालीं लेप्रसी असिस्टंटस् आहेत.

**जिल्हा कृषि कार्यालय** (प्रमुख—जिल्हा कृषि अधिकारी)—**कार्य.**—शेतकऱ्यांना शेतीविषयक सुधार-लेल्या पद्धतींची माहिती करून देणें, शुद्ध बियाण्यांची निपज व वाटप, रासायनिक खतांचा पुरवठा, शेतीची प्रात्यक्षिकें दाखवणें. तालुकास्तरावर ऑफिस नाहीं. प्रत्येक विकास खंडांत एक कृषि विस्तार अधिकारी असतो.

आकोला येथें एक सरकारी प्रायोगिक प्रक्षेत्र आहे. त्या ठिकाणीं या जिल्हयांत होणाऱ्या पिकांचें बाबतीत निरनिराळे प्रयोग केले जातात. तेथेंच सेंट्रल कॉटन कमिटीमार्फत एक कॉटन ब्रीडींग सेंटर आहे. ते विदर्भांतील हवामानास अनुकूल असें कापसाचें बी शोधून काढण्याचे प्रयोग करतें.

**डिव्हीजनल सॉईल कन्झर्व्हेशन कार्यालय** (प्रमुख—डिव्हिजनल सॉईल कन्झर्व्हेशन ऑफिसर)—**कार्य.**—जमीनीची बांधबदिस्ती करून धूप थांबवणें. या कार्यालयाचें क्षेत्रांत यवतमाळ, आकोला व बुलढाणा जिल्हे येतात. आकोला जिल्हयांत मंगरूळ तालुक्यांत सब्-डिव्हिजनल ऑफिस उघडलें असून बांधबंदिस्तीचे कार्य चालू आहे.

**असिस्टंट कन्सोलिडेशन अधिकाऱ्यांचे कार्यालय** (प्रमुख—असिस्टंट कन्सॉलिडेशन ऑफिसर)—**कार्य.**—शेतकऱ्यांचें अलग अलग असलेले लहान लहान तुकडे त्यांचे संमतीनें आपसांत बदलून देवून प्रत्येक शेतकऱ्याची जमीन एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करणें.

**जिल्हा पशुसंवर्धन** (प्रमुख—जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी)—**कार्य.**—गुरांचे रोगांवर प्रतिबंधक इलाज व जोपासना, चांगल्या नसलची पैदास वाढवणें, कृत्रिम रेतन केंद्रे चालवणें, देशी कोंबडयांची नसल सुधारणें, धंद्याकरितां उत्तम जातीच्या कोंबडया पुरवणें, गोशाळांना जनावरें विकत घेण्यास व जोपासना करण्यास मदत करणें, जिल्हयांतील दवाखान्यांवर देखरेख.

**वनमंडल कार्यालय** (प्रमुख—वनमंडल अधिकारी)—**कार्य.**—जंगलांचें संरक्षण करणें, कापणीकरितां कुप्स ठरवणें, नवीन झाडें लावणें, जंगलांत रस्ते तयार करणें, इमारती बांधणें व जंगलाचें उत्पन्न वसूल करणें.

**कार्यपालन यंत्री कार्यालय** (भवन तथा यातायात विभाग) [प्रमुख—कार्यपालन यंत्री (एक्झी-क्यूटिव्ह इंजिनियर)]—**कार्य.**—अस्तित्वांत असलेल्या सडकांची व सरकारी इमारतींची देखरेख व व्यवस्था ठेवणें, नवीन सडका व इमारतींची निर्मिती. या कार्यालयाखालीं आकोला येथें दोन व आकोट, वाशिम आणि मूर्तिजापूर येथें प्रत्येकी एक अशी सब-डिव्हिजनल ऑफिसेस आहेत.

**आकोला इरिगेशन सर्कल कार्यालय** (प्रमुख—सुपरिंटेंडिंग एंजिनिअर)—**कार्य.**—आकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा व यवतमाळ जिल्हयातील सिंचन प्रकलपांची अंमलबजावणीं व देखरेख.

**आकोला इरिगेशन प्रोजेक्ट डिव्हिजन कार्यालय** (प्रमुख—एक्झीक्यूटिव्ह इंजिनिअर)—**कार्य.**—आकोला जिल्हयांतील सिंचन प्रकल्पांची अंमलबजावणीं व देखरेख.

**मायनर इरिगेशन सब-डिव्हिजन** (प्रमुख—असिस्टंट इंजिनिअर)—**कार्य.**—मध्यम प्रतीच्या सिंचन प्रकलपांच्या जागांची पाहणी (तपास करणें).

**काटेपूर्णा प्रोजेक्ट सब-डिव्हिजन** (प्रमुख—असिस्टंट इंजिनिअर)—**कार्य.**—काटेपूर्णा प्रोजेक्टची अंमलबजावणी.

**एकबूर्जी टँक प्रोजेक्ट सब-डिव्हिजन** (प्रमुख—असिस्टंट इंजिनिअर)—**कार्य.**—एकबूर्जी टँक प्रोजेक्टची अंमलबजावणी.

**मोर्णा-निर्गुणा प्रोजेक्ट सब-डिव्हिजन** (प्रमुख—असिस्टंट इंजिनिअर)—**कार्य.**—मोर्णा-निर्गुणा प्रकल्पांच्या जागेची तपासणी.

**शिक्षणाधिक्षक, पश्चिम विभाग** (प्रमुख—शिक्षणाधिक्षक, पश्चिम विभाग, डी. एस. ई., वेस्ट बेरार डिव्हिजन)—**कार्य.**— आकोला व बुलढाणा जिल्ह्यांतील दुय्यम शाळा, बेसिक ट्रेनिंग कॉलेजेस यांच्यावर देखरेख करणें, अनुदान देणें, मान्यतेकरितां शिफारस करणें व दोन्ही जिल्ह्यांतील शाळा निरीक्षकांच्या कार्यावर देखरेख करणें.

**जिल्हा शाळा निरीक्षक** (प्रमुख—जिल्हा शाळा निरीक्षक)—**कार्य.**—प्राथमिक शाळा व आठव्या वर्गापर्यंतच्या दुय्यम शाळांचें निरीक्षण, अनुदान, मान्यतेकरितां शिफारस करणें, समाज शिक्षण, ग्रामीण वाचनालयें वगैरेवर देखरेख. शिक्षणाबाबतचे विकास कार्यांत संवर्ग विकास अधिकाऱ्यांस मार्गदर्शन करणें.

**जिल्हा शाळा निरीक्षिका** (प्रमुख—जिल्हा शाळा निरीक्षिका)—**कार्य.**—जिल्हा शाळा निरीक्षक जें कार्य करतात तेंच कार्य आकोला व बुलढाणा जिल्ह्यांतील मुलींच्या शाळांच्या बाबतींत करणें

**डिस्ट्रिक्ट डेप्यूटी रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज** (प्रमुख—डिस्ट्रिक्ट डेप्यूटी रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज)—**कार्य.**—इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज व इतर सर्व क्षेत्रांत सहकारी संस्था स्थापन करणें व त्यांना आर्थिक मदत देणें. शेतीविषयक संस्था यांचेच कक्षेंत येतात. शेतकऱ्यांनी आपल्या मालावर प्रक्रिया करण्यास संस्था काढल्यास ती यांचेच कक्षेंत येते. सहकारी संस्थावर देखरेख करणें व अशा संस्थाकरितां ऑफिसर्स व मेंबर्सचें प्रशिक्षण करणें.

**असिस्टंट डायरेक्टर ऑफ कॉटेज इंडस्ट्रीज अँण्ड असिस्टंट रजिस्ट्रार, इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज कार्यालय** (प्रमुख—असिस्टंट डायरेक्टर ऑफ कॉटेज इंडस्ट्रिज अँण्ड असिस्टंट रजिस्ट्रार, इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज)—**कार्य.**—ग्रामोद्योग व लघु उद्योग सुरूं करण्याचा प्रयत्न करणें. सुरूं असलेल्या ग्रामोद्योगांना तांत्रिक, आर्थिक व विक्रीकरीतां मदत करणें. ग्रामोद्योग सहकारी संस्थांची संघटना करणें व रजिस्टर करणें.

महाराष्ट्र राज्यांत या कार्यालयाची पुनर्घटना झाली असून औद्योगिक सहकारी संस्था व हातमाग विकास योजना ह्या सहकारी खात्याकडे सोपविण्यांत आल्या असून ग्रामोद्योग व लघु उद्योगाच्या इतर योजनांची अंमलबजावणी उद्योग विभागाकडे आहे.

**असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ मनिलेंडर्स** (प्रमुख—असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ मनिलेंडर्स)—**कार्य.**—मुंबई सावकारी कायदा, १९४६, खाली सावकारी धंदा करणाऱ्यांना लायसेन्सची शिफारस रजिस्ट्रारकडे करणें, सावकार त्रास देत असल्याची ऋणकोनें तक्रार केल्यास त्याची चौकशी व शक्यतो इलाज करणें, परवान्याशिवाय कोणी सावकारी करतो काय हें शोधणें, यांचें हाताखालीं दोन इन्स्पेक्टर ऑफ मनिलेंडर्स आहेत.

**टेक्स्टाइल ऑफिसर, पॉवरलूम्स फॉर कॉटेज इंडस्ट्रीज अँड इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्हज कार्यालय** (प्रमुख—टेक्स्टाइल ऑफिसर, पॉवरलूम्स फॉर कॉटेज इंडस्ट्रीज अँण्ड को-ऑपरेटिव्ह ऑफिसर)—**कार्य.**—सहकारी संस्थांना दिलेल्या पॉवरलूम्सना तांत्रिक मार्गदर्शन करणें. उदा. माग विकत घेवून देणें, व्यवस्थित चालतात किंवा नाहीं तें पाहणें वगैरे. यांचें परिक्षेत्र विदर्भ व मराठवाड्याचे पूर्ण जिल्ह्यांत आहे. यांचे हाताखालीं टेक्निकल ऑफिसर, त्याचे खालीं टेक्निकल असिस्टंट व त्याचे खालीं टेक्निकल जॉबर असतो.

**औद्योगिक निरीक्षकाचें कार्यालय** (प्रमुख—औद्योगिक निरीक्षक)—**कार्य.**—आकोला शहरांत वजनमाप कायद्याची अंमलबजावणी, फॅक्टरी अँक्टखालीं रजिस्टर झालेल्या उद्योगधंद्यांना स्टेट एड टू इंडस्ट्रीज अॅक्टखालीं कर्ज देणें व वसूल करणें, कोणत्याहि उद्योगधंद्यास (घरगुती धंदे धरून) लागणारा कच्चा माल जर परदेशांतून मागवावा लागत असेल तर त्याकरितां आवश्यकतेचें प्रमाणपत्र देणें.

(शंभरपेक्षां कमी माणसे व एक लाख रुपयापेक्षां कमी भांडवल असलेले धंदे या ऑफिसच्या कक्षेंत येतात.) जी वजनें बाजारांत वापरली जातील ती वजनमाप कायद्याप्रमाणें स्टॅन्डर्ड आहेत किंवा नाहीं तें तपासून देणें, व तयार करण्यांत आलेल्या वजनांवर शिक्के मारून देणें.

**निर्माण निरीक्षक कार्यालय** [प्रमुख—निर्माणी निरीक्षक (इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज)]—**कार्य**.—निर्माणी कायद्याचें (फॅक्टरीज अॅक्ट) व वेतन चुकवणी कायद्याचें (पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट) व बाळंतपणाचा लाभ (मॅटरनिटी बेनिफिट अॅक्टचें) कायद्याचें पालन होते किंवा नाहीं तें पाहणें, कारखान्यांत अपघात झाला असता कामगारास नुकसान भरपाई मिळवून देण्याची मदत करणें व सल्ला देणें.

या कार्यालयाच्या क्षेत्रांत आकोला, अमरावती, बुलढाणा व यवतमाळ हे जिल्हे येतात.

**लेबर ऑफिसरचें कार्यालय** (प्रमुख—लेबर ऑफिसर)—**कार्य**.—मजूरविषयक परिस्थितीवर लक्ष ठेवणें, कामगारांच्या व गुमास्त्यांच्या वैयत्तिक तक्रारीची दखल घेणें, किमान वेतनाच्या कायद्याची व गुमास्ता कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाहीं हें पाहणें, सी. पी. अॅण्ड बेरार इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस् अॅक्टप्रमाणें तडजोड घडवून आणणें, कामगार कल्याण केंद्रावर देखरेख करणें.

आकोला व बुलढाणा या दोन जिल्ह्याचा कारभार हें ऑफिस पाहतें.

**ड्रग इन्स्पेक्टर्स ऑफिस** (प्रमुख—ड्रग इन्स्पेक्टर, आकोला)—**कार्य**.—औषधि तयार करणाऱ्या कारखान्यांतून औषधि ठराविक दर्जाची तयार होते किंवा नाहीं हें पाहणें, औषधि विकणाऱ्या दुकानांत ड्रग अॅक्टप्रमाणे व्यवस्था आहे किंवा नाहीं हें पाहणें, औषधिचे दुकान काढण्याकरितां आलेल्या अर्जाची चौकशी करून लायसेन्स देण्या अगर न देण्याबद्दल शिफारस करणें, खोटचा व अवास्तव गुण आहेत अशा आशयांच्या जाहिराती (उदा. नपुंसकतेवर खात्रीलायक उपाय वगैरे) तसेंच दैवी शक्तीचें रोग बरे करण्याच्या यंत्र, ताईत वगैरेच्या जाहिरातीची चौकशी करून वरती कळवणें. ड्रग्ज अॅक्ट फक्त अॅलोपथिक औषधांनाच लागतो. आयुर्वेदिक वा इतर औषधांना लागत नाहीं. परिक्षेत्र आकोला, बुलढाणा जिल्हे.

**समाजसेवा विभाग** (प्रमुख—जिल्हा समाज सेवा अधिकारी)—**कार्य**.—अनुसूचित जातीकरितां असलेल्या कल्याणकारी योजना, अनुसूचित जनजातीचे लोकांकरितां असलेल्या कल्याणकारी योजना, व इतर कल्याणकारी योजनानुसार ज्या सवलती जनतेस मिळतात त्या या कार्यालयामार्फत मिळतात. इतर कल्याणकारी योजनानुसार आर्थिकदृष्टचा मागासलेले लोक, बहिरे, मुके, बालगुन्हेगार, समाज सेवा करणाऱ्या संस्था, आखाडे, कवि, नाटककार, लेखक इत्यादिंना मदत मिळूं शकते. याच विभागामार्फत आकोला येथें मूकवधिर विद्यालय व बालसुधारगृह अशा दोन संस्था सुरूं आहेत.

**मूक बधीर विद्यालय**.—ही संस्था दिनांक १५ मार्च १९५८ रोजीं आकोला येथें सुरूं झाली. यांत फक्त मूक आणि बधिर विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यांत येतो व त्यांना हिअरिंग एडच्या साह्यानें ऐकणें व हावभावांच्या साह्यानें उच्चार करावयास शिकविण्यांत येते. याशिवाय शालेय शिक्षण व कांहीं कला शिकविण्यांत येतात. आकोला येथें सध्यां विणकाम व सुतारकामाची सोय आहे. ९ ते १४ वर्षे वयाच्या मुलांना प्रवेश मिळूं शकतो, प्रवेश देण्यापूर्वी मुलाची मानसिक व शारीरिक परीक्षा घेतली जाते. शिक्षणक्रम एकूण सहा वर्षाचा आहे. परगांवच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहाची सोय आहे. विद्यार्थ्यांचा राहण्याचा व खाण्याचा खर्च सरकार करते. वसतिगृहांत सकाळीं दूध, दुपारी जेवण व मधल्या वेळीं फराळास मिळते. सणास गोड जेवण मिळते. सध्यां संस्थेंत ३७ विद्यार्थी आहेत. त्यांत दोन मुली आहेत. विद्यार्थ्यांना कवाइत शिकविण्याकरितां एक शिक्षक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक रीतिनें लक्ष देण्यांत येतें. विदर्भ विभागांत ही अशा प्रकारची एकच संस्था आहे.

**बालसुधारगृह**.—ही संस्था आकोला येथें दोन वर्षापूर्वी स्थापन झाली परंतु तिचें कार्य मात्र आताच सुरूं झालें. हें सी. पी. अॅण्ड बेरार चिल्ड्रेन्स अॅक्टप्रमाणें स्थापन झालें असून याचा प्रमुख एक प्रोबेशन ऑफिसर असतो. १६ वर्षाचे आंतील अनाथ, निराश्रित, भटकी, अवखळ, उन्मार्गगामी, गुन्हेगार मुलें व मुली त्याचप्रमाणे गुन्हेगारांच्या संगतींत असलेली, वेश्या व्यवसायांत असलेली, गुन्हा करण्यास प्रवृत्त करण्याच्या मार्गावर असलेली, नैतिकदृष्ट्या अधःपतन होण्याचा संभव असलेली, आईवडील तुरूंगांत गेल्यामुळें

उघडी पडलेली, दारूच्या नशेमुळें जे पालक मुलांवर योग्य ताबा व देखरेख करूं शकत नाहीत अशा मुलांना जुव्हेनाइल कोर्टासमोर आणलें जाते व त्यांची संपूर्ण चौकशी होईपर्यंत त्यांना बालसुधारगृहांत पाठविलें जाते. तेथें प्रोबेशन ऑफिसर त्यांची आर्थिक स्थिती, कौटुंबिक स्थिती व मानसिक स्थिती वगैरेची हळूवारपणानें चौकशी करून त्यांचेबाबत काय निर्णय घ्यावा हें कोर्टास सुचवितों. ज्या मुलांना योग्य रीतीनें सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारावयास पालक तयार असतील त्यांना पालकांकडे परत पाठविण्यांत येतें. जेथें हें शक्य नसेल त्यांना सर्टिफाइड स्कूलमध्यें पाठविलें जाते. तेथें त्याला त्याच्या आवडीनिवडीप्रमाणें शालेय शिक्षण व धंदेशिक्षण देण्यांत येवून समाजांत उत्तम नागरीक म्हणून जगण्यास पात्र करण्यांत येतें. बाल-सुधारगृहांत असतांना देखील मुलांना शालेय शिक्षण, शिस्तीनें राहण्याचें वळण, व्यायाम, मनोरंजन वगैरेची सोय असते. विदर्भ विभागांत नागपूर व आकोला येथें रिमांड होम असून लवकरच प्रत्येक जिल्ह्यांत अशा तऱ्हेचें सुधारगृह होणार आहे.

**जिल्हा प्रसिद्धि कार्यालय** (प्रमुख—जिल्हा प्रसिद्धि अधिकारी)—**कार्य**.—देशांत चालूं असलेल्या विविध विकास योजनांची माहिती चलत् चित्रपटाद्वारें व इतर प्रकाशित साहित्यांचें द्वारें जनतेस करून देणें, प्रसिद्धि विभागानें आयोजित केलेल्या योजना जिल्ह्यांत कार्यान्वित करणें.

**डिस्ट्रिक्ट एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कार्यालय** (प्रमुख—डिस्ट्रिक्ट एम्प्लॉयमेंट ऑफिसर)—**कार्य**.—ज्यांना नोकरी पाहिजे अशांची नोंद करणें व ज्या सरकारी कार्यालयांना नोकर पाहिजे असतील त्यांन त्यांच्या मागणीप्रमाणें नोकर सुचवणें. खाजगी मालकांना ही मागणी केल्यास नोकर सुचवले जातात.

**रूरल ब्रॉडकास्टींग कार्यालय** [प्रमुख—(रेडियो) सुपरवायझर रुरल ब्रॉडकास्टिंग, आकोला]—**कार्य**—ग्रामीण रेडिओ योजनेप्रमाणें खेड्यांत रेडिओ सेटस् बसवणें व त्यांची देखरेख दुरुस्ती वगैरे करणें सप्टेंबर १९६१ पावेतों २०० रेडिओ या कार्यालयाकडून खेडे विभागांस देण्यांत आले.

**विक्रीकर कार्यालय** (प्रमुख—विक्रीकर अधिकारी)—**कार्य**.—सेल्स टॅक्स अॅक्टप्रमाणें कर बसवणें व वसूल करणें, मोटार स्पिरिट अॅक्टप्रमाणें पेट्रोल वगैरेवर कर वसूल करणें. सेंट्रल सेल्स टॅक्सप्रमाणें देखील हेंच कार्यालय कर बसवते व वसूल करते.

**डिस्ट्रिक्ट स्टॅटिस्टिकल ऑफिस (जिल्हा सांख्यिकी कार्यालय)** (प्रमुख—जिल्हासांख्यिकी अधिकारी)—**कार्य**.—जिल्ह्यांतील निरनिराळ्या बाबींची आंकडेवारी जमा करून जिल्ह्याची त्या बाबत काय परिस्थिती आहे, तें दाखवणें. जिल्ह्यांत चालूं असलेल्या विकास कार्याच्या प्रगतीचें मोजमाप आकडे-वारींत करणें.

**मलेरिया मेडिकल युनिट कार्यालय** (प्रमुख—मलेरिया मेडिकल ऑफिसर)—**कार्य**.—मलेरिया निर्मूलन योजनेनुसार जिल्ह्यांत सर्व दूर डी. डी. टी. फवारणें, आजाऱ्यांचें रक्त घेवून तपासणीकरितां पाठवणे वगैरे.

**डिस्ट्रिक्ट सोलजर्स, सेलर्स व एअरमेन्स बोर्ड** (प्रमुख—जिल्हाध्यक्ष, पण प्रत्यक्ष काम पाहण्या-करितां सेवानिवृत्त असा संरक्षण दलांतील अधिकारी सेक्रेटरी म्हणून नियुक्त केला जातो)—**कार्य**.—सेवा-निवृत्त, सैनिक, नाविक व वैमानिकांना सेवानिवृत्तीनंतर त्यांची वृत्ती चालविण्यास मदत करणें, ते अडचणींत असल्यास त्या निवारण करण्याचा प्रयत्न करणें, मृत सैनिकांच्या कुटुंबाना मदत करणें, सध्यां नोकरींत असणाऱ्यांबद्दल संरक्षण दलानें माहिती विचारल्यास ती पुरवणें, त्यांच्या कुटुंबाच्या हिताचें त्यांचे गैरहजेरींत संरक्षण करणें.

**जिल्हा ग्रंथपाल कार्यालय** (प्रमुख—जिल्हा ग्रंथपाल)—**कार्य**.— जिल्ह्यांतून जी वाचनालयें अगर संस्था आहेत त्यांना वाचनाकरितां पुस्तकें पुरवणें, खेड्यापाड्यांतून शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळें ज्यांना वाचतां येवूं लागलें आहे अशांना पुस्तकें पुरवून त्यांना पुनःनिरक्षर न होवूं देणें व अशारीतीनें ज्ञानाचाहि प्रसार करणें हे यांचे मुख्य काम आहे. शहरांतील लायब्ररीजना देखील हे पुस्तकें पुरवतात.

**विद्युत् मंडळ कार्यालय** [प्रमुख—एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर (विद्युत्)]—**कार्य**.—जिल्ह्यांत ज्या ज्या ठिकाणाहून विजेच्या पुरवठ्याची मागणी असेल ती पुरवणें, बोर्डाच्या (मंडळाच्या) योजनेनुसार निरनिराळ्या गावांना वीज पुरवठा करण्याची सोय करणें, वीज असलेल्या ठिकाणी तिची व्यवस्था, देखरेख, ग्राहकांकडून वसूली वगैरे करणें.

**पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन कार्यालय** (प्रमुख—असिस्टंट चॅरिटी कमिश्नर अॅन्ड असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ सोसायटीज)–**कार्य**.—सहकारी संस्था सोडून व खेळाच्या संस्था सोडून इतर सर्व रजिस्टर्ड सोसायटयांचें कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवणें तसेंच सार्वजनिक धर्मादाय निधीवर (Charitable Public Trust) देखरेख व नियंत्रण ठेवणें.

या शिवाय या जिल्ह्यांत भारत सरकारची इन्कम टॅक्स, सेंट्रल एक्साइज, सेंट्रल पी. डब्ल्यू. डी., सेंट्रल रेल्वे, सिव्हिल एव्हीएशन, पोस्टल सुपरिटेंडेंट, टेलिफोन एक्स्चेंज, टेलिग्राफ ऑफिस व लाइफ इन्शुअरन्स कार्पोरेशन इतकी कार्यालयें असून सर्वांच्या कचेऱ्या आकोल्यांतच आहेत.

# न्याय व्यवस्था

दिवाणी मुकदमे चालविण्याकरितां तालुका पातळीवर ज्युनिअर डिव्हिजन सिव्हिल जजेस आहेत. त्यांच्या निकालावर अपील डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन्स जज्जकडे होते. हें कोर्ट जिल्ह्यांत एकच असून आकोला येथें आहे. डिस्ट्रिक्ट जज्जास कांहीं बाबतींत ओरिजनल ज्युरिसडिक्शन देखील आहे. यांच्या मदतीस असिस्टंट जज्ज, ॲडिशनल सेशन्स जज्ज व सिनिअर डिव्हिजन सिव्हिल जजेस असतात. यांचीं कार्यालयें जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणींच असतात. डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन्स जज्ज धरून सर्वांवर अधिकार हायकोर्टाचा चालतो.

फौजदारी खटले चालविण्याचे अधिकार पूर्वी रेव्हीन्यू अधिकाऱ्यांकडे असत. पण आतां त्यांचेकडून ते काढून घेतले असून त्यांकरितां तालुका पातळीवर सिव्हिल जजकडे दिले आहेत. त्यांचे निकालावरील अपील सेशन्स जज्जकडे होते.

दिवाणी व फौजदारी मुकदम्यांतील डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन्स जज्जाचे निर्णयावरील अपील हायकोर्टाकडे होते.

मुलकी म्हणजे शेतीसंबंधी मुकदमे तहसील पातळीवर तहसीलदार व नायब-तहसीलदार यांचेकडे चालतात. त्यांचे निर्णयावर अपील तेथेंच उपविभागीय अधिकारी (एस्.-डी. ओ.) यांचेकडे चालतात. व त्यांचे निर्णयावरील अपील जिल्हाध्यक्षाकडे होतात.

खेड्यांतील झगडे तेथेंच मिटावे म्हणून न्यायपंचायती स्थापन करण्यांत आल्या असून त्यांना किरकोळ स्वरूपाचे फौजदारी खटले व शंभर रुपयांपर्यंतचे दिवाणी दावे चालविण्याचे अधिकार देण्यांत आले आहेत. फौजदारी खटल्यांत फक्त ५० रुपयांपर्यंत दंड करण्याचाच अधिकार न्यायपंचायतींना आहे. तुरूंगाची शिक्षा देण्याचा अधिकार नाहीं. न्यायपंचायतीसमोरील कामांत वकील ठेवण्याची परवानगी नाहीं. न्यायपंचायतीच्या निकालावर फक्त रिव्हिजन करण्याचा अधिकार असून ती डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन्स जज्जकडे चालते. रिव्हिजनमध्यें वकील ठेवतां येतो.

# स्थानिक स्वराज्य व्यवस्था

## नगरपालिका

आकोला, आकोट, बाळापूर, मूर्तिजापूर, वाशिम, मंगरूळ, कारंजा, पातूर व तेल्हारा अशा ९ ठिकाणीं नगरपालिका असून त्या सर्वांच्या क्षेत्रांत मिळून २६२,७५६ लोकसंख्या म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २२ लोकसंख्या (१९६१ च्या गणतीनुसार) येते. या सर्व कमिटया म्युनिसिपल ॲक्टनुसार स्थापन झाल्या असून त्यांचे सभासद नागरिकांनी निवडून दिलेले असतात.

गांवांतील स्वच्छता, रस्ते, दिवाबत्ती, प्रायमरी शिक्षण व आरोग्य रक्षणाची व्यवस्था ही यांची मुख्य कामें असून तीं सगळ्याच कमिटया करतात. वाढत्या लोकसंख्येमुळें व नवीन विचारामुळें गावांत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणें, मुलांकरितां उद्यानें व क्रीडांगणें निर्माण करणें, प्रसूतिगृह, बालक मंदिरें वगैरे सुरू करणें, भंग्यांना सफाईकरितां नवीन साधनें देणें वगैरे कामांकडे कमिटयांचें लक्ष वेधलें गेलें आहे. विजेच्या दिव्यांची सोय सर्वच म्युनिसिपालिटयांतून झालेली असून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था फक्त आकोला म्युनिसिपल कमिटीनेच केली आहे. आकोला शहर हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण व व्यापाराचें मुख्य केंद्र असल्यामुळें त्या दर्जास शोभेल अशी गांवाची व्यवस्था करण्यांत कमिटी प्रयत्नशील आहे. रहदारी नियंत्रणाकरितां विजेच्या दिव्यांचा वापर करणारी विदर्भ विभागांत आकोला नगरपालिका पहिली आहे. रहदारी नियंत्रणाच्या व्यवस्थेंत सगळ्या महाराष्ट्रांत आकोल्याचा तिसरा नंबर लागतो. प्रत्येक रस्त्यावर त्याचें नांव व लांबी असलेले फलक लावले असून हें आकोला नगरपालिकेचें वैशिष्टच सांगता येईल. रस्त्यांना नांवें देतांना स्थानिक प्रसिद्ध व्यक्तींचीहि आठवण ठेवली आहे.

## जनपद सभा

नगरपालिकांचें क्षेत्र सोडून राहिलेल्या ग्रामीण भागांतील व्यवस्था ठेवण्याकरितां प्रत्येक तालुक्यास एक याप्रमाणें आकोला, आकोट, बाळापूर, मूर्तिजापूर, वाशिम व मंगरूळ अशा सहा जनपदसभा स्थापन करण्यांत आल्या आहेत. जनपद याचा अर्थ प्रदेश. या सभेंतील सभासद तालुक्याच्या निरनिराळ्या विभागांतून निवडून आलेले असतात. नगरपालिकेचे कांही सभासद यावर पालिकेंकडून पाठविले जातात. कार्यावर देखरेख व अंमलबजावणी करण्याकरिता सरकारतर्फे डेप्यूटी कलेक्टरच्या दर्जाचा एक अधिकारी मुख्य कार्यपालन अधिकारी म्हणून दिलेला असतो. साधारणतः तालुक्याचा उपविभागीय अधिकारी (एस्.-डी. ओ.) हाच जनपद सभेचा मुख्य कार्यपालन अधिकारी असतो. तहसिलदार हा जनपद सभेचा उपकार्यपालन अधिकारी असतो.

दोन गांवांमधील रस्ते, खेडेविभागांतील शिक्षण, दवाखानें, बाजार, यात्रा वगैरेची व्यवस्था ठेवणें हें यांचें मुख्य काम आहे. याकरितां त्यांना कांहीं कर बसविण्याचा अधिकार आहे. पण जास्ती उत्पन्न त्यांना सरकारी देणग्यांचेच आहे. या जनपदसभा १९४८ च्या कायद्यानें जुन्या मध्यप्रदेशांत स्थापन झाल्या व त्या अद्यापपावेतों विदर्भ विभागांत चालू आहेत. यापूर्वी प्रत्येक तालुक्यास एक लोकल बोर्ड व त्यावर जिल्ह्याकरितां जिल्हा बोर्ड असे. त्याऐवजीं प्रत्येक तालुक्याचा संबंध सरळ कलेक्टरशी यावा व कार्यांत व्यवस्थितपणा यावा म्हणून जनपदसभांची स्थापना करण्यांत आली.

## ग्रामपंचायती

या जिल्ह्यांत ग्रामपंचायतीच्या क्षेत्रांत सर्व खेडीं आलीं असून त्यांना मुंबईचा ग्रामपंचायतींचा कायदा नुकताच लागू करण्यांत आला आहे. नगरपालिकेची आपापल्या क्षेत्रांत जी स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती वगैरे कामें आहेत तीं कामें ग्रामपंचायत आपलें क्षेत्रांत तर करतेच पण त्याशिवाय विकास कार्याच्या योजनांची अंमलबजावणी आपापल्या क्षेत्रांत घडवून आणण्याचीहि जबाबदारी तिच्याकडेच दिली आहे. त्यामुळें ग्रामीण जीवनांत तिचें स्थान नगरपालिका किंवा जनपदसभा यांच्यापेक्षां महत्त्वाचें आहे. गांवांचें सगळ्या बाबतीतील पुढारीपण ग्रामपंचायतीकडे आलें आहे. तिला करांचें उत्पन्न फारसें असू शकत नाहीं सबब सरकारनें ग्रामपंचायत क्षेत्रांतील वायद्याची $\frac{1}{4}$ रक्कम ग्रामपंचायतीला आपल्या खर्चाकरितां अनुदान

देण्यास सुरुवात केली आहे. शिवाय विकास खंडाकडूनदेखील पंचायतींना निरनिराळ्या कामांकरितां मदत देण्यांत येतें. ग्रामीण जीवनांत सामाजिक, आर्थिक क्रांती घडवून आणण्यांत त्यांचा फार मोठा वाटा राहणार आहे. सेक्रेटरीचें काम सांभाळण्याकरितां सरकारकडून प्रत्येक ग्रामपंचायतीस एक ग्रामसाहाय्यक देण्यांत आला असून त्याचा पगार सरकारकडून दिला जातो.

ग्रामपंचायतीचे सभासद क्षेत्रांतील नागरिकांनी निवडून दिलेले असतात. जिल्ह्यांतील एकूण ग्रामपंचायतींची संख्या ८६५ आहे.

# शेतकी अर्थव्यवस्था

आकोला हा शेतीप्रधान जिल्हा आहे. यांत एकूण २,६०९,३९६ एकर जमीन असून तिची उपयोगाच्या दृष्टीनें मुख्यत: वाटणी १९५९-६० सालात खालीलप्रमाणें होती :—

| प्रकार | | १९५९-६० |
|---|---|---|
| जंगलाखालीं ... ... ... ... ... | | २१७,३३७ |
| ओसाड (वहितीस अयोग्य) ... ... ... | | ०९७,४४५ |
| बिगरशेतीच्या उपयोगांत ... ... ... ... | | ०८३,६८९ |
| वहितींत येण्यासारखी पडीत ... ... ... | | ०१७,५२५ |
| कायम चराईचीं कुरणें ... ... ... ... | | १४८,५८६ |
| झाडांखालीं ... ... ... ... ... | | ००१,३३३ |
| त्या वर्षी पडीत राहिलेली ... ... ... .. | | ०३२,२१९ |
| पांच वर्षेंपर्यंत पडीत असलेली व इतर कारणानें पडीत पडलेली ... | | १२०,२५३ |
| एकूण वहितीखालीं असलेली ... ... ... | | १,९०५,०१६ |
| एका वर्षी एका पिकाखालीं ... ... | १,८९१,०२९ | |
| एका वर्षी एकापेक्षां जास्त पिकांखालीं ... | १३,९८७ | |

जिल्ह्यांतील एकूण ९५०,९९४ लोकसंख्येपैकीं ७१८,९५४ लोक शेतीवर अवलंबून आहेत. जमीन-मालकाची एकूण सख्या १४९,७४१ असून लागवडीखाली असलेली जमीन २,१४८,३४७ एकर आहे. शतमालकापैकी १३०,६११ शतकऱ्यांजवळ मिळून फक्त ८७०,३४८ एकर जमीन आहे. तर उरलेल्या १९,१३० शेतकऱ्यांची मिळून १,२७७,९९९ एकर जमीन आहे. म्हणजे शतकऱ्यांपैकी १३ टक्के लोकाच्या मालकीची ८० टक्के जमीन आहे. व ८७ टक्के शेतकऱ्याच्या मालकीची फक्त सुमारें २० टक्के जमीन आहे. आकोट तालुक्यातील जमीन सर्वांत उत्तम समजली जाते. एक वर्षापूर्वी जमीनधारणची कमाल मर्यादा ठरवण्याकरिता नेमलेल्या कमिटीनें आकोट तालुक्यात कोरडवाहू २४ एकर जमीन ही फॅमिली होल्डींग म्हणजे कुटुब निर्वाह क्षेत्र म्हणून ठरवली. आकोटशिवाय इतर तालुक्यातील जमीन हलकी आहे. पण सगळ्या जिल्ह्याकरिता कुटुब निर्वाह क्षेत्र २४ एकराचें धरलें तरी १३०,६११ शेतकऱ्यापकी फक्त ४०० शतकऱ्याजवळ कुटुब निर्वाह क्षेत्रापुरती जमीन आहे. व १२६,६०० शेतकऱ्यापैकी प्रत्येकाजवळ कुटुब निर्वाह क्षेत्रापेक्षा दखील (२४ एकरापेक्षां) कमी जमीन आहे.

फक्त ११,८२८ शेतकऱ्यांजवळ २५ पासून ५० एकरांपर्यंत जमीन आहे. ५० ते १०० एकर जमीन असणाराची सख्या ४,८९५ आहे. १०० एकरांच्यावर जमीन धारण करणारांची संख्या

फक्त २,४०७ आहे. जमीन धारण करणाऱ्या शेतमालकांची त्यांच्या जमीन धारणेंप्रमाणें वर्गवारी खालीलप्रमाणें आहे :—

| वर्गीकरण | जमीन धारण करणाऱ्या खातेदारांची संख्या | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| | | एकर |
| १ एकराखालील | १३,११३ | ०७,४४३ २३ |
| १ ते २½ एकर . | २४,६९८ | ४३,५५३.३० |
| २½ ते ५ एकर . | ३०,७६९ | ११२,६५०.६९ |
| ५ ते ७½ एकर . | १८,४२७ | ११३,१४३.८ |
| ७½ ते १० एकर .. | १२,८५८ | ११०,९२५.२४ |
| १० ते १२½ एकर .. | ०९,१२० | १०१,५११.५५ |
| १२½ ते १५ एकर .. | ०६,६५१ | ०९०,९८५.८ |
| १५ ते १७½ एकर .. | ०५,०८४ | ०८२,५८८.८७ |
| १७½ ते २० एकर .. | ०४,००७ | ०७६,०८० ६३ |
| २० ते २५ एकर .. | ०५,८८४ | १३१,४४६.५३ |
| २५ ते ३० एकर .. | ०४,००१ | १०९,५२१.३४ |
| ३० ते ३५ एकर .. | ०२,९४६ | ०९५,२८९.७७ |
| ३५ ते ४० एकर .. | ०२,०५९ | ०७६,८८०.८१ |
| ४० ते ४५ एकर .. | ०१,५५५ | ०६५,८१३.२१ |
| ४५ ते ५० एकर .. | ०१,२६७ | ०५९,७४९.४२ |
| ५० ते ६० एकर .. | ०१,८२१ | ०९९,९०१.५३ |
| ६० ते ७५ एकर .. | ०१,६६४ | १११,५०३.६४ |
| ७५ ते १०० एकर .. | ०१,४२० | १२२,७५८ ९१ |
| १०० ते १५० एकर .. | ०१,२३७ | १५१,००६.०३ |
| १५० ते २०० एकर .— | ००,४७२ | ०८१,७०८.५१ |
| २०० ते ३०० एकर .— | ००,३५७ | ०८७,१९०.३३ |
| ३०० ते ५०० एकर .— | ००,२१२ | ०८०,९२९.२५ |
| ५०० ते १,००० एकर. — | ००,०९० | ०६०,१७३.८० |
| १,००० एकरांवरील .. | ००,०३९ | ०७६,३७३.२५ |
| एकूण ... | १४९,७४१ | २,१४८,३४७.०० |

आकोला जिल्ह्यांतील जमीन उत्तम सुपीक असली तरी सर्वसाधारण शेतकरी गरीब आहे. २५ ते ५० एकरांपर्यंतचे शेतकरी आपला प्रपंच कसातरी भागवूं शकतात. ५० ते १०० एकरांपर्यंतचे लोक साधारण बऱ्या स्थितींत राहूं शकतात. व १५० एकरांच्या वरील शेतकरीच फक्त चांगल्या स्थितींत राहून आपल्या मुलांचें उच्च शिक्षण करूं शकतात. कुटुंबनिर्वाहापेक्षां कमी जमीन असलेल्या १२६,६०० शेतकऱ्यांना आपल्या उदरनिर्वाहाकरितां मजूरी अगर इतर जोडधंदा पहावा लागतो याचमुळें बहुतेक लोक खेडें सोडून शहरांत रिक्षा, नोकरी वगैरेकरितां जातात किंवा हॉटेल, पानठेले वगैरे लावतात. परिणामस्वरूप शेतीवर मजूरी करणारांची बरीचशी संख्या हॉटेलसारख्या अनुत्पादक धंद्यांत गुंतली असून शेतीच्या कामाकरितां मजुरांचा तुटवडा भासतो. व वेळेवर काम न झाल्यामुळें पिकांना नुकसान पोंचतें व वाढत्या मजुरीमुळें शेतकऱ्याचा खर्च वाढतो.

१९५१ च्या शिरगणतीप्रमाणें ७५.५ टक्के लोक शेतकरी आहेत. त्यांपैकीं २९.८५ टक्के स्वत:ची मालकीची जमीन करणारे आहेत, ६.९५ शेतकरी सवस्वी दुसऱ्यांच्या मालकीची जमीन वाहणारे आहेत, ३६.१ शेतकरी शेतमजूरी देखील करतात व फक्त: २.६ टक्के लोक स्वत : जमिनीवर न खपतां नुसता खंड

वसूल करतात. बहुतेक शेतकरी खेड्यांत राहतात. शहरांत राहणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या फक्त ६·०२ आहे.

शेतीशिवाय इतर रीतींनें उपजीविका करणाऱ्यांची संख्या २४.५ आहे. यांपैकीं शेतीशिवाय इतर उत्पादन करणारे ७.६ टक्के, व्यापारी ६.४ टक्के, दळणवळणांत १.६ टक्के, व इतर नोकरींत ८.९ टक्के आहेत. या २४.५ टक्क्यांपैकीं १५.९२ टक्के लोक शहरांत राहतात व त्यांच्यापैकीं ४.५ लोक इतर उत्पादनांत, ४.८ व्यापारांत, १.४ दळणवळणांत व ५.२२ इतर नोकरींत आहेत.

### पिकें

खरीपांत कापूस, ज्वारी व भुईमूग व रब्बींत गहूं हीं पिकें जिल्ह्यांत मुख्य आहेत. याशिवाय तूर, उडीद, मूग, बाजरी, हरभरा, तीळ, जवस, लाख, ऊस वगैरे देखील पेरलीं जातात. गेल्या दोन वर्षांत खरीप व रब्बीच्या पिकांची पेरणी खालीलप्रमाणें होती :—

| | १९५८-५९ एकर | १९५९-६० एकर |
|---|---|---|
| **खरीप** | | |
| अन्नधान्यें ... ... ... | ८२२,४९९ | ७८१,३४३ |
| न खाण्याचीं पिकें ... ... ... | ९१९,५६६ | ८९७,१५९ |
| **रब्बी** | | |
| अन्नधान्यें ... ... ... | १५३,५७४ | १९९,६६० |
| न खाण्याचीं पिकें ... ... ... | २३,१२५ | २६,८५६ |

रब्बीचा पेरा प्राधान्येंकरून आकोला, आकोट व वाशिम तालुक्यांतील कांहीं भागांतच फक्त आहे.

निरनिराळ्या पिकांखालीं गेल्या दोन वर्षांत कसलेली जमीन व दर एकरीं उत्पादन खालील तक्त्यांत दाखविलीं आहे :—

| धान्य (१) | १९५८-५९ (आंकडे एकरांत) (२) | दरएकरीं उत्पादन (आंकडे पौंडांत) (३) | १९५९-६० (आंकडे एकरांत) (४) | १९५८-५९ वाढ किंवा घट (५) | दर एकरीं उत्पादन (आंकडे पौंडांत) (६) |
|---|---|---|---|---|---|
| तांदूळ ... | १८,०८३ | २९४ | १८,८११ | + | ३७१ |
| गहू ... ... | १२२,२८४ | ७५२ ओलीत<br>३७६ बिन-ओलीत. | १४७,१६६ | + | ५८० ओलीत.<br>३२१ बिन-ओलीत. |
| ज्वार ... ... | ६०१,९४९ | ४२१ | [५६०,९८६ | — | ४७९ |
| बाजरी ... | १३,७६३ | ३१६ | १२,१५६ | — | २७१ |
| हरभरे ... | ३०,३२७ | ३३२ | ४३,७४५ | + | ३३६ |
| तूर ... ... | ७६,८२८ | २४१ | ७५,७९८ | — | २०० |
| मूग ... ... | २३,७९४ | १३२ | २०,९०३ | — | १३३ |
| उडीद ... | ७३,६७८ | १३२ | ७४,९८९ | + | १३२ |
| भुईमूग ... | १११,०१५ | २४४ | [१०१,००३ | — | ३४४ |
| तीळ ... ... | ७,६४५ | २०३ | ६,८६८ | — | १८० |
| जवस ... ... | २०,५८० | २२३ | २३,५३८ | + | १९३ |
| कापूस ... | ७८७,५०२ | १६८ | ७८२,२१६ | — | ६९ अति-पावसानें पीक बुडालें. |
| लाख ... ... | ४,५१५ | ३०१ | ४,९२२ | + | २९० |
| ऊस ... ... | ४१६ | २,२२५ | ३७७ | — | १,८९० |

## फळें

आंब्यांच्या फळांकरितां हा जिल्हा प्रसिद्ध आहे. आकोट, पातूर, वाशिम, मालेगांव हीं ठिकाणें आंब्यांकरितां प्रसिद्ध समजलीं जात असून जिल्ह्यांभरांतून आंब्यांच्या झाडांची संख्या ८७,११९ व त्याखालीं क्षेत्रफळ ६५९ एकर आहे. कागदी लिंबाचीं ७,४३१ झाडें असून त्याखालचें क्षेत्रफळ १९५९-६० सालांत ७५ एकर आहे. १९५८-५९ सालांत तें ३९ एकर होतें. केळीचा पेरा हा सर्वांत जास्त आहे. १९५९-६० सालांत केळीचीं १६७,३०९ झाडें असून त्यांनी ५१८ एकर जमीन व्यापली होती. याशिवाय पपई, संत्री, जांब, बोर यांचीहि बरीच झाडें असून नारळाचीं फक्त ३२ व चिक्कूची फक्त ४९ झाडें आहेत. मोसंबीच्या झाडांची संख्या बरीच घटली असून १९५८-५९ सालीं त्याखालीं असलेलें २५६ एकर क्षेत्रफळ १९५९-६० सालीं फक्त ७५ एकरावर आलें. द्राक्षांची लागवण आकोला येथे गेल्या वर्षीपासून सुरू झाली असून त्याखालील क्षेत्र सध्यां फक्त तीन एकर आहे. १९६०-६१ सालांत पुणें येथें भरलेल्या द्राक्षांच्या प्रदर्शनांत येथील द्राक्षांना दुसऱ्या नंबरचें बक्षिस मिळालें. या जिल्ह्यांतील द्राक्षांच्या लागवडीची ही प्रयोगावस्था आहे.

## ओलीत

कालवे, पाटबंधारे यांद्वारा ओलीताची सोय या जिल्ह्यांत अद्याप नाहीं. सिंचनाचें कांहीं प्रकल्प सध्यां सुरू झाले आहेत ते तिसऱ्या योजनेच्या काळांत पूर्ण होतील. सध्यां ओलीत होतें तें फक्त विहीरीच्या पाण्यावर. जिल्ह्यांत एकूण ३४,४९१ विहीरी असून त्यांपैकीं २५,८९५ विहीरी फक्त पिण्याच्या पाण्याकरितांच वापरल्या जातात. उरलेल्यांपैकीं ५,१२१ विहीरी सध्यां उपयोगांत नाहींत. व फक्त ३,४७५ विहीरीवर ओलीत होतें. याचा उपयोग आजपर्यंत मुख्यतः भाजीपाल्याचें पीक घेण्यांत होत असे. विजेची सोय झाल्यापासून विहीरीवर पंप बसवले जात आहेत. जिल्ह्यांत एकूण पंप ३५९ व ऑईल इंजिनें ४२५ आहेत. व त्यामुळें कापूस व गहूं देखील ओलीतावर घेण्याकडे लोकांचा कल होवूं लागला आहे. गेल्या दोन वर्षांत ओलीताखालील क्षेत्रफळ खालीलप्रमाणें होते :—

| धान्य | आंकडे (एकरांत) | |
|---|---|---|
| | १९५८-५९ | १९५९-६० |
| तांदूळ ... ... ... | ६ | ५ |
| गहूं ... ... ... ... | १३६ | ५९९ |
| मका ... ... ... ... | २४ | १० |
| हरभरे ... ... ... | ३ | १ |
| मिर्ची ... ... ... | २,०२५ | १,९४७ |
| हळद ... ... ... | ६७ | ११० |
| बटाटे ... ... ... | ३ | ५ |
| कापूस ... ... ... | ६ | २०० |
| एरंडी ... ... ... | १०० | ३० |
| तंबाखू ... ... ... | ... | २ |
| कडचाळ (चाऱ्याकरितां ज्वारी) ... | १३१ | ५५ |
| एकूण ... | ६,६१२ | ७,०४८ |

वाशिम तालुक्यांत रिसोड व हरळ येथील तळ्यांतून अनुक्रमें १०० व ८५ एकर ओलीत होवूं शकतें परंतु प्रत्यक्ष ओलीत मात्र सध्या होत नाहीं. कारंजा येथील तळें देखील ओलीताच्या उपयोगाचे होवूं शकते. या तीनहि तळ्यांतून ओलीताकरितां पाणी घेण्यास शेतकऱ्यांस प्रवृत्त करण्यांत येत आहे.

## विकासाचे प्रयत्न

विकास योजना सुरू झाल्यापासून शेतीचें उत्पादन वाढविण्याकरितां कृषि विभागाकडून बरेच प्रयत्न करण्यांत येत आहेत. कृषि विभागाच्या निरनिराळ्या योजना जिल्ह्यांत सुरू असून त्यांची संक्षिप्त माहिती खालीं दिली आहे :—

**खतांचें वांटप.**—या योजनेखालीं शेतकऱ्यांना कंपोस्ट खताचे खड्डे पद्धतशीर रीतीनें भरावयास उद्युक्त करण्यांत येवून त्याचीं प्रात्यक्षिकें दाखविण्यांत येतात. शेणाचा खताकडे जास्तीत जास्त उपयोग करण्यास सांगण्यांत येते व शिवाय दरवर्षी रासायनिक खताची मागणी पाहून त्याप्रमाणें इतर ठिकाणांहून मागवून तीं पुरवण्याचा प्रयत्न केला जातो. म्युनिसिपालिटया व ग्रामपंचायतींना देखील कंपोस्ट खत तयार करण्यास प्रवृत्त करण्यांत आले आहे. लोकांना याचें महत्त्व पटलें असून उत्तरोत्तर कंपोस्ट खतांच्या खड्ड्यांची संख्या वाढती आहे. जिल्ह्यांत एकूण २३,८७४ कंपोस्ट खताचे खड्डे आहेत. १९६०-६१ सालांत जून अखेरपर्यंत ९ म्युनिसिपालिटया व ४ ग्रामपंचायतींनीं मिळून १,३९४ टन कंपोस्ट खत तयार केलें. हिरवें खताकरितां १,२५० बंगाली मण तागाचें बी वाटण्यांत आलें. या वर्षी खालील रासायनिक खतांचें वाटप करण्यांत आलें :—

| खत | टन | ह. | क्वा. | पौंड. |
|---|---|---|---|---|
| अमोनियम सल्फेट ... ... ... ... | १,१८८ | ० | ० | ० |
| यूरिया .. ... ... ... ... | ३८ | १९ | २ | २० |
| सुपर फॉस्फेट ... ... ... ... | ३० | १२ | ० | ० |
| अमोनियम सल्फेट, नायट्रेट ... ... ... | ३४४ | १७ | ० | ० |
| नायट्रो फॉस्फेट ... .. ... ... | १ | ३ | ० | ० |
| अमोनियम सुपर फॉस्फेट .. ... ... | ११७ | ५ | ० | ० |

रासायनिक खतें सेवा सहकारी संस्थांमार्फत तकावी रुपानें वाटण्याची पद्धत सुरू झाली आहे. याशिवाय व्यापाऱ्याकडूनहि शेतकरी लोक विकत घेतात.

**सुधारलेल्या बियांचें वांटप.**—सरकार प्रमाणित सुधारलेलें बी वापरण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त केलें जातें. उत्तम बियाणांचा भरपूर पुरवठा व्हावा म्हणून प्रत्येक विकास खंडांत एक याप्रमाणें बियाण्यांची १३ शेतें सुरू करण्यांत आलीं. आकोला व वाशिम येथें एक एक प्रायोगिक क्षेत्र आहे. तेथें जिल्ह्यांत होणाऱ्या पिकांच्या बाबतींत प्रयोग केले जातात. व शेतकऱ्यांना नवीन बी सुचवलें जातें. कापसाचें ९७-३, १९७-३ (विरनार), बूरी ३९४ व १४७ बी वापरलें जातें. ज्वारीकरितां शासन प्रमाणित सावनेरचें बी वापरलें जातें. एन. जे. १६४ ही नुकतेच सुरू झालें आहे. भूईमुगाकरितां ए. के. १२-२४ वापरतात. तसेंच गव्हाकरितां बन्सीपल्ली, हायब्रीड ६५ आणि विजय वापरण्यांत येतें. वाशिम येथें गव्हाच्या बियांचें संशोधन करण्याकरितां नवीनच केंद्र सुरू झालें आहे. आकोला येथें सेंट्रल कॉटन कमिटीच्यामार्फत कापसाच्या बियाचें संशोधन केंद्र सुरू आहे. बियाणें पेरण्यापूर्वी जंतूनाशकें लावण्यास सांगण्यांत येतें. आतां बियाणें वाटतांनाच त्यांना जंतूनाशकें लावून देण्याची प्रथा सुरू झाली आहे. सुधारलेलें बियाणें वापरणें व त्यांना पेरतांना जंतूनाशकें लावणें व खतांचा वापर करणें हें शेतकऱ्यांच्या अंगवळणी पडू लागलें आहे.

**ट्रॅक्टर स्टेशन.**—४० हार्स पॉवरचे ट्रॅक्टर्स असलेलीं दोन स्टेशनें १९५६-५७ पासून दरवर्षी जिल्ह्यांत उघडली जातात. आतांपर्यंत गायगांव, घुसर, उगवा, कापशी व माना येथें मिळून सुमारें वीस हजार एकर जमीन नांगरून दिली गेली. यावर्षी अडगांव व बोरगांव मंजू येथें स्टेशनें उघडलीं जातील.

नांगरणाचा भाव एकरीं ३० रुपये असून तितकी तकावी गरजू शेतकऱ्यांना देण्यांत येते. याशिवाय कित्येक शेतकऱ्याजवळ स्वतःचे ट्रक्टर्स असून तेही इतराची शेती नागरून देतात.

**पीक संरक्षण.**—रोगापासून पिकांचें संरक्षण करण्याकरितां कृषि अधिकाऱ्याजवळ ३ पॉवर डस्टर्स, ३ पावर स्प्रेअर्स, १४० हॅण्ड अॅण्ड फूट स्प्रेअर्स, ५०६ हॅंड डस्टर्स व ३६ पॉवर डस्टर्स-कम्-स्प्रेअर्स आहेत. यानी शेतकऱ्याच्या पिकांवर डस्टिंग व स्प्रेइंग करून दिलें जाते. १९६०-६१ साली २५,००० एकरांवर स्प्रेइंग करून दिलें. याशिवाय प्रत्येक ग्रामपंचायतीस व सेवा सहकारी संस्थांस हीं साधनें आपलेजवळ ठेवावयास लावून शेतकऱ्याना भाड्याने देण्याची सोय उपलब्ध करून देण्यांत येत आहे. यावर्षी आकोल्याला टोळधाडीच्या वेळी या साधनांचा बराच उपयोग झाला. व त्यामुळे पिकाचें म्हणण्यासारखें नुकसान टोळधाडीपासून होवूं शकलें नाहीं. १९६१-६२ सालात शेतकऱ्यांना दर एकरीं १० रुपयेप्रमाणें मदत करण्याचें आकोला सट्रल का-ऑपरेटिव बॅंकनें ठरविलें असून जंतूनाशकाचा साठा जिल्ह्यांत ठिकठिकांणीं करण्यात आला आहे.

**जमीन ओलीताखाली आणणें.**—शेतकऱ्यांना अन्नधान्यांचीं पिकें ओलीतावर घेण्यास प्रवृत्त करण्यांत येत असून कापूस व गव्हाची पिकें वाढत्या प्रमाणावर ओलीतावर येत आहेत. १९५८-५९ सालीं ओलीताचा गहूं १३६ एकरात होता तो १९५९-६० सालीं ६०० एकर झाला. तसेंच १९५८-५९ सालीं ओलीताखाली कापूस फक्त ६ एकरात होता तो १९५९-६० सालीं एकदम २०० एकर झाला. उपयोगात नसलेल्या विहीरी देखील उपयोगात आणण्याचा प्रयत्न होत आहे.

**शेतकी प्रात्यक्षिक केंद्रं.**—निरनिराळ्या प्रगतिशील शेतकऱ्यांना त्यांचेच शेतांत विवक्षित तुकडा सुधारलेल्या पद्धतीखालीं वहित करण्यास राखून ठेवण्यास सांगितला जातो व त्याची लागवड कृषि विभागाच्या मार्गदर्शनानुसार करून घेण्यात येते. याप्रमाणें सुधारलेल्या पद्धतीचे फायदे प्रत्यक्ष रीतीनें शेतकऱ्यास दाखविले जातात. अशा प्रकारची ११० केंद्रं १९६०-६१ सालात राखून ठेवण्यात आलीं आहेत.

**पीक स्पर्धा.**—पीकांचें उत्पादन वाढविण्याकरितां खरीप व रब्बी पिकांच्या स्पर्धा तालुकास्तरावर ज्वारीचे बाबतीत घेतल्या जातात. निरनिराळ्या पिक स्पर्धांचे निकाल व त्यांचें एकरीं उत्पादन खालीं दिलें आहे:—

**ज्वारी पीक स्पर्धा १९५८-५९ (तालुकास्तरावर.)**

| पहिल्या बक्षिसाचे मानकरी | एकरीं उत्पादन |
|---|---|
| | पौंड |
| (१) मोतीराम पुंजाजी गावंडे, रा. कोठारी, आकोला तहसील ... ... | ३,८४० |
| (२) बाळकृष्ण धारस्कर, रा. हिरपूर, मूर्तिजापूर तहसील ... ... | ४,५०० |
| (३) महमद निजामुद्दीन, बाळापूर, तहसील बाळापूर ... ... ... | ४,६१६ |
| (४) महादेव गोपाळराव देशमुख, रा. रौंदळा, तहसील आकोट ... ... | २,७६० |
| (५) लक्ष्मण जातूजी गुजन, रा. उकळीपेंड, तहसील वाशिम ... ... | ४,०४९ |
| (६) भगीरथ श्रीकिसन बजाज, रा. मंगरूळ, तहसील मंगरूळ ... ... | ५,१४१ |

१९५९-६० मध्ये स्पर्धा झाल्या नव्हात पण १९६०-६१ मध्ये कारंजा, वाशिम, बार्शी टाकळी, तेल्हारा, बाळापूर, रिसोड व मालेगाव येथे खंडस्तरावर ज्वारीच्या स्पर्धा व जिल्हास्तरावर स्पर्धा होणार आहेत.

**भुईमूग पीक स्पर्धा १९५८-५९ (तालुकास्तरावर)**

| पहिल्या बक्षिसाचे मानकरी | एकरीं उत्पादन |
|---|---|
| | पौंड |
| (१) प्रभाकर श्रीराम सुपासे, रा. आकोट ... ... ... ... | २,५६० |
| (२) भास्कर दिनकर खानझोडे, रा. कुरणखेड, तहसील आकोला ... | २,१४६ |

१९६०-६१ मध्यें आकोट सोडून इतर पांच तहसीलीत ही स्पर्धा होईल.

## रब्बी पीक स्पर्धा

रब्बी पीक स्पर्धा १९५९-६० पासून सुरू झाली. त्या प्रथमवर्षी जिल्हास्तरावर घेण्यांत येवून त्यांत श्री. मोतीराम नुजाजी गावंडे, रा. कोठारी, ता. आकोला, यांनी एकरीं १८ मण ८ पौंड उत्पादन करून १ लें बक्षिस मिळविलें व श्री. हनुमंतराव बापूराव देशमूख, रा. संजापूर, तालुका मूर्तिजापूर, यांनी १७ मण ८ पौंड उत्पादन करून २ रें बक्षिस मिळविलें.

## जिल्ह्यास बक्षीस


१९५८-५९ सालीं गव्हाचें उत्पादन त्यापूर्वीच्या तीन वर्षांच्या सरासरी उत्पादनापेक्षां १५ टक्क्यांपेक्षां जास्त केल्याबद्दल जिल्ह्यास भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाकडून १०,००० रुपयांचें बक्षिस मिळालें आहे. विदर्भांत या बक्षिसाचे मानकरी झालेल्या आकोला, अमरावती व यवतमाळ या तीन जिल्ह्यांत आकोल्याचा पहिला क्रमांक लागला. आकोला जिल्ह्यांतील रब्बी उत्पादन ३० टक्क्यानी वाढलें होतें.

गेल्या दोन वर्षांत झालेलें पीकवार उत्पादन खालील तक्त्यांत दर्शविलें आहे :—

| धान्य<br>(१) | १९५८-५९<br>(आंकडे टनांत)<br>(२) | १९५९-६०<br>(आंकडे टनांत)<br>(३) |
|---|---|---|
| तांदूळ ... ... | २,३५९ | २,४०५ |
| गहू ... ... ... | १७,७२७ | २५,३७१ |
| ज्वार ... ... ... | १४४,३६० | ११६,९८२ |
| बाजरी ... ... | १,९९९ | १,२५२ |
| हरभरा ... ... | ४,७९२ | ६,७१९ |
| मूग ... ... ... | १,४०२ | १,१७० |
| कापूस ... ... | १७२,२३७ | १७४,२३२ |
| भुईमूग ... ... | १२,०९३ | १६,५२७ |
| तीळ ... ... ... | ६८४ | ५५१ |
| जवस ... ... ... | १,९६४ | १,४४२ |
| तूर ... ... ... | ८,२७० | ६,५९४ |
| उडीद ... ... ... | ४,४१९ | ४,७६६ |
| ऊस ... ... ... | ४१८ | ३२२ |

**सघन वहितीचे प्रयत्न.**—सुधारलेल्या सर्वच पद्धति वहितींत उपयोगांत आणणें याला सघन वहिती ( Intensive Cultivation ) म्हटलें जातें व त्यांपैकीं फक्त काहीं पद्धति अंमलांत आणणें याला विस्तृत वहिती ( Extensive Cultivation ) म्हटलें जातें. ज्यांना शक्य असेल त्याना सघन वहिती करण्यास लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सुधारलेलें बियाणें वापरणें, चौफुली पद्धतीनें पेरणें, पेरण्यापूर्वी बियाण्यास जंतूनाशकें लावणें, खतांचा वापर करणें, पीकसंरक्षक फवारे वगैरे मारून घेणें या गोष्टी सघन वहिती पद्धतीत येतात. सन १९५९-६० व १९६०-६१ सालीं सघन वहितींत असलेल्या शेतीचें प्रमाण खालीलप्रमाणें होते :—

| धान्य<br>(१) | १९५९-६०<br>(२) | १९६०-६१<br>(३) |
|---|---|---|
| | एकर | एकर |
| कापूस ... ... | १,०१८ | २३,८२७ |
| ज्वार ... ... ... | ३१,२७७ | ३५,९०२ |
| भुईमूग ... ... | १,६८७ | २,४६१ |



अकोला जिल्हा
कृषि व पशु संवर्धन
आकोट
वडाळी
मुंडगाव
पणज
भटोरी
सिरसो
मूर्तिजापूर
कुरूम
अकोला
कामरगाव
कापशी
पातूर
आलेगांव
बाळापूर
पारस
पोहा
कारंजा
कारंजा
कारंजा
शेलू खु.
वाढा
मंगरूळ
कोंडोळी
मानोरा
आसगांव
विठोली
किन्हिराजा
मालेगाव
केनवड
कारंजा
वाशीम
चिंचांबापेन
वनोजा
रिसोड
केकतउमरा
राजेगांव
सरकारी प्रायोगिक क्षेत्रे
बीज उत्पादन क्षेत्रे
गुरांचे दवाखाने
कुक्कुट पालन केंद्र
पशुसुधार व कृत्रिम रेतन केंद्र
पशुसुधार व कृत्रिम रेतन उपकेंद्र
गुरांचे बहिर्वर्ती दवाखाने
पशु संवर्धन केंद्र

**हिशेब ठेवण्याच्या स्पर्धा.**—५० एकरांचे आंतील जमीन वहित करणाऱ्या शेतकऱ्यांना आपले शेतीचे जमा खर्चाचे हिशेब ठेवण्याची संवय लागावी म्हणून या स्पर्धा सुरूं करण्यांत आल्या आहेत. या स्पर्धां-करितां विदर्भ व मराठवाडा मिळून १३ जिल्ह्यांचा एक विभाग कल्पिला आहे. हिशब ठेवण्याचे दोन प्रकार ठेवले आहेत. आकोला जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी यांत भाग घेवून पहिली बक्षिसें मिळवलीं आहेत त्यांचीं नांवें :—

| | १९५७-५८ | | रुपये |
|---|---|---|---|
| (१) | हनुमंतराव बापूराव देशमुख, रा. संजापूर, ता. मूर्तिजापूर | १ लें बक्षिस ... | ३०० |
| (२) | बाळकृष्ण महादेव धारस्कर, रा. संजापूर, ता. मूर्तिजापूर ... | २ रें बक्षिस .. | २०० |
| (३) | लक्ष्मणराव नागोराव देशमुख, रा. अंदुरा, ता. बाळापूर ... | ३ रें बक्षिस ... | १०० |
| | **१९५८-५९ प्रकार (अ)** | | |
| (१) | मधुकर झांगोजी सराफ, रा. संजापूर, ता. मूर्तिजापूर ... | २ रें बक्षिस ... | २०० |
| (२) | बाळकृष्ण रावजी राजगुरे, रा. हिरपूर, ता. मूर्तिजापूर ... | ३ रें बक्षिस ... | १०० |
| | **प्रकार (ब)** | | |
| (१) | मोतीराम पुंजाजी गावंडे, रा. कोठारी, ता. आकोला ... | १ लें बक्षिस ... | ३०० |
| (२) | उत्तमराव विठोबा, रा. हिरपूर, ता. मूर्तिजापूर ... ... | ३ रें बक्षिस ... | १०० |

(१०) **कृषि विद्यालय.**—तिसऱ्या योजनाकालांत एक मांजरी पद्धतीचें कृषि विद्यालय निघण्याचें घाटत आहे.

## धारा पद्धति

जिल्ह्यांत सर्वत्र रैयतवारी पद्धति आहे. शेतमालकास कायदेशीर भाषेंत जरी लॅण्डहोल्डर म्हटले असले तरी शेताच्या विक्रीचे, गहाण टाकण्याचे वगैरे सर्व मालकी हक्क त्याला आहेत. जिल्ह्यांतील कांहीं गांवें जहागीर होतीं पण तीं खालसा झालीं असून तेथेंहि रैयतवारी पद्धतीस सुरूवात झाली. शेतमालकास शेताचा आकारलेला सारा सरकारांत भरावा लागतो. साऱ्याची आकारणी अगदीं प्रथम इ. स. १८६५ सालीं झाली. त्यानंतर फेरआकारणी १८९७ सालीं झाली. १९२५ सालीं फेरआकारणीचें काम पुनः सुरूं झालें होतें व त्याप्रमाणें आकोला, आकोट व बाळापूर तहसीलींत फेरआकारणी होऊन पूर्वीच्या दीडपट सारा आकारण्यांत आला. इतर तालुक्यांतून फेरआकारणीचें काम परिस्थितीमुळें स्थगित झालें. साधारणतः दर तीस वर्षांनीं फेरआकारणी होत असते. संपूर्ण आकोला जिल्ह्याचें वायद्याचें उत्पन्न तालुकावार खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणें आहे :—

(आकडे रुपयांत)

| तालुका | | वायदा | कोतवाल पट्टी | जनपद पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| अकोला | ... | ८,०९,०३६.७१ | १,०१,०६८.०६ | १,२५,८०३.८० | १०,३५,९०८.५७ |
| आकोट | ... | ८,४६,५३७.९२ | १,०५,४६८.८० | १,३०,८१०.४८ | १०,८२,८१७.२० |
| बाळापूर | ... | ५,१६,२२७.७८ | ६४,४६५.७८ | ८०,५३३.८४ | ६,६१,२२७.४० |
| मूर्तिजापूर | ... | ४,६८,४८२.३३ | ५८,३७९.४२ | ७२,६८९.६० | ५,९९,५५१.३५ |
| वाशिम | ... | ४,४८,३६९.५२ | ५५,७४८.५० | ६९,६९१.३६ | ५,७३,८०९.३८ |
| मंगरूळ | ... | १,९०,९९०.७२ | २३,५२७.७५ | २९,५२६.३५ | २,४४,०४४.८२ |
| एकूण | ... | ३२,७९,६४४.९८ | ४,०८,६५८.३१ | ५,०९,०५५.४३ | ४१,९७,३५८.७२ |

## भू-संरक्षण

जमिनीची झीज रोखण्याकरितां भू-संरक्षणाचें कार्य मार्च १९६० पासून जिल्ह्यांतील मंगरूळ तालुक्यांत सुरूं झालें. त्यापूर्वी या प्रकारचें कार्य आकोला जिल्ह्यांत मुळींच नव्हतें. १९६०-६१ सालाकरितां ६,१०० एकरांवर समपातळी बांध घालण्याचें निश्चित करण्यांत आलें होतें व

५,५०० एकरांवरील काम पूर्ण झालें होतें. या भागांत ही नवीनच योजना असल्यामुळें तिची प्रगति सुरूवातीस मंद आहे. या योजनेनुसार सरकारी खर्चानें बांध घालण्यांत येतात व ती रक्कम शेतकऱ्यांकडून पंधरा हप्त्यांत वसूल करण्यांत येते. चालूं वर्षांत जुलै अखेरपर्यंत आणखी ४,६५६ एकरांवर बांध घालण्यांत आले. ८,२७२ एकरांवर बांध घालण्यास शेतमालकांनी संमति दिली असून त्यापैकीं २,२०० एकर जमिनीचे, प्लॅनस तयार झाले आहेत व २,००० एकराची प्लॅनची तयारी चालूं आहे.

### तुकडेबंदी

शेतीचे लहान लहान तुकडे वहितीकरितां किफायतशीर पडत नसल्यामुळें निरनिराळ्या भागांत विखुरलेले एकाच शेतकऱ्याचे लहान लहान तुकडे संबंधित शेतकऱ्यांच्या शेताचे बदलींत देवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना आपली सगळी जमीन एकत्र करून देण्याचा प्रयत्न करण्याकरितां असलेला दी बॉम्बे प्रीव्हेंशन ऑफ फ्रॅगमेंटेशन व कन्सॉलिडेशन ऑफ होल्डिंग्ज अ‍ॅक्ट, १९४७, हा विदर्भ विभागास लागूं करण्यांत आला असून आकोला तालुक्यांतील आगर, वदलापूर, कांचनपूर, टाकोड, भोड, खडकी, टाकळी, मोरगांव-भाकरे, भाकराबाद, कानडी, सुकोडा व धामणा इतक्यां बारा ठिकाणीं हें काम प्रथम सुरूं झालें आहे. शेतांच्या बदलीकरितां प्रथम हक्कनोंदणी रजिस्टर अद्यावत दुरुस्त करण्याचें काम चालूं असून पांच गांवांतील रजिस्टर्स दुरूस्त झाले आहेत व त्यांपैकीं दोन गांवांतील शेतांच्या बदलीच्या योजना तयार झाल्या असून लवकरच जाहीर होतील. आणखी दोन गांवांतील बदलीच्या योजनाहि लवकरच तयार होतील.

### अवजार सुधारणेंबद्दल बक्षिसें

शेतीच्या जुन्या अवजारांत संशोधन करून सुधारलेलीं अवजारें बनविल्याबद्दल आकोल्याचे श्री. श्रीरामशेठ लहरिया व श्री. रामभाऊ भागवत यांना इंडियन कौन्सिल ऑफ अ‍ॅग्रिकल्चर रिसर्च, दिल्ली, यांचेकडून बक्षिसें मिळालीं आहेत.

### श्रीराम डवरा

श्री. श्रीरामशेठ लहरिया हे एक विचारवंत शेतकरी असून शेतीच्या अवजारांत सुधारणा करून ती अधिक उपयुक्त बनवण्याचे त्यांचे प्रयत्न गेल्या वीस वर्षांपासून सुरूं आहेत. १९५७ सालीं इंडियन कौन्सिल ऑफ अ‍ॅग्रिकल्चर रिसर्च या संस्थेने आयोजित केलेल्या शेतींच्या अवजारांचे स्पर्धेत त्यांनी आपला डवरा पाठविला व त्याची तपासणी होवून तो सर्वांत उत्तम ठरल्याबद्दल त्यांना रिचर्स कौन्सिलतर्फे ५०० रुपयांचें पहिलें बक्षिस मिळालें.

निरनिराळ्या पिकांच्या दोन ओळींतील अंतर निरनिराळें असल्यामुळें त्यांच्याकरितां सध्यां निरनिराळे डवरे वापरावे लागतात पण श्रीराम डवऱ्यांत निरनिराळ्या लांबीच्या व निरनिराळ्या प्रकारच्या पासा बसवून त्यांचा कोन (angle) पाहिजे तसा जुळवून घेण्याची सोय असल्यामुळें एकाच डवऱ्यानें सगळीं कामें होवूं शकतात व त्यांचा कोन जुळवून घेण्याकरितां डवऱ्याची लांबी वगैरे विचारांत घेण्याचा प्रश्नच उरत नाहीं. श्रीरामशेठ डवऱ्यांचें पेटंट घेण्याचे प्रयत्नांत असून त्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याच्या विचारांत आहेत.

### भागवत मळणी यंत्र

श्री. रामभाऊ भागवत हे स्वत: उत्तम शेतकरी आहेत. यांना देखील निरनिराळे प्रयोग करून पाहण्याचा नाद असून त्यांनी स्वत:च्या प्रयत्नानें एक मळणी यंत्र तयार केलें आहे. लोखंडी पत्र्यांचा एक चौरस चबुत्रा तयार केला असून त्यावर चुन्याच्या घाणीच्या चाकासारखी दोन चाकें फिरण्याची व्यवस्था केली आहे. हा चबुत्रा एका चार फूट उंचीच्या स्टॅण्डवर बसविला असून चाकें मनुष्याकरवीं किंवा विजेनें फिरण्याची व्यवस्था आहे. त्यांत एक तासांत एक पोतें ज्वारी तयार होऊन त्यास फक्त आठ आणे खर्च येतो. हें यंत्र एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सहज हालवितां येतें. इंडियन कौन्सिल ऑफ अ‍ॅग्रिकल्चर रिसर्च या संस्थेनें आयोजित केलेल्या स्पर्धेत या यंत्राचा भारतांत दुसरा नंबर लागून तें तयार करण्याबद्दल श्री रामभाऊ भागवत यांस ७०० रुपये बक्षिस देण्यांत आले.

### जमीन वितरण

सरकारी मालकीची लागवडींत आणण्यासारखी १५,००० एकर जमीन भूमिहीनांना नुकतीच वाटण्यांत आली.

# पशुसंवर्धन

जिल्हयांतील सर्व जमीन कोरडवाहू असून बैलांच्या साहाय्यानेंच वहित केली जाते. १९५८-५९ मध्यें जिल्हयांतील एकंदर गुरांची संख्या ८४२,६५६ होती त्यापैकीं बैल २२१,३५५, गाई १८७,७९७ व म्हशी ५६,५८० होत्या. १९५५-५६ मध्यें जनावरांची सर्वांत जास्त संख्या म्हणजे ९१०,५२२ होती व तेव्हांपासून ती दरवर्षी सारखीं कमी होत आहे. १९५१ च्या शिरगणनेशी ताळून पाहतां ती शेंकडा ३२०नी कमी झाली आहे. जनावरांच्या चराईकरितां असलेलें क्षेत्र देखील दरवर्षी कमी होत आहे. जनावरांना चरण्याकरितां पूर्वी शेतांच्या धुऱ्यावर जागा ठेवीत असत पण अधिक धान्य पिकविण्यासाठीं लोकांनी त्याहि जागा पिकाखालीं घेतल्या आहेत.

जनावरांची शारीरिक स्थिती देखील साधारणत: बरी नाहीं. पूर्वी एका जोडीनें होणाऱ्या शेतीच्या कामाचे जे आराखडे ठरले होते तितकें काम एका जोडीकडून आतां होत नाहीं.

### की व्हिलेज सेंटर्स (पशु सुधार केंद्र)

जनावरांकरितां १० फुलफ्लेज्‌ड दवाखाने असून २५ आऊटलाइंग दवाखाने आहेत व २ ग्रुप व्हिलेज सेंटर्स व ११ की व्हिलेज सेंटर्स आहेत. प्रत्येक की व्हिलेज सेंटरच्या क्षेत्रांत आजुबाजूचीं कांहीं गांवें समाविष्ट केलेलीं असतात. त्या गांवांत असलेल्या इतर गोऱ्हयांना खच्ची करण्यांत येऊन सुधारलेल्या जातीचे वळू निपज करण्याकरितां ठेवण्यांत येतात. कृत्रिम रेतन केंद्राची सोय केली जाते. रोग प्रति-बंधक व रोग निवारण उपायांची सोय असते. शेतकऱ्यांना कंपोस्ट पिटस् व चाऱ्याकरितां सायलेज पिटस् करण्यास प्रोत्साहित करण्यांत येवून त्यांचीं प्रात्यक्षिकें दिलीं जातात. जनावर गाभण आहे किवा नाहीं याची तपासणी करून दिली जाते व परिक्षेत्रांतील गाईचें दूध सेंटर सुरू झाल्यापासून वाढलें किवा नाहीं याची पाहणी केली जाते. पशु सुधार केंद्राच्या परिक्षेत्रांत येणाऱ्या गांवांतील इसमांना सायलेज पिटस् तयार करण्याकरितां २०० रुपये प्रमाणें सहा इसमांना मिळून १,२०० रुपये अनुदान व सुधारलेल्या जातीचे गवताचे किंवा मक्याचे बी दिलें आहे.

### कृत्रिम रेतन केंद्र

जिल्हयांत आकोला व वाशिम या दोन ठिकाणीं कृत्रिम रेतन तयार करण्यांत येऊन तें आजूबाजूच्या उपकेंद्रांतून उपयोगांत आणलें जाते.

### कॅटल ब्रीडिंग फार्म (पशुसंवर्धन क्षेत्र)

आकोल्याजवळ बोरगांव येथें एक पशुसंवर्धन क्षेत्र असून तेथें हरियाना जातीचीं १९९ जनावरें आहेत. शेतकऱ्यांना आजपर्यंत हरियाना जातीचे वळू पाळण्याची शिफारस करण्यांत येत होती. सध्यां त्याचबरोबर नेमाडी जातीच्या जनावरांचीही पैदास येथें वाढविण्याचा सरकारचा विचार सुरू आहे.

गोशाळा विकासयोजनेखालीं गोरक्षण संस्थांना जनावरें घेण्यास, ती पोसण्यास व त्यांचेकरितां गोठे वगैरे बांधण्यास मदत देण्यांत येते अशी मदत आकोला यथील गोरक्षण संस्थेस देण्यांत आली आहे.

दरवर्षी जिल्हा विकास मंडळामार्फत कृषि, पशु व कुटिरोद्योग प्रदर्शन भरवलें जाते व तेथें बैलांच्या धावण्याच्या शर्यती, नांगरण्याच्या शर्यती, ओझें ओढण्याच्या शर्यती, दुधाच्या शर्यती वगैरे ठेवून बक्षिसें दिलीं जातात.

रिंडरपेस्ट निर्मूलन योजनेनुसार जिल्हयांतून पूर्ण क्षेत्रांत कार्य झालें आहे.

### कुक्कुटपालन केंद्र

आकोला व वाशिम येथें असून येथून नवीन जातीचे कोंबडे व कोंबड्या पुरविल्या जातात. याशिवाय रिसोड, मंगरूळ, आकोट व कारंजा येथें पोल्ट्री डेमॉन्स्ट्रेशन युनिटस् आहेत. पांच विकास खंडांत कुक्कुट-पालन केंद्रें उघडण्यास २५,००० रुपये देण्यांत आले आहेत. आकोट येथेंही एक कुक्कुटपालन केंद्र स्थापन होण्याचें नक्की झालें आहे.

# वन संपत्ति

आकोला जिल्ह्यांतील जंगलाचें क्षेत्र ३२४.७७ चौरस मैल असून एकंदर जमिनीशी त्याचें प्रमाण शेंकडा ८ टक्के आहे. राष्ट्रीय धोरणानुसार तें ३० टक्के असावयास पाहिजे. सर्व जंगलें अ, ब, क वर्गात विभागलें असून इमारती लाकडांचीं जंगलें, बाभूळ वनें व गवताचे रमणे यांचा समावेश अ वर्गात होतो. इमारती लाकडांचीं जंगलें बालाघाट पठाराच्या उतरणीवरील दऱ्याखोऱ्यांत व पठारावरील मंगरूळ व वाशिम तालुक्यांत आढळून येतात. पूर्णा नदीच्या खोऱ्यांत, पैनघाटांत बाभूळ वनें आहेत व गवताचे रमणे जिल्हाभर विखुरले आहेत, क वर्गीय जंगल सबंध जिल्हाभर खेडोपाडीं लहानलहान क्षेत्रांत विखुरलें असून तें चराईकरितां व निस्ताराकरितां राखून ठेवलें आहे.

### मुख्य पिकें

साग, सालई, धावडा, लेंडचा, आंवळा, पळस, बोर, घाटबोर, धामण, कुसूम, मोखा, अंजन, बाभूळ, बास, चंदन हीं झाडें मुख्यत्वेंकरून जंगलांत आहेत. चंदनाचीं व बांबूंचीं जंगलें मुद्दाम लागवण करून निर्माण करण्यांत आलीं आहेत.

### सवलती

शेतकऱ्यांना जंगलांतून २४" वेढ पर्यंतचे इमारती लाकूड व सरपण, घरगुती उपयोगाकरितां, तसेंच शेतीचीं अवजारें करण्याकरितां, सवलतीच्या दरानें मिळते व चार जनावरें फुकट व आणखी चार जनावरें सवलतीच्या दरानें चारतां येतात. बुरुड लोकांना १,५०० पर्यंत बांबू सवलतीच्या दरानें मिळतात. कुंभारांना धंद्याकरितां माती, चांभारांना कातडे कमविण्यासाठीं बाभळीची साल फुकट नेतां येते. मोह, चार, डिंक व खाण्यालायक मुळें फुकट नेतां येतात. खेडेगांवांतील लोकांना राखीव जंगलांतील नाल्यास बांध घालण्यांत येतो व दुरुस्त करतां येतो. लोहारांना कोळसा पिकविण्यासाठीं व सुतारांना सागाचे तुकडे सवलतीच्या दरानें मिळतात. लग्नकार्यासाठीं १.२५ दरानें सालईचीं झाडें राखीव जंगलांतून नेतां येतात.

१०,००० वरील लोकसंख्येच्या शहरांतील जनतेसाठीं शहराच्या हद्दीपासून पांच मैल अंतरांतील राखीव जंगलांतील कूप व रमणे, सरपण व गवत सवलतीच्या दरानें पुरविण्यासाठीं राखून ठेवले जातात. आगींत जळालेलीं घरें बांधण्यासाठीं इमारती लाकूड, गवत वगैरे फुकट दिलें जाते.

## वन विकास योजना

जंगलांचें संरक्षण व विकास करण्याचे दृष्टीनें एकूण ८ योजना सुरू आहेत. त्यांपकीं प्रमुख योजनांची माहिती खालीं दिली आहे :—

**साग व सावर यांची लागवड.**—आडजात जंगलामध्यें सागवन, सावर व इतर किंमती इमारती लाकडांची नियमित लागवड करणें हा या योजनेचा हेतू आहे. असें केल्यानें जंगलाची किंमत वाढेल व साग व इतर उपयुक्त लाकडांचा उद्योगधंद्यास पुरवठा होईल. आतांपावेतों १०,५५५ रुपये खर्चून ४७ एकरांत लागवड केली गेली. पैकी २२ एकरांत साग लावण्यांत आला.

**जलग्रह क्षेत्रांत जंगल लावणें (नद्यांच्या जलग्रह क्षेत्रांतील ओसाड व कोरडचा क्षेत्रांत जंगलें लावणें).**—या योजनमुळें जनतेची इमारती लाकूड, सरपण, चारा इत्यादींची गरज भागेल, जलग्रह क्षेत्रांतील जमिनीची धूप थांबवून पाटबंधाऱ्यांत गाळ सांचून ते निरुपयोगीं होणार नाहींत, १९५९-६० सालापावेतों ६२ एकरांत जमीन सुधारण्याचें कार्य व १२ एकर क्षेत्रांचें वनीकरण करण्याचें काम करण्यांत आलें.

**सिंचित रोपणीची योजना.**—या योजनेनुसार वनमहोत्सवाकरितां चांगल्या रोपांचा पुरवठा करण्याकरितां रोपें तयार केलीं जातात. पातूरजवळ बोडखा येथें एक सिंचित रोपणी तयार करण्यांत आली असून दुसरी रोपणी मंगरूळ तालुक्यांत सुरू आहे.

**जंगलांतील रस्ते व पूल बांधण्याची योजना.**—जंगलांतील वाहतूक ठेल्यांनीं होवूं लागल्यामुळें त्यालायक रस्ते व पूल दुरुस्त करण्यांत येतील. तिसऱ्या योजनेंत मोर्णा परिक्षेत्रांतील महान-साखरपिरा रस्ता व शहानूर-नरनाला रस्ता सुधारण्यांत येईल.

# सहकारी चळवळ

आकोला जिल्ह्यांत सहकारी चळवळीची सुरुवात सहकारी पतपेढ्यांच्या स्थापनेनें झाली. शेतकऱ्यांना शेती करण्याकरितां नेहमींच कर्ज काढण्याची गरज पडते. सावकारांपेक्षां पेढींत कमी व्याजानें कर्ज मिळत असल्यामुळें शेतकऱ्यांनी बऱ्याच पेढ्या स्थापन केल्या. पहिल्या महायुद्धानंतरच्या मंदीच्या काळांत शेतकऱ्यांना कर्ज फेडतां न आल्यामुळें व संयुक्त जबाबदारीचें तत्व अंगिकारलेलें असल्यामुळें बऱ्याचशा लोकांची जमीन कर्ज पुरविणाऱ्या सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे ताब्यांत गेली व शेती गेल्यामुळें शेतकरी आणि बँकेकडे नगदी रोकड परत न आल्यामुळें त्यांत ठेवी ठेवणारे असे सगळेच सहकारी चळवळीबद्दल नाराज झाले व ही चळवळ बुडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. मध्यंतरी लवाद कोर्ट व डेट रिलीफ कोर्ट स्थापन होवून सावकारांच्या घेण्याच्या रकमा बऱ्याच कमी करून त्यांचे लांब मुदतीचे हप्ते पाडून दिल्यामुळें सावकारांनी शेतकऱ्यांस कर्ज देणें बंद केलें. याच सुमारास दुसरें महायुद्ध सुरूं झालें. शेतीच्या मालास भाव बरे लागले व बँकेजवळील जमीनहि विकली जावून तिची सांपत्तिक स्थिती चांगली झाली. युद्ध-कालांत नित्योपयोगी वस्तूंवर बरीच नियंत्रणें लागूं करण्यांत आलीं व ते व्यवहार विविध उद्देशीय सहकारी संस्था स्थापून त्यांनाच देण्याचें धोरण ठेवण्यांत आलें. सबब शेतीच्या सहकारी पतपेढ्यांच्या जोडीस जिल्ह्यांत विविध उद्देशीय सहकारी संस्थांचीहि बरीच वाढ झाली. लढाई संपताच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजवादी समाजरचनेच्या उद्देश्यपूर्तीसाठीं सहकारी संस्थांना प्रत्येक क्षेत्रांत प्रोत्साहन देण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें. शेतकऱ्यांना शेतीसाठीं पैसे पुरवणारी खाजगी सावकारी बंद झाल्यामुळें सरकार व पतपेढ्यांशिवाय कर्ज देणारी दुसरी संस्था राहिली नाहीं व या सर्व कारणामुळें सहकारी चळवळीस नवीन जोर चढला. जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील सहकारी संस्थांची संख्या ३० जून १९६० रोजीं खालील-प्रमाणें होती :—

| संस्था (१) | | संख्या (२) |
|---|---|---|
| (१) दी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, आकोला ... ... ... ... | | १ |
| (२) लँड मॉर्टगेज बँक (सहकारी जमीन गहाणी बँक), आकोला ... ... | | १ |
| (३) शेतकी सहकारी पतपेढ्या (सेवा सहकारी व विविध उद्देशीय कार्यकारी संस्थासह)— | | ८३५ |
| (अ) सेवा सहकारी संस्था ... ... | ६७७ | |
| (ब) विविध उद्देशीय सहकारी संस्था ... | १८ | |
| (क) सहकारी पतपेढ्या ... ... | १४० | |
| एकूण ... | ८३५ | |
| (४) खरेदी-विक्री संघ ... ... ... ... ... ... | | ७ |
| (५) शेतमालाच्या प्रक्रिया करणाऱ्या संस्था ... ... ... ... | | २ |
| (६) सुपरवायझिंग युनियन्स ... ... ... ... ... | | १३ |
| (७) जिल्हा सहकारी बोर्ड ... ... ... ... ... | | १ |
| (८) डेअरी संस्था ... ... ... ... ... ... | | ५ |
| (९) सहकारी शेती संस्था ... ... ... ... ... | | ५ |
| (१०) शैक्षणिक संस्था ... ... ... ... ... ... | | १ |
| (११) सहकारी स्टोअर्स ... ... ... ... ... ... | | २४ |
| (१२) गृहनिर्माण संस्था ... ... ... ... ... ... | | १५ |
| (१३) कोळी लोकांची संस्था ... ... ... ... ... | | १ |
| (१४) पगारदार नोकरांच्या संस्था ... ... ... ... ... | | २२ |
| (१५) मोटार ट्रान्सपोर्ट संस्था ... ... ... ... ... | | १ |
| (१६) इतर सहकारी संस्था ... ... ... ... ... | | १४ |
| (यांत औद्योगिक सहकारी संस्थांचा समावेश नाहीं.) एकूण ... | | ९४८ |

## सहकारी पतपेढचा

जिल्हयांतील एकूण ९४८ संस्थांपैकीं ८७० संस्था शेतीशी निगडीत आहेत यावरून सहकारी संस्थांची वाढ याच क्षेत्रांत जास्त झाली हें स्पष्ट होईल. यांतहि ८३५ संस्था हृया सहकारी पतपेढचा आहेत. जिल्हयांतील सर्व खेडयांत सहकारी चळवळीचें लोण या पतपेढयांनी पोंचवलें असून शेंकडा ८२ टक्के शेतकरी या पेढयांचे सभासद आहेत. म्हणजे ८२ टक्के शेतकऱ्यांना सहकारी पतपेढयांद्वारा कर्ज दिलें जातें. १९५८-५९ मध्यें अशा संस्थांतून शेतकऱ्यांना ९६,६३,०९२ रुपये कर्ज म्हणून वाटण्यांत आलें. १९५९-६० मध्यें पिकें बुडाल्यामुळें वसूली कमी झाली व कर्जेहि कमी दिलें गेलें.

## सेवा सहकारी संस्था

नवीन धोरणानुसार सहकारी पेढचा हृया नुसत्या कर्ज वाटणाऱ्या संस्था ठेवावयाच्या नसून शेतकऱ्यांच्या इतरहि गरजा त्यांचेमार्फत भागविल्या जातील इतकें व्यापक क्षेत्र त्यांचे व्हावयाचें आहे. यापुढें त्यांना सहकारी पतपेढीऐवजी सेवा सहकारी संस्था असें नांव मिळेल व बी-बियाणें, खतें वगैरे वस्तू देखील तेथूनच मिळू लागतील. एकूण ८३५ सहकारी पतपेढयांपैकीं ६७२ पतपेढयांचें रूपांतर सेवा सहकारी संस्थांत पूर्ण झालें व उरलेल्या पतपेढचा देखील लवकरच त्यांत रूपांतरीत केल्या जातील. तळप, ता. मंगरुळ, येथील सेवा सहकारी संस्थेस गोडाऊन बांधण्याकरितां सरकारी मदत देण्यांत आली आहे.

## दि आकोला को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक

सहकारी संस्थाद्वारा जनतेला व विशेषत: शेतकऱ्यांना कर्ज पुरवणारी जिल्हयांतील एकमेव संस्था आकोला को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक ही आहे. हिची स्थापना ५ फेब्रुवारी १९०९ रोजीं झालीं. जिल्हयांत शेतकी क्षेत्रांत सहकारी चळवळीची वाढ करण्याचें खरें श्रेय या संस्थेलाच आहे. १९२८ ते १९३८ पर्यंतच्या मंदीच्या काळांत बँकेची स्थिती जरा खराब झाली परंतु १९४६ पासून ती पुन: दुरुस्त झाली व सध्यां ती अगदीं सुस्थितींत आहे. बँकेचे ८७० सोसायटचा व १,२६७ वैयक्तिक भागीदार मिळून २,०८४ भागीदार आहेत. पेड-अप शेअर कॅपिटल २१,४३,९१९ रुपये असून रिझर्व्ह फंड ११,६९,४५७ रुपये आहे. सहकारी संस्था व वैयक्तिक सभासदांनी ठेवलेली ठेव ३९,९३,८९८ रुपये असून निरनिराळचा सहकारी संस्थांना मिळन २ कोटी १३ लक्ष ७३ हजार ७८६ रुपये वाटले आहेत.

बँक सोसायटयांना व वैयक्तिक शेतकऱ्यांना लघु आणि मध्यम मुदतीचें कर्ज देते. मध्यम मुदतीचें कर्ज एक वर्षात परत करावयाचें असून तें फक्त लाव-लागवडीकरितांच मिळतें. सुरवातीस हें एकरीं ७ रुपयांप्रमाणें मिळत असे पण आतां ३० ते ४० रुपये एकरीं मिळते व व्याजाचा दर मात्र शेकडा १० वरून ८ वर आला असून तो ५½ पर्यंत खालीं उतरवण्याचा प्रयत्न आहे. सध्यां बँकेच्या शाखा प्रत्येक विकास गटांत एक याप्रमाणें १२ आहेत व त्या आणखी वाढविण्याचा विचार आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या लागवडीकरितां लागणाऱ्या कर्जाबाबत ही बँक त्यांचा एकमेव मोठा आधार आहे. या वर्षीपासून शेतकऱ्यांना खतांकरितां व पीक संरक्षणाकरितां दर एकरीं १० रुपयांप्रमाणें कर्ज देण्याचीहि योजना केली आहे.

## सुपरवायझिंग युनियन्स

पतपेढयांच्या व्यवहारावर देखरेख करण्याचें काम पूर्वी सेंट्रल बँकेकडूनच होत असे पण त्याकरितां प्रत्येक गटास एक याप्रमाणें १३ सुपरवायझिंग युनिअन्स स्थापन करण्यांत आल्या आहेत व त्यांचें हाताखालीं २० सुपरवायझर्स व १३२ ग्रुप सेक्रेटरीज आहेत.

## सरकारी शेत गहाणी बँक

जुनें कर्ज फेडण्याकरितां, शेताच्या सुधारणेंकरितां, विहीरीकरितां वगैरे लांब मुदतीचें कर्ज शेताच्या तारणावर देणारी एकच बँक सगळचा जिल्हयाकरितां आकोला येथें आहे. ही १९३८ मध्यें स्थापन झाली. बँकेचें सभासद १९५९-६० सालीं २,३६२ होते. १९५९-६० सालीं बँकेनें ४७,३०० रुपये व नागपूर मध्यवर्ती बँकेच्या वतीनें ४८,५०० रुपये कर्ज वाटलें. १९५९-६० अखेर बँकेचे येणें ६ लक्ष ७५ हजार २१३ रुपये होते. बँकेचें भांडवल २९,४०५ रुपये व रिझर्व्ह फंड ५२,९४९ रुपये आहे.

## सहकारी खरेदी-विक्री संघ

कर्जपुरवठा, उत्पादन व मालविक्री यांचा योजनाबद्ध मेळ घातला तर शेतीचें व शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढविण्यास मदत होईल हें तत्व सर्वमान्य आहे. त्याकरितां सहकारी खरेदी-विक्री संघाचें विशेष महत्त्व आहे. कर्जाचा खरेदी-विक्रीशी मेळ (linking of credit with marketing) ही शेतकऱ्याच्या व सहकाराच्या दृष्टिने अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट असून मजबूत खरेदी-विक्री संघामुळें बाजार-भावाचे परिणामकारक नियंत्रण होण्यांतहि मदत होते. ग्राहक आणि उत्पादक यांना मालाची देवाण-घेवाण किफायतशीर होण्याचें दृष्टिनें याचा मधला माणूस दलाल अथवा अडत्या नाहीसा होवून त्याची जागा सहकारी खरेदी-विक्री संघानें घेणें आवश्यक आहे.

आकोला जिल्ह्यांत आकोला, आकोट, वाशिम, मंगरूळ, मूर्तिजापूर, बाळापूर, पातूर आणि तेल्हारा येथें प्रत्येकीं एक असे एकूण आठ खरेदी-विक्री संघ आहेत. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं असलेल्या एकूण सहा ता. अॅ. असोसिएशन्सचेंच खरेदी-विक्री संघांत रूपांतर करण्यांत आलें आहे. तेल्हारा व पातूर येथील संस्था फक्त नव्या आहेत. सहकारी शेतकी पतपेढयांना या संघाचे सभासद होण्यास सांगण्यांत आलें असून ६४४ पतपेढ्या सभासद झाल्या आहेत.

यांपैकीं आकोला खरेदी-विक्री संघ संपूर्ण जिल्ह्याचे साखर वाटण्याचें काम करतो. इतर संघ तालुका पातळीवर साखरेचें वाटप करतात. त्याचप्रमाणें जिल्ह्यांत कांही खरेदी-विक्री संघांनी स्वस्त धान्याचीं दुकानें, अडत दुकानेंहि चालविलीं आहेत. लोखंडासारख्या नियंत्रित वस्तू, खत, सुधारलेले बी-बियाणें वगैरेच्या वाटपाचीहि कामें करण्यांत येतात. आकोला संघानें शेतकऱ्यांना धान्याचा साठा करण्या-करितां मध्यम आकाराचे गोडाऊन बांधले असून शेतकऱ्यांना त्याचा माल ठेवून त्या तारणावर या संघाकडून कर्ज दिलें जातें. गोडाऊनकरितां आकोला, मूर्तिजापूर व वाशिम संघास शासनानें ४५,००० रुपये कर्ज व १५,००० रुपये सब्सिडी म्हणून दिले आहेत.

१९५९-६० सालांत सात संघांनी मिळून १,१४,९६,१८६ रुपयांचा माल खरेदी केला व १,२१,२२,२२८ रुपयांचा माल विकून १,७३,३०० रुपये नफा मिळवला. आकोट, आकोला, वाशिम, मंगरुळ व बाळापूर या पांच संघांना शासनाकडून ६२,६६७ रुपये शेअर कॅपिटल म्हणून देण्यांत आले.

## . सहकारी शेती

सहकारी तत्वावर शेती करण्यासहि जिल्ह्यांत प्रारंभ झाला असून मुंडगांव, दस्तापूर, कारंजा, बेलरा आणि शेळद येथें मिळून एकूण पांच संस्था आहेत. पैकीं मुंडगांवची बेटर फार्मिंग सोसायटी आहे. दस्तापूरची सामुदायिक सहकारी शेती संस्था असून शेळद व बेलूरा येथील संस्था संयुक्त सहकारी संस्था आहेत. यांपैकीं चार संस्थांजवळ एकूण ४२२ एकर जमीन असून लागवडीखालीं १८६ एकर आहे. या संस्थांचे सभासद १४० आहेत. सरकारी शेअर कॅपिटल ८,००० व सभासदांचे ३,१७० रुपये व चालू वर्षांत सुधारलेलें बी-बियाणें, संघटनात्मक खर्च आदिकरितां ४,१०० रुपये अनुदान देण्यांत आले. मुंडगांवची संस्था फक्त पीक संरक्षण व खताचें वांटप करतें. सर्व संस्था याच वर्षीं रजिस्टर झाल्या आहेत. सहकारी चळवळीकरितां आकोला जिल्हा पायलट जिल्हा म्हणून निवडण्यांत आला असून मानोरा विकास खंडांत दहा सहकारी शेती संस्था स्थापन करण्यांत येत आहेत.

## (विविध कार्यकारी) सहकारी संस्था

आकोला जिल्ह्यांत सध्यां एकूण १८ बहुउद्देशीय सहकारी संस्था आहेत. यांचे एकूण सभासद ६,७१८ असून ८८ खेडीं त्यांच्या परिक्षेत्रांत (ज्युरिस्डिक्शन) आहेत. शेअर कॅपिटल २,९५,८२० रुपये असून सरकारनें त्यांत ९७,००० रुपये दिले आहेत. संस्थाजवळ १२,०५,५१५ रुपये रिझर्व्ह फंड, १,४५,६८२ रुपयांच्या ठेवीं व २२,९५,९६३ रुपये खेळते भांडवल आहे.

ह्या बहुउद्देशीय संस्था कर्ज देण्याशिवाय इतरहि कार्य करतात. कांहीं संस्था स्वस्त धान्याची दुकानें चालवितात तर कांहीनीं ग्रेन डेपोहि चालविले आहेत. महान आणि वाडेगांवच्या संस्थांनी दोन लहान आकाराचीं गोडाऊन्स बांधलीं. त्याकरितां सरकारतर्फे १५,००० रुपये कर्ज व ५,००० रुपयांची सब्सीडी देण्यांत आली. याच वर्षी १,३०,००० रुपये आणि एका मध्यम आकाराच्या गोडाऊनकरितां २०,००० रुपयांची आर्थिक सहाय्यक सब्सीडी मंजूर करण्यांत आली. या संस्थांचे ६,७१८ सभासद असून ८८ खेडीं त्यांच्या परिक्षेत्रांत आहेत. पातूर, व्याळा, वाडेगांव, सेलू बाजार, मंगरुळ, पोहरा, महान, बार्शी टाकळी, कुरणखेड, बोरगांव मंजू, घुसर, माना व आसेगांव येथील सोसाटयांना गोडाऊन-करितां सरकारी मदत देण्यांत आली आहे. या ठिकाणीं देखील शेतकऱ्यांचा माल ठेवून घेवून त्याचे तारणावर कर्ज देण्यांत येईल.

## सहकारी डेअरी

दुधाचा व्यवसाय करण्याकरितां पांच सहकारी संस्था जिल्ह्यांत स्थापन झाल्या आहेत. १९५९-६० सालीं त्यांनी १,०१,२४२ रुपयांचें दूध खरेदी करून १,१५,३०९ रुपयांस विकलें व ५,५६८ रुपये नफा मिळवला. पातूर येथील संस्था सोडून इतर चार संस्थांना १९५९-६० सालीं प्रत्येकीं ५०० रुपये दूधांतील चरबीचें प्रमाण तपासणाऱ्या यंत्राकरितां देण्यांत आले व व्यवस्था खर्चाकरितां ६,००० रुपये अनुदान म्हणून दिले. संस्थांचें कार्य समाधानकारक चालू आहे.

## सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी

आकोला, आकोट व वाशिम येथें याकरितां प्रत्येकीं एक संस्था रजिस्टर झाली असून भांडवल जमविण्याचें कार्य सुरू आहे. सरकारनें १९५९-६० व १९६०-६१ सालांत तीनहि संस्थांना मिळून भांडवल मदत म्हणून १,७०,००० रुपये दिले. तीनहि संस्थांच्या प्रत्यक्ष कार्यास सुरुवात व्हावयाची आहे.

## इतर सहकारी संस्था

शेतीशी संबंधित नसलेल्या २४ सहकारी वस्तूभांडारें, १५ कमी उत्पन्नवाल्यांच्या गृहनिर्माण संस्था, एक मोटार ट्रान्सपोर्ट संस्था, सात पीक संरक्षण संस्था, २२ नॉन-ॲग्रिकल्चरल क्रेडिट सोसायटीज् व २२ पगारदार नोकरांच्या संस्था कार्य करीत आहे. स्वस्त धान्याचीं दुकानें, साखर व इतर नियंत्रित वस्तूंचें वाटप सहकारी वस्तू भांडारांनाच देण्यांत येतें. पंधरांपैकीं १४ गृहनिर्माण संस्थांना १९५९-६० सालीं एकूण ९० घरें बांधण्यांकरितां ६,६८,९०२ रुपये कर्ज वाटले व एकूण ७०,६२५ रुपये सोसायटयांना वसूल करणें आहे. मोटार ट्रान्सपोर्ट संस्था ही वाशिम येथें मांजी सैनिकांनी स्थापन केलेली असून तिला मोटार चालवण्याकरितां एक रस्ता देण्यात आला आहे. त्यामुळें संस्थेची स्थिती उत्तम असून तिच्या-जवळ स्वतःच्या ४-५ मोटारी आहेत. संस्थेचे एकूण सभासद २९, शेअर कॅपिटल १३,९७५ रुपये व ४६ हजारांचेवर रिझर्व्ह फंड आहे. संस्थेनें १ लाख २० हजारचें वर रक्कम मोटारी खरीदण्यांत गुंतवली आहे. वाशिम येथील नगरपालिकेंतील भंग्यांनी नुकतीच गृहनिर्माण संस्था स्थापन केली असून अद्याप कार्यास सुरुवात व्हावयाची आहे.


एकंदर सर्व संस्था समाधानकारक प्रगति करीत असून १९५९-६० च्या ऑडिटप्रमाणें २७४ संस्था ब वर्गांत, ६२३ क वर्गांत, २१ ड वर्गांत आहेत. ४४ संस्थांचें ऑडिट व्हावयाचें राहिलें व ३५ संस्था लिक्विडेशनमध्यें निघाल्या.

## जिल्हा सहकारी बो

सहकारी चळवळीच्या वाढत्या व्यापावरोबर त्या संस्था चालवणाऱ्या इसमांची पात्रता देखील वाढणें आवश्यक आहे. सबब सहकारी कार्यकर्त्यांना संस्था चालविण्याचें शिक्षण देण्यास व सहकारी चळवळीचा जनतेंत प्रचार व प्रसार करण्यास जिल्हा सहकारी बोर्ड स्थापन झालें असून त्यामार्फत १९५९-६० सालांत २४० सेक्रेटरीज व ५२३ कार्यकारी मंडळांतील सभासदांस प्रशिक्षण देण्यांत आलें व तीन सहकारी परिषदा घेण्यांत आल्या व त्यांत ७५० प्रतिनिधींनीं भाग घेतला.

# अकोला ज़िल्हा

## सहकारी संस्था.




विविध कार्यकारी सहकारी संस्थेची गोदामे
जिनींग प्रेसींग सहकारी संस्था
विविध कार्यकारी सहकारी संस्था
सहकारी खरेदी विक्री संघाचें गोदाम
अकोला सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेच्या शाखा
सहकारी खरेदी-विक्री संघ
औद्योगिक सहकारी संस्था.
ब्लॉक कोऑपरेटिव्ह सुपरवायझींग युनियन
सेंट्रल वेअर हाऊसींग कॉर्पोरेशनची वखार

## सेंट्रल वेअरहाऊस

सेंट्रल वेअरहाऊसिंग कार्पोरेशन, न्यु दिल्ली, यांचें एक वेअरहाऊस (वखार) आकोला येथें दोन वर्षांपासून सुरू झालें आहे. शेतीचा माल शास्त्रीय पद्धतीनें सुरक्षित राखून ठेवण्याची सोय यांच्या गोदामांत (वखारींत) आहे. शेत मालाप्रमाणेंच रासायनिक खतें, बी-बियाणें वगैरे देखील या ठिकाणीं ठेवता येतात. माल ठेवण्यावद्दलचें भाड अत्यंत माफक म्हणजे मासिक १८ न. पैशांपासून तो ७५ न. पैशांपर्यंत आहे, शेतकऱ्यांनीं येथे ठेवलेल्या मालाबद्दल त्यास जी पावती मिळते त्याचें तारणावर त्यास इतर बॅंक कर्ज द्यावयास तयार असतात. या वखारीमुळें शेतकऱ्यांना गरजेंच्यावेळीं आपला माल कमी भावांत न विकतां तो येथ ठेवून आपली गरज भागवितां येईल व योग्य भाव येईपर्यंत वाट पाहता येईल. सहकारी संस्था देखील आपला माल या वखारींत ठेवू शकतात आपले मालास योग्य भाव येण्याकरितां खरेदी-विक्री संघ जी मदत शेतकऱ्यांस करूं इच्छितात त्यांस या वखारीमुळें बरींच मदत होणार आहे. व्यापाऱ्यांना देखील या वखारीचा फायदा घेतां येतो.

# कुटीर उद्योग

जिल्ह्यांतील ७५ टक्के लोक शेतीवर अवलंबून असल्यामुळें व त्यांतहि ८५ टक्के शेतकऱ्याजवळ २५ एकरांपेक्षांहि कमी जमीन असल्यामुळें या जिल्ह्यांत शेतीवरील भर हलका होण्यास कुटीर उद्योगांची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु विणकामाशिवाय उद्योगधंद्याचे कक्षेंत बसणारा दुसरा कुटीर उद्योग या जिल्ह्यांत नाहीं. जोडे बनविणें, सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, तेल काढणें वगैरे इतर जीवनोपयोगी व्यवसाय करणारे लोक आहेत. हे सर्वच लोक आपापल्या व्यवसायाकरितां मुख्यत्वें शेतकऱ्यावर अवलंबून असल्यामुळें यांची देखील परिस्थिती गरीबीचीच आहे. विणकरांची संख्या जिल्हाभर विखूरलेली असून आकोट, बाळापूर व वाशिम येथें ती प्रामुख्यानें आहे. विणकरांत मोमीन व कोष्टी असें प्रकार असून बाळापूर तालुक्यांत मोमिनांची संख्या बरीच आहे. सत्रंज्या, तढव वगैरे विणणारेहि लोक या जिल्ह्यांत आहेत. आकोट व बाळापूर येथील सत्रंज्या फार प्रसिद्ध असत. कोष्टी लोक लुगडी विणींत व मोमीन लोक लुगडी, लुंग्या वगैरे विणीत. हे सगळे विणकर मिलचें सूत वापरीत व आजहि वापरतात मिलमधून तयार झालेल्या मालाशीं हातमागावरील कापडाची स्पर्धा निर्माण होवून विणकरांचे धंदे बसत चालले. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं सूत मिळेनासें झाल्यामुळें कित्येक लोकांनी विणकाम सोडून शेतीवर मजूरी करण्यास अगर इतर काम करण्यास सुरुवात केली.

स्वराज्य मिळाल्यानंतर बुडत चाललेल्या कुटीर उद्योगांना मदत करण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें व कारागिरांच्या सहकारी संस्था स्थापून त्यांना आर्थिक मदत देणें सुरूं झालें. आकोला जिल्ह्यांत ३० जून १९६० रोजीं अशा औद्योगिक सहकारी संस्थांची संख्या ४६ असून तिची वर्गवारी खालीलप्रमाणें होती :—

| अनुक्रमांक (१) | धंदा (२) | सहकारी संस्थांची संख्या (३) |
|---|---|---|
| १ | विणकाम ... ... ... ... | ७ |
| २ | खादी अंबरचरखा ... ... ... | २ |
| ३ | तेलघाणी ... ... ... ... | ३ |
| ४ | वेत व बांबूकाम ... ... ... | २ |
| ५ | कातड्याच्या वस्तू बनवणें ... ... ... | ८ |
| ६ | कातडी कमावणें ... ... ... | २ |
| ७ | भांडी बनवणें ... ... ... ... | १ |
| ८ | सुतार व लोहारकाम ... ... ... | ४ |
| ९ | कुंभारकाम व विटा बनवणें ... ... | ९ |
| १० | नीरा ताडगूळ ... ... ... ... | २ |
| ११ | महिला वस्तू ... ... ... ... | १ |
| १२ | इतर ... ... ... ... ... | ४ |
| १३ | जिल्हा औद्योगिक सहकारी संघ ... ... | १ |

## आर्थिक साहाय्य

सहकारी संस्थांना सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, आकोला (सेंट्रल फायनान्सिग एजन्सी), व सहकारी विभाग अशा दोघांकडून धंद्याच्या गरजेप्रमाणें निरनिराळ्या कामांकरितां कर्ज, अनुदान वगैरे रूपानें मदत मिळते. साधारणतः प्रत्येक सहकारी संस्थेस सभासदांना हिस्से घेण्याकरितां, संस्थेस धंद्याकरितां भांडवल म्हणून, कारागिरांना काम करण्यास छप्पर (शेड) बांधण्यास कर्ज मिळते. तेलघाणी सोसायटीस कच्च्या मालाचा सांठा करण्यास व बैल घेण्यास आणि विणकर सोसायटयांस, फेक धोटयाच्या मागाचे धावत्या धोटयाच्या मागांत रूपांतर करण्यास, यंत्र माग घेण्यास, रंगाणी कारखाना काढण्यास, विक्री केंद्रें उघडण्यास वगैरे मदत मिळते व मालाच्या विक्रीवर दिल्या गेलेल्या रिबेटचे पैसे परत मिळतात.

१९५४-५५ पासून १९५९-६० अखेरपर्यंत औद्योगिक सहकारी संस्थांना खाली दर्शविल्याप्रमाणें मदत करण्यांत आली:—

| | संस्था (१) | मदत (रुपयांत) (२) |
|---|---|---|
| (१) | विणकर संस्थांना भांडवल, यंत्रमाग विकत घेणें, रंगाणी कारखाना काढणें, वगैरे कामांकरितां. | ३,६८,००० |
| (२) | तेलघाणी संस्था २ ... ... ... ... | २८,४४७ |
| (३) | वेत व बांबूकाम संस्था १ ... ... ... | १०,००० |
| (४) | कातडयाच्या वस्तू बनवणाऱ्या संस्था ३ ... ... | १६,५५९ |
| (५) | कांतडी कमावयाच्या संस्था १ ... ... ... | ५,२९२ |
| (६) | सुतार व लोहारकाम संस्था १ ... ... ... | ७,००० |
| (७) | भांडी बनवणें संस्था १ ... ... ... ... | ५,५०० |
| (८) | कुंभारकाम व विटा बनवणें संस्था ९ ... ... | १०,४५१ |
| (९) | नीरा ताडगूळ ... ... ... ... | ... |
| (१०) | इतर ... ... ... ... | ... |
| (११) | डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन ... | ३,०३५ |
| | एकूण ... | ४,५४,२८४ |

बहुतेक सहकारी संस्था नवीनच निघालेल्या आहेत. काहींनी काम सुरू केलें असून इतरांचें काम अद्याप सुरू व्हावयाचें आहे. विणकर संस्थांत बाळापूर येथील मोमिन विव्हर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी व वाशिम येथील को-ऑपरेटिव्ह औद्योगिक विणकर मंडळ या संस्था जन्या असून त्यांनी बरीच प्रगति केली आहे. दोनहि संस्थांचे स्वतःचे रंगाणी कारखानें आहेत. बाळापूर संस्थेस २० व वाशिम येथील संस्थेस १५ यंत्र माग घेण्याकरितां मदत देण्यांत आली असून ते सुरू झालें आहेत. दोनहि संस्था आपल्या सभासदांना सूत पुरवून कापड विणून घेतात व त्याच्या विक्रीची व्यवस्था करतात. ग्रामीण विभागांत लागणाऱ्या साडया, लुगडी व इतर कापड त्या तयार करतात व स्थानिक आणि आजूबाजूच्या क्षेत्रांत विकतात. मालाला वाढती मागणी आहे. बाळापूरची मोमिन सोसायटी सतरंज्या, लुंग्या वगैरे तयार करते. तिच्या मालाला गुजरात, राजस्थान, काठियावाड, मध्यप्रदेश वगैरे भागांतहि मागणी आहे.

वाशिम, बाळापूर व आकोट येथील तीन विणकर संस्थांना १९५९-६० सालीं त्यांच्या मालाच्या विक्रीवर अनुक्रमे २,५०३, ३,०५६ व ६८५ रुपये रिबेट देण्यांत आले. एकूण सात विणकर संस्थांपैकी कारंजा व शेलू बाजार येथील संस्था नुकत्याच सुरू झाल्या आहेत. आकोला व गायगांव येथील संस्था बंद आहेत. सोसायटयांच्या कक्षेंत नसलेलेहि कित्येक विणकर जिल्हयांत आहेत. आकोट व बाळापूर येथील विणकर सत्रंज्या, तढव व नेवारी देखील विणतात. दिवसानुदिवस विणकर वाढत्या संख्येनें सहकारी संस्थांत सामील होत आहेत.

यंत्रावर तयार झालेल्या मालापेक्षां कुटीर उद्योगांत तयार झालेला माल महाग पडतो व तो जसा सुबक व्हावयास पाहिजे तितका अद्याप झाला नाहीं. त्यामुळें ह्या मालाची विक्री करणें कठीण जाते. डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह असोसिएशन स्थापन झाल्यामुळें सहकारी संस्थांतून तयार झालेल्या मालाची शहरात विक्री करण्याची व्यवस्था होणार आहे. त्यानेंहि बरीच मदत होण्याचा संभव आहे.

पातूर येथील सुतारांनी स्थापन केलेली शेतोपयोगी अवजारें करण्याची सोसायटी उत्तम प्रगती करीत आहे. सवच सभासद स्वत: कारागीर असल्यामुळें त्यांना मजूरी जास्त पडूं लागली असून संस्थेनें सहकारी मदतीनें एक लाकूड कापण्याचें यंत्र आणलें आहे.

मातीच्या मूर्ति तयार करणारा चितारी वर्ग व घोडयांचे खोगीर तयार करणारा जिनगारांचा वर्ग होता. परंतु हे दोन्हिं धंदे आतां बुडाले आहेत. आकोला येथें प्लॅस्टरच्या मूर्ति तयार करण्याचें काम करणारा प्रसिद्ध कारागीर आहे व लांकडाची खेळणी बनवणारा एक कारखाना आहे. दोघांच्याहि मालास मागणी चागली असते. पातूर येथें दगडाच्या मूर्ती खोदणारा कारागीर आहे व मूर्तिजापूर विकास खंडांत उमरी येथें सुताचे उत्कृष्ट गालीचे बनविणारा कारागीर आहे.

### प्रशिक्षण वर्ग

निरनिराळ्या व्यावसायिकांना त्यांच्या त्यांच्या व्यवसायांचें शिक्षण देवून सहकारी तत्वावर संघटना उभारण्यास प्रोत्साहित करण्यात येतें. सहकारी संस्था संघटित करणें शक्य न झाल्यास प्रशिक्षित व्यवसायिकाना व्यवसाय करण्यास वैयत्तिक मदत देण्यांत येते. प्रशिक्षणाचे वर्ग निरनिराळ्या विकास खंडांतून घेण्यात येतात. १९५९-६० सालांत १० व्यवसायांचें २४ वर्ग घेवून २८२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यांत आलें व २५ प्रशिक्षितांना ९,५६९ रुपये कर्जरूपानें देण्यांत आले. आतांपर्यंत शिकलेले बहुतेक लोक आपापल्या व्यवसायांत काम करीत आहेत. प्रशिक्षार्थींना प्रशिक्षण कालांत शिष्यवृत्ती देण्यांत येते व हुकेरीकर समीतीनें ठरविल्याप्रमाणे अभ्यासक्रम घेतला जातो.

## अखिल भारतीय मंडळाच्या योजना

ग्रामोद्योगाकरितां भारत सरकारनें स्थापन केलेल्या सहा मंडळापैकीं (१) अखिल भारतीय हातमाग मंडळ, (२) अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग कमिशन, (३) अखिल भारतीय हस्तकला मंडळ व (४) लघु उद्योग मंडळ अशा चार मंडळाच्या योजना कुटीर उद्योग विभागामार्फतच कार्यान्वित होतात. भारतीय हातमाग मंडळामार्फत हातमागाच्या सोसायटयांना मदत दिली जाते. खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत आकोला जिल्ह्यांत खालील योजना चालू आहेत :—

**खादी उद्योग.**—अंबर वस्त्र सहकारी उत्पादक मंडळ, मंगरूळपीर, व रवि अंबर चरखा वस्त्र सहकारी संस्था, वडगाव, तालुका मगरूळ, या दोन संस्था प्रमाणित असून त्यांचेमार्फत १५० अंबर चरखे चालू आहेत. अंबर खादीचें भांडार उघडण्याचें प्रयत्न सुरू आहेत. मोहरी येथील कातणारे लोक सध्यां आपलें सूत विणण्याकरितां सर्व सेवा संघाकडे पाठवितात. कातणारे तर स्वत:ची हातची खादी वापरतातच पण गांवातील इतर लोक देखील वाढत्या प्रमाणांत खादी वापरूं लागले आहेत.

**कुंभार काम.**—यांना सार्वजनिक छप्पर बांधण्याकरितां व खरेदी-विक्रीकरितां अनुदान व कर्ज देण्यांत येतें. याकरिता ९ संस्था रजिस्टर झाल्या आहेत.

**अखाद्य तेल बियापासून साबण तयार करणें.**—याकरितां टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, आकोला, या संस्थेस ६,२५० रुपये अनुदान व १०,२५० रुपये कर्ज देण्यांत आलें आहे. साबण तयार करण्याचें कार्य सुरू झालें आहे.

**ग्रामीण चर्मोद्योग.**—मेलेल्या पशूंपासून चामडे, चरबी, हाडाचे खत इत्यादि तयार करणें चामडे पकवणे, पकवलेल्या चामडयापासून वस्तू तयार करणें वगैरे कामांकरितां मदत मिळते. वरील उद्योगाच्या ११ सहकारी संस्था आहेत. तालुका चर्मकार संस्था, आकोट सहकारी संस्था, लफेइंग इंडस्ट्रिअल सहकारी संस्था, सावरा, व टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, आकोला, यांना मदत देण्यांत आली आहे.

**तेलघाणी उद्योग.**—तेलघाणी घेण्याकरितां १५० रुपये कर्ज व १५० रुपये अनुदान मिळतें. शेड बांधण्याकरितां २५० रु. कर्ज व २५० रुपये अनुदान मिळतें. खेळत्या भांडवलाकरितां, शेअर भांडवलाकरितां, तेल बियांचे साठ्याकरितां, तेल विक्रीवर रिबेट म्हणून मदत मिळते. आकोला जिल्ह्यांत चार संस्था रजिस्टर झाल्या आहेत.

वरीलशिवाय हातकागद उद्योग, गूळ व खांडेसरी उद्योग, ताडगूळ उद्योग, हातकुटाइचा तांदुळ उद्योग व मधमाशा पाळण्याचा उद्योग याकरितां देखील मदत देण्यांत येते.

# उद्योग व व्यापार

आकोला हा शेतीप्रधान जिल्हा असल्यामुळें येथें आजपर्यंत सुरू झालेले उद्योगधंदे हे शेतमालाच्या प्रक्रियेचे (प्रोसेसिंगचेच) मुख्यतः आहेत. फॅक्टरी ॲक्टप्रमाणें ज्या ठिकाणीं प्रेरक शक्ति ही मानवी शक्ति खेरीज इतर शक्ति वापरलेली असते व ज्या ठिकाणीं एका दिवशीं १० किंवा जास्त माणसें काम करतात किंवा प्रेरक शक्ति मानवी शक्ति असल्यास ज्या ठिकाणी २० माणसें एका वेळीं काम करतात त्यास कारखाना असें संबोधलें जाते. या व्याख्येप्रमाणें बहुतेक कारखानें फॅक्टरी ॲक्टच्या क्षेत्रांत येतात. ज्या धंद्यांतील भांडवल ५ लाखापेक्षां जास्त नाहीं व ज्या ठिकाणीं मानवाशिवाय इतर प्रेरक शक्ति वापरतात व ५० पेक्षां अधिक मजूर एका वेळीं कामावर असतात किंवा मानवी शक्ति वापरल्यास १०० पेक्षां जास्त मजूर एका वेळीं कामावर असतात अशा उद्योगधंद्यांना छोटेखानी उद्योगधंदे म्हणतात. विस्ताराच्या दृष्टीनें वरील कसोटीप्रमाणें कापडाच्या दोन मिल्स व एक तेल शुद्ध करून गोठवण्याची फॅक्टरी सोडली तर सगळ उद्योगधंदे छोटेखानी उद्योगधंद्यांच्या कक्षेंत येतात.

१९५८-५९ मध्यें निरनिराळ्या मोठ्या व छोट्या कारखान्यांची जिल्ह्यांतील संख्या खालील प्रमाणें होती:—

| कारखाना (१) | संख्या (२) |
|---|---|
| (१) कापसांतून सरकी काढणें व गठ्ठे बांधणें ... ... .. | ७४ |
| (२) तूरीपासून डाळ तयार करणें ... ... ... .. | ३ |
| (३) पेपरमिंट तयार करणें .. ... ... .. | १ |
| (४) तेल काढण्याचें कारखानें ... ... ... ... | १८ |
| (५) तेल शुद्ध व घट्ट करण्याचा कारखाना (वनसदा) . | १ |
| (६) कापडाच्या गिरण्या ... . ... ... | २ |
| (७) लांकूड कापण्याचे कारखानें ... ... ... ... | ४ |
| (८) छापखाने ... ... ... ... ... ... | ६ |
| (९) बर्मा शेल ... ... ... ... ... | १ |
| (१०) विटा आणि कौले बनवणारा कारखाना ... ... ... | २ |
| (११) एंजिनिअरिंग वर्कशॉप्स .. ... ... .. | ३ |
| (१२) विडी बनवणारे कारखानें ... ... ... .. | १ |
| (१३) साबणाचे कारखानें .. ... ... .. ... | २ |

याशिवाय कारखान्याच्या कक्षेंत न येणारे असें लहान प्रमाणावरील उद्योगधंदे खालीलप्रमाणें होते :—

| | |
|---|---|
| (१) बेबी एक्स्पेलर्स तेलघाण्या ... ... ... ... | ५० ते ६० |
| (२) साबण कारखाने . ... . .. | ४ |
| (३) लांकूड कापण्याचे कारखानें ... .. ... ... | १५ |
| (४) सिमेंटच्या विटा बनवणारे ... ... ... .. | १ |
| (५) पेपरमेंट बनवणारे ... ... ... .. ... | १ |
| (६) एजिनिअरींग वर्कशॉप ... .. ... ... | २० |

विजय इंडस्ट्रीज लिमिटेड, खेतान टाइल वर्क्स आणि हनुमान मेकॅनिकल वर्कशाप यांनी आपापल्या धंद्यांत बरीच प्रगती केली आहे. विजय इंडस्ट्रिजमध्यें दवाखानें व म्युनिसिपालिटचा यांना लागणारे सगळे लोखंडी सामान तयार करण्यांत येते शिवाय इलेक्ट्रिसिटी बोर्डास लाइन्स टाकण्याकरितां उपयोगी असलेलेहि सामान या ठिकाणीं तयार होते. वऱ्हाडांत अशा प्रकारचा हा एकटाच कारखाना असून येथील मालास वऱ्हाड, माराठवाडा व मध्यप्रदेश येथून मागणी येते.

खेतान टाइल्स वर्क्समध्यें सिमेंटच्या विटा बनवल्या जातात. मोठमोठ्या इमारतींत जमीन करण्याकरितां यांचाच बहुतेक उपयोग केला जातो. या कारखान्यांतील मालास देखील विदर्भ, मराठवाडा, मध्यप्रदेश, खानदेश वगैरे भागांतून बरीच मागणी येते.

हनुमान मेकॅनिकल वर्क्स हें यंत्र दुरुस्तीचें ठिकाण असून या ठिकाणीं सगळ्या प्रकारची यंत्रें दुरुस्त होतातच पण यंत्रांचे सुटे भागहि बनवले जातात. विदर्भ, मराठवाडा, मध्यप्रदेश आणि खानदेश विभागांतील कोणतेहि यंत्र दुरुस्तीच्या किंवा सुटया भागाच्या अभावी बंद पडूं देणार नाहीं असा चालकांचा दावा आहे.

## रोजगार

उद्योगधंद्यांत किती लोकांना काम मिळतें याची अधिकृत माहिती उपलब्ध नाहीं. १९५१ सालच्या शिरगणतीप्रमाणें एकूण ९५०,९९४ लोकसंख्येपैकीं ७२,४०९ लोक बिगरशेतीच्या उत्पादनांत गुंतलेले होते. १९५७ सालीं गोळा केलेल्या माहितीप्रमाणें वर दिलेल्या कारखान्यातून एकूण १०,००० लोक काम करीत होते. पैकीं ८,००० लोक जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी व कापडाच्या गिरण्यांतून काम करीत होते. कापडाच्या गिरण्या सोडल्यास जिनिंग फॅक्टरी, डाळ करण्याचें कारखानें वगैरे फक्त मोसमी रोजगार देणारे धंदे आहेत. वर्षांतून फक्त कांहीं महिनेच जीन प्रेस चालू असतात व इतर वेळीं मजूरांना शेतीवर रोजगारीस जावें लागतें.

## नवीन उद्योग

उद्योग विभागाचे कार्यालय, अकोला, येथे १९५८ च्या आक्टोबरमध्यें उघडण्यांत आले. ज्या कारखान्यांत आपल्या धंद्याकरितां यंत्रसामुग्री किंवा इतर माल आयात करावा लागतो त्यांना तो माल आवश्यक असल्याबद्दलचे सर्टिफिकेट त्या कार्यालयाकडून मिळते. आतांपर्यंत त्यांनी कॉटन जिनिंग अॅन्ड प्रेसिंग फॅक्टरीज, लोखंडी पत्र्यांचे सामान बनवणारे, साबण, तेल वगैरेचे कारखानदार यांना अशीं सर्टिफिकिटें दिली आहेत. खेतान इंडस्ट्रीज्‌ला हायर परचेस पद्धतीने यंत्रसामुग्री दिली व बिस्किट फॅक्टरी, सहकारी जिनिंग फॅक्टरी, दवाखान्यांना लागणारा कापूस तयार करणें, रद्दी कापसापासून सूत तयार करणें, दालमिल व पोहे तयार करणें वगैरे कारखान्यांना यंत्रसामुग्री मिळावी म्हणून शिफारस केली. याशिवाय खालील उद्योगधंदे येथे नव्यानेंच सुरू झाले आहेत:—

(१) विदर्भ हार्ड वेअर इंडस्ट्रीज, आकोला—लोखंडी पत्र्यांपासून खुर्च्या, पाळणें, टॅस्ण्ड वगैरेंना लागणारे पाईप बनविणे

(२) नेवाटीया इंडस्ट्रीज—तार खिळे व तारचुका तयार करतात.

(३) बकेट फॅक्टरी—विजेच्या यंत्राच्या साहाय्याने बादल्या वगैरे तयार करणें.

खालील उद्योगधंदे निघण्याचा संभव आहे

(१) घड्याळांचा कारखाना—कारंजा येथे मोठी घड्याळें तयार करण्याचा कारखाना काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

(२) स्टील सेलिंग मिल—गांठी बांधण्याच्या पट्ट्या, गज वगैरे तयार करतात.

खालील उद्योगधंदे या जिल्ह्यांत निघू शकतील अशी शिफारस उद्योग विभागाकडून करण्यांत आली आहे:—

(१) स्टील फर्निचर बनविणें.
(२) बिजागिऱ्या, हॅण्डल्स, दरवाज्यांची कुलपें बनविणें.
(३) पाण्याचे मीटर्स बनविणें.
(४) कडबा कापण्याचे यंत्र बनविणें.
(५) घड्याळे बनविणें.
(६) V–क्रास नटस् बनविणें.

(७) जुने लोखंड गाळून त्याच्या पट्टया व गज बनविणें.
(८) विजेचे कॉंक्रीटचे खांब बनविणें.
(९) फुटबॉल, व्हॉलीबॉल, बासकेट बॉल, क्रिकेट व हॉकी बॉलस्, विकेट किपरचे हातमोजे वगैरे बनविणें.
(१०) स्वीच फ्युजेस.
(११) विजेने कल्हई करणें.
(१२) रबरी वस्तू उदाहरणार्थं---गरम पाण्याने शेकण्याच्या पिशव्या वगैरे.
(१३) पोलीथेलिन (Polytheline) पाईप्स व टच्युबज्.
(१४) पोलीथेलीन ले फ्लट टच्युबिंग.
(१५) पी. व्ही. सी. (P. V. C) केबलस् व स्लीव्हिंग अॅन्ड टच्युबिंग.

## इंडस्ट्रीयल इस्टेट

लोकांना रोजगार पुरवून शेतीवरील बोजा कमी करण्याचे दृष्टीनें तिसऱ्या योजनाकालांत आकोला येथें इंडस्ट्रिअल इस्टेट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. स्थानिक व्यापारी उद्योगधंदे सुरूं करण्यास तयार असून इंडस्ट्रिअल इस्टेटकरितां योग्य जागा निवडण्याचें काम सुरूं आहे. जिल्ह्यांत मजूरांची संख्या पुष्कळ असून आकोल्याजवळच पारस येथें एक विद्युत् निर्मिती केंद्र उभारलें गलें आहे. त्यामुळें उद्योगधंद्याकरितां वीज व मजूर भरपूर मिळूं शकतील. शिवाय आकोला हें मुंबई-कलकत्ता आणि मद्रास-दिल्ली रेल्वेमार्गावर आणि मुंबई-कलकता नॅशनल हाय-वे वर असल्यामुळें कच्चा माल आणण्यास व पक्का माल बाहेर पाठविण्यास सर्व सोयी उपलब्ध आहेत.

## कामगार संघटना


लालबावटा युनियन व राष्ट्रीय मिल मजूर संघ अशा मजूरांच्या दोन प्रमुख संघटना जिल्ह्यांत आहेत

## कामगार कल्याण केंद्र

आकोला येथें दोन कामगार कल्याण केंद्रें व आकोला आणि कारंजा येथें प्रत्येकीं एक बहुप्रयोजन कामगार कल्याण केंद्रें अशी एकूण चार कामगार कल्याण केंद्रें आहेत. साध्या कल्याण केंद्रांत कामगारांकरितां वाचनालय, खेळ वगैरेची सोय असून वेळोवेळीं करमणूकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. बहुप्रयोजन केंद्रांत धंदेशिक्षणहि दिलें जातें. आकोला येथील बहुप्रयोजन केंद्र फक्त स्त्रियांकरितां असून त्यांना शिवणकाम, भरतकाम वगैरे शिकवलें जाते. तेथें शिकून तयार झालेल्या स्त्रिया आपापले कपडे स्वत: शिवूं लागल्या आहेत. त्यांचे उपयोगाकरितां केंद्रांत भाड्यानें देण्याकरितां एक शिवणयंत्रहि ठेवलें आहे. कारंजा येथील केंद्रांत सुतारकाम, भरतकाम, विणकाम वगैरेची सोय आहे.

## व्यापार

जिल्ह्यांत निर्माण होणाऱ्या शेतीच्या, कापूस, धान्य वगैरे मालाचा व्यापार बहुतेक ठिकाणीं चालतो. पैकीं कापसाकरितां आकोला, आकोट, वाशिम, कारंजा हीं ठिकाणें प्रमुख आहेत. धान्याचें व्यापाराकरितां आकोला व रिसोड हे प्रमुख आहेत. रिसोड हें वऱ्हाड व मराठवाडा यांचे हद्दीवर असल्यामुळें मराठवाड्याचाहि माल येथें विक्रीकरितां येतो. बैलांच्या बाजाराकरितां मूर्तिजापूर तालुक्यांतील उंबर्डा बाजार प्रसिद्ध आहे. येथें विदर्भाच्या बाहेरचे देखील लोक बैल खरेदीस येतात. बाजाराचे मुख्य तीन दिवस आहेत पण विक्रीकरितां जनावरें केव्हांहि उपलब्ध असतात. लांबच्या ठिकाणाहून विक्रीकरितां जनावरें येतात.



अकोला जिल्हा
दळणवळण, तार व टेलिफोन व्यवस्था
अंजनगावसूर्जी
हिवरखेड
आकोट
तेल्हारा
दर्यापूर
दहिहांडा
किनखेड
उरळ
शेगांव
मुंबईकडे
खामगाव
पारस
अकोला
मूर्तिझापूर
माना
अमरावतीकडे
बोरगांव म
बाळापूर
बार्शीटाकळी
वाडेगांव
पिंजर
खेरडा
महान
कारंजा
पातूर
धानी
आलेगाव
मेडशी
शेलू
मंगरूळ
दारव्ह्याकडे
मालेगांव
शिरपूर
धानोरा
मानोरा
वाशीम
रिसोड
लोणी
उमरखेडकडे
हिंगोलीकडे
य व त मा ळ
प र भ णि जि ल्हा
• पोष्ट व तार ऑफिसेस
o तार ऑफिस
टेलिफोन एक्सचेंज
पब्लिक कॉल ऑफिस
V फोनोफोनची सोय असलेली गांवे
लोहमार्ग
नॅशनल हायवे
स्टेट हायवे
जिल्ह्यांतील इतर रस्ते
भावी रस्ते

आकोला हें कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली रेल्वेमार्ग व कलकत्ता-मुंबई नॅशनल हायवेवर असल्या-मुळें व जिल्ह्यांतील सर्व ठिकाणांशी मोटार वाहतुंकीनें जोडले असल्याकारणानें सगळ्या प्रकारच्या ठोक व चिल्लर व्यापाराचें प्रमुख केंद्र बनलें आहे. जिल्ह्यांतील तयार होणारा व बाहेरगांवीं जाणारा सगळा शेतमाल येथूनच जातो व जनतेला लागणारा इतर सगळा माल बाहेरून येथेंच येतो. त्यामुळें प्रत्येक वस्तूचे ठोक मालाचे बरेच व्यापारी या ठिकाणीं आहेत. कापड, किराणा, धान्य, सोने, चांदी, कापूस, तेल, औषधि, लोंखंडी सामान, कागद , स्टेशनरी, बांगड्या वगैरेचा करोडो रुपयांचा व्यापार येथें दररोज चालतो. प्रत्येक व्यापारांतील व्यापाऱ्यांचें एक एक असोशिएशन असून सर्वांचें मिळून एक विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स येथें आहे. कोणतीहि वस्तू येथें मिळत नाहीं असें नाहीं. आकोला नगरपालिकेनें गेल्या वर्षीपासून ऑक्ट्राय कर बसवला. त्या पासून कमेटीचें दररोजचें सरासरी उत्पन्न ३ ते ४ हजार रुपये येतें. सेल्स टॅक्सचें जिल्ह्यांतील वार्षिक उत्पन्न २ ते २½ लाख रुपये आहे. मालाची बाहेरगांवी ने-आण करणारे ५० ते ६० ट्रक्स दररोज येथें येतात व जातात.

## विड्याची पानें

आकोट हें विड्याच्या पानांचें मोठें केंद्र आहे. येथें बाऱ्यांची संख्या सुमारें ५०० कुटुंबांची असून १२५ पानमळें आहेत. गेल्या १५–२० वर्षापासून येथील पानें बाहेर पाठविण्यास सुरुवात झाली. अमृतसर, दिल्ली, बऱ्हाणपूर, अंबाला, फिरोजपूर, अहमदाबाद, सुरत, जळगांव, खानदेश वगैरे ठिकाणीं येथून पानें जातात. येथील पान पिकवतां येतें व दोन दोन महिनें टिकवतां येतें. मद्रासचें पान इतकें पिकावूं व टिकावूं नाहीं. सबब मद्रास पानांपेक्षां वऱ्हाडी पानास सगळीकडेच मागणीं जास्त आहे. कपूरी, बंगला व लबाड अशी तीन प्रकारची पानें येथें होतात. दसऱ्यापासून होळींपर्यंत निघणारा मालच फक्त टिकावू असतो. सबब तोच माल बाहेर पाठविला जातो. आकोट व आजूबाजूची खेडीं मिळून सुमारें ३०० एकर जमीन पानमळ्याखालीं आहे.

१९५१ सालपर्यंत हा व्यापार फार भरभराटीस होता. दररोज १५-१६ लाख पानांची व ४ ते ४½ हजार रुपयांची उलाढाल होत असे. १९५१ पासून उत्पादन घटूं लागलें. व बंगला जातीच्या पानाची पैदास अत्यंत कमी झाली आहे. सध्यां फक्त ३५० ते ४०० रुपयांची उलाढाल दररोज होते. वीज आल्यापासून विहीरीवर पंप बसवून ओलीताची चांगली सोय लोक करूं लागले आहेत. १९५१ पेक्षां पान मळ्याखालीं १९६० मध्यें १० एकर जमीन जास्त आली आहे पण उत्पादन मात्र बरेच कमी झालें आहे. उत्पादन घटण्याच्या कारणांचें शास्त्रीय संशोधन होवून त्यावर वेळींच उपाय केले गेले नाहींत तर हा व्यापार बुडण्याचा संभव जास्त आहे.

# वाहतूक व दळणवळण

जिल्ह्यांतील सर्व वाहतुक खुष्कीच्या मार्गानें होते. जलमार्गाची मुळींच शक्यता नाही. आकोला येथें एक विमान उतरण्याकरितां मैदान आहे पण विमानांची नियमित वाहातूक सुरूं झालेली नाहीं. विमान-तळ मोठें वाढवून विमानांच्या वाहातूकीस योग्य करण्याची योजना आहे. सध्यां कांहीं वर्षें तरी ती शक्यता नाहीं.

## रेल्वे मार्ग

मध्य रेल्वेचा कलकत्ता-मुंबई रेल्वेमार्ग या जिल्ह्यांतून जातो व त्यावर मूर्तिजापूर व आकोला ही मोठी शहरें आहेत. याची जिल्ह्यांतील लांबी फक्त ५० मैल असावी. दुसरा मिटर गेज रेल्वेचा मार्ग हिंगोलीपासून खांडव्यापर्यंत सुमारें १०० मैल याच जिल्ह्यांतून जातो. मध्य रेल्वे मार्ग पूर्व-पश्चिम जातो व हिंगोली-खांडवा रेल्वे मार्ग दक्षिण-उत्तर जातो. हा मार्ग मिटर गेज असून लोकांच्या वाहतूकी करितां २ जानेवारी १९६१ रोजीं सुरू झाला. त्यामुळें दक्षिणेकडील मिटरगेज लाईन उत्तरेकडील मिटरगेज लाइनशी सांधली जावून मद्रासपासून दिल्लीपर्यंत जाणारा मिटर गेजचा मार्ग निर्माण झाला. हा मार्ग आकोट तालुक्यांत मेळघाट डोंगरातून ज्या ठिकाणीं जातो तें ठिकाण प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. याशिवाय एक मार्ग मूर्तिजापूरपासून उत्तरेकडे अचलपूर (जि. अमरावती) व दक्षिणेस यवतमाळपर्यंत जातो. हा नॅरो गेज असून गाडीचा वेग फारच कमी व सगळीकडे मोटारचे रस्ते असल्यामुळें या रेल्वे-मार्गानें वाहतूक फारच कमी होते.

## सडका

जिल्ह्यांत सगळीकडे उत्तम सडका आहेत. प्रत्येक तालुक्याचे ठिकाण जिल्ह्याच्या ठिकाणाशीं जोडले आहे इतकेंच नसून परस्पराशी सुद्धां इतरहि मार्गानें जोडले गेले आहे. अमरावती, बुलढाणा व यवतमाळ ही इतर जिल्ह्यांची ठिकाणें देखील आकोल्याशी जोडलेली असून आकोल्यापासून सगळी-कडे जाणाऱ्या नियमित मोटारी अर्ध्या अर्ध्यां तासाच्या अंतरानें दिवसभर सुरूं असतात. आकोल्याचे दक्षिण भागास वऱ्हाडांत आजपर्यंत रेल्वेमार्ग नसल्यामुळें दक्षिणेकडे सगळ्या ठिकाणी आकोला येथूनच मालाची व माणसांची वाहातूक होते. कलकत्ता-मुंबई जाणारा नॅशनल हाय-वे देखील याच जिल्ह्यांतून पूर्व-पश्चिम जातो व त्याची लांबी ७० मैल आहे व आणखी १८ मैल रस्ता बांधण्याचें काम सुरूं आहे.

लोककर्म विभागाच्या सडकांची एकूण लांबी ४६५ मैल असून त्यांचे वर्गीकरण १९५९-६० सालीं खालीलप्रमाणें होतें:—

| | मैल |
|---|---|
| नॅशनल हाय-वे ... ... ... | ७०.१२ |
| स्टेट हाय-वे ... ... ... | ६४.५७ |
| मेजर डिस्ट्रिक्ट रोडस् ... ... ... | २०९.६६ |
| इतर डिस्ट्रिक्ट रोडस् ... ... ... | १०३.४७ |
| व्हिलेज रोडस् ... ... ... | १७.७६ |
| एकूण ... | ४६५.५८ |

१९६०-६१ मध्यें आतांपर्यंत यांत आणखी २३ मैलांची भर पडली असून आज मितीस त्यांची लांबी ४८८ मैल झाली आहे. यापैकीं मैल डामरी रस्ते आहेत. सगळ्या नद्यांवर पूल असून पाव-साळ्यांतहि वाहतूक बंद होण्याचे प्रसंग फारसे येत नाहींत.

## जनपद व इतर रस्ते

याशिवाय जनपदानीं तयार केलेल्या रस्त्यांची लांबी ४०.९५ मैल आहे. विकास खंड सुरू झाल्या-नंतर कित्येक खेड्यांनी आपापली गांवें मुख्य रस्त्यास जोडणारे रस्ते तयार केलें आहेत. हे रस्ते अद्याप विकास खंडांच्याच ताब्यांत असून अशा रस्त्यांची लांबी ३७.४० मैल आहे. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणा-पासून कोणत्याहि ठिकाणीं मोटारनें तीन तासाचे आंत पोंचता येते.

## डाकबंगले (विश्राम-गृहें)

जिल्ह्यांत एकूण १७ डाकबंगले व दोन सर्किट हाऊस असून त्या ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांना रोजीं आठ आणे देवून थांबतां येतें. ज्या ठिकाणीं वीज किंवा सेप्टिक टँक संडासाची सोय झाली आहे तेथें बारा आणे आणखी द्यावे लागतात. गैरसरकारी अधिकाऱ्यांनादेखील उतरतां येतें पण पैसे जास्त द्यावे लागतात. प्रत्येक डागबंगल्यावर बिछान्याची सोय असते व खानसामा (चौकीदार) त्याला सांगितल्यास चहा, जेवण वगैरेची सोय करून देतो. बहुतेक शहरांतून लॉजिंग बोर्डिंगची व्यवस्था आहे.

## जुनी डाक लाइन

ब्रिटिश अमदानीपूर्वी जालना ते नागपूर जाणारा मार्ग याच जिल्ह्यांतून जातो. याच रस्त्यानें पूर्वी मिलीटरी व डाक जात असल्यामुळें यास डाक लाइन असें म्हणतात. ही सडक वाशिम, मंगरूळ व मूर्तिजापूर तालुक्यांतून जात असून अद्यापहि कायम आहे. या मार्गानें नियमित वाहतूक मात्र सध्यां होत नाहीं.

## पोस्ट, तार व टेलिफोन

जिल्ह्यांत एकूण २७१ पोस्ट ऑफिसेस आहेत. २,००० लोकवस्तीच्या प्रत्येक ठिकाणीं पोस्ट ऑफिस तर आहेच पण २,००० लोकसंख्येच्या खेड्यांच्या गटाला देखील एक पोस्ट ऑफिस आहे. यांतील २१ पोस्ट ऑफिसांतून तारेची व्यवस्था आहे. आकोला येथें एक स्वतंत्र तार ऑफिस आहे. १२० पोस्टांतून सेव्हिंग्ज बँक खाती उघडण्याची सोय आहे. कोणतेंहि खेडें नजीकच्या पोस्ट ऑफिसापासून दोन मैलापेक्षां जास्त लांब नाहीं.

आकोला, आकोट, वाशिम, मूर्तिजापूर व कारंजा या ठिकाणीं टेलिफोन एक्सचेंजची व्यवस्था आहे. तेल्हारा, बाळापूर, मंगरूळ, मालेगांव, वाडेगांव, हिवरखेड, बार्शीटाकळी, बोरगांव मंजू व शिरपूर येथें टेलिफोन असून टेलिफोनवर तारा पाठविण्यांत येतात. परंतु संभाषण करतां येत नाहीं. यापैकीं बाळापूर, तेल्हारा, मालेगांव, बोरगांव मंजू व मंगरूळ या ठिकाणीं पोस्ट ऑफिसांत टेलिफोन असून तेथून इतर गावांशी संभाषण करण्याकरितां लोकांस परवानगी आहे.

# लोक स्वास्थ्य

जिल्ह्याचें हवामान उष्ण व कोरडे असून निरोगी असें आहे. कोणताहि रोग जास्त प्रमाणांत आहे असें नाहीं. दवाखान्यांत औषध घेण्यास येणाऱ्या आजाऱ्यांच्या संख्येवरून पचनक्रियेशी व श्वसनक्रियेशी संबंधित अशा आजारांचे प्रमाण जास्त आढळतें. गेल्या दोन-तीन वर्षांचे आंकडे पाहिले असतां दवाखान्यांत येवून औषध घेणाऱ्यांच्या संख्येंत सारखी वाढ होत आली आहे. याचें कारण औषधी मिळण्याच्या सोयी उत्तरोत्तर वाढत आहेत व लोकांची प्रवृत्ती पूर्वीप्रमाणें दैवावर भरंवसा ठेवून स्वस्थ बसण्याची न राहतां औषध घेण्याकडे वाढूं लागली आहे. विशेषत: स्त्रियांचे बाबतींत हें ठळक प्रमाणांत नजरेंत भरते. १९५५ सालीं सरकारी दवाखान्यांतून फक्त ८३,६०१ स्त्रियांनी औषध घेतलें तर १९५८ सालीं ती संख्या १३४,३०४ पर्यंत वाढली. प्रसूतिकरितां देखील स्त्रिया सूतिकागृहांचा उपयोग जास्त प्रमाणांत करूं लागल्या आहेत. सरकारी दवाखान्यांतून असलेल्या प्रसूति गृहातील जागा तर नेहमीं भरलेल्या असतातच पण आकोला शहरांत प्रॅक्टिस करणाऱ्या सगळ्या महिला-डॉक्टरांचे एक एक प्रसूतिगृह असून त्यांची जास्ती प्रॅक्टिस बाळंतपणाच्या केसेसचीच आहे. नुसतें औषधी देण्याकडे त्यांचें विशेष लक्ष नाहीं. ग्रामिण विभागातून प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांतून प्रसूतीची सोय असल्यामुळें ग्रामिण स्त्रियांदेखील सूतिकांगृहाचा उपयोग करूं लागल्या आहेत. १९५६ ते १९५९ चे जन्म-मृत्यूचे आंकडे पाहतां १९५६ मध्यें असलेलें जन्मांचें दरहजारी प्रमाण ४९.४४ वरून ४५.०० वर आलें तर मृत्यूचें प्रमाण ह्याच अवधींत ३९.०५ वरून २० ८० पर्यंत घसरलें. बालमृत्यूचें प्रमाणदेखील १९५८ मध्यें दर हजारीं १८४.९३ होतें तें १९५९ मध्यें फक्त ८३.५२ नेच होतें. १९५५-५६ व ५७ सालचे याबाबतीतील आंकडे उपलब्ध नाहींत.

## आरोग्याच्या सोयी

स्वास्थ्य विभागाचा भर दिवसानुदिवस नुसत्या औषधी देवून आजार दुरुस्त करण्यावरून कमी होवून रोगप्रतिबंधक व आरोग्यरक्षक उपायावर जास्त वाढत आहे. त्यामुळें जिल्ह्यांतील दवाखान्यांच्या किंवा रुग्णालयांच्या संख्येंत फारशीं वाढ झालीं नाही.

आकोला येथें सिव्हिल सर्जनच्या हाताखालीं एक मुख्य रुग्णालय असून त्यांत शस्त्रक्रियेची व एक्सरे फोटोग्राफ काढण्याच्या सोयी आहेत. रोग्यांच्याकरितां १७९ खाटांची व्यवस्था असून त्यांपैकीं स्वत:च्या खर्चानें राहणाऱ्या रोग्यांकरितां २२ खाटा आहेत. येथें असलेल्या क्षय रोग्यांच्या खाटांची संख्या नुकतीच वाढविण्यांत आली असून क्षयरोग्यांच्या उपचाराकरतां एक स्वतंत्र क्लिनिक बांधण्यांत आलें आहे. स्त्रियांच्याकरितादेखील एक स्वतंत्र १३८ खाटांचे रुग्णालय असून त्यावर सिव्हिल सर्जनच्या दर्जाची एक स्त्री डॉक्टर प्रमुख आहे. येथें देखील शस्त्रक्रियेच्या सोयी असून शिवाय प्रसूतीची देखील सोय आहे. या शिवाय तालुक्यांत ठिकठिकाणी सरकारी दवाखानें असून तेथें औषधपाण्याच्या सोयी आहेत. अशा दवाखान्यांतूनदेखील रुग्णांकरितां कांही खाटा ठेवलेल्या असतात पण विशेष भर औषध वितरणावर आहे. शस्त्रक्रियेच्या किंवा एक्सरेच्या सोयी अशा दवाखान्यांतून नाहीत. स्त्रियांकरितां स्वतंत्र असें रुग्णालय जिल्ह्यांत मर्तिजापूर सोडून इतरत्र नाहीं.

तालुक्यांतील खेडे विभागांत औषधाची व्यवस्था करण्याची जबाबदारी जनपदसभांची असून त्यांनी आपापल्या क्षेत्रांत शक्य तेथें दवाखानें उघडलें आहेत. सरकारी दवाखानें पाश्चिमात्य वैद्यक पद्धतीचें आहेत तर जनपदाचे दवाखाने आयुर्वेद पद्धतीचे आहेत. तालुक्यांत देवी काढण्याचें काम नगरपालिका व जनपदसभा यांचेकडे असून जिल्ह्यांत एकूण २२ देवीडॉक्टर आहेत.

जिल्ह्यांतील औषधालयांची संख्या खालील तक्त्यांत दर्शविली आहे :—

| | १९५७-५८ | १९५८-५९ | १९५९-६० |
|---|---|---|---|
| रुग्णालयें . . ... . | १२ | १२ | १२ |
| औषधालयें ... . . . . | १२ | १२ | १२ |
| आयुर्वेदीय, युनानी व होमिओपॅथिक दवाखाने. | १७ | १७ | १७ |
| डॉक्टरांची संख्या . | ३३ | ३३ | ३३ |
| नर्सेस . . . . | २२ | २२ | २३ |
| खाटांची संख्या ... . . . . | ४०० | ३४६ | ३४६ |

## प्रशिक्षणाची सोय

लेडी हार्डिज हॉस्पटल, आकोला, येथें ऑक्झिलिअरी नर्स-मिडवाईफरीच्या शिक्षणाचा २½ वर्षाचा कोर्स असून ७५ मुलींची सोय आहे. मेन हॉस्पिटल, आकोला, येथे जनरल नर्सिंगच्या ३½ वर्षाच्या कोर्सची सोय असून ५० मुलींची सोय आहे.

## आरोग्य रक्षण

आरोग्यरक्षणाच्या प्रयत्नाकरितां एका जिल्हा स्वास्थ अधिकाऱ्याची नेमणूक झालेली असून जनपद-सभा व नगरपालिका यांना आरोग्यरक्षणाचे बाबतींत मार्गदर्शन करणें, लोकांना स्वच्छ आणि आरोग्य-कारक पद्धतीनें रहावयास शिकवणें, वगैरे कामें त्यांचे कडे दिलेली आहेत. सुरुवातीपासूनच आरोग्य रक्षणाचे उद्देशानें गर्भवती स्त्रिया व मुलें यांच्याहि आरोग्य रक्षणाकडे लक्ष दिलें जाते.

## प्राथमिक स्वास्थ्य केंद्र

जिल्ह्यांत एकूण ११ प्राथमिक स्वास्थ्य केंद्रें स्थापन करण्यांत आलीं असून त्यापैकीं आपातापा, कामरगांव, जामठी, मानोरा, अनसिंग, रिसोड, चतारी व पंचगव्हान अशी आठ खेडे विभागांत असून आकोट, मंगरूळ व बाळापूर ही तीन केंद्रें शहर विभागांत आहेत. बार्शीटाकळी व मालेगांव विकास खंडांत प्रत्येकी एक केंद्र उघडण्यांत यावयाचें असून त्यानंतर प्रत्येक विकास खंडांत एक केंद्र स्थापन झालेलें असेल. प्रत्येक केंद्रांत एक एम्. बी., बी. एस्. झालेला मेडिकल ऑफिसर, एक हेल्थ व्हिजीटर, चार मिड-वाइफस् व एक सॅनिटरी इन्स्पेक्टर असतो. प्रत्येक केन्द्राची चार उपकेंद्रें असून चार मिडवाइफस् प्रत्येक केंद्रास एक याप्रमाणें राहतात. त्या आपापल्या परिक्षेत्रातील गर्भवती स्त्रियांना त्यांचे घरीं जावून सल्ला देतात व बाळंतपणें करतात. बाळंतपणें करणाऱ्या स्थानिक दायांना देखील प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांतून बाळंतपण करण्याचें शिक्षण दिलें जाते व शिक्षणाचे अवधींत सरकारी मदत मिळते. ऑक्झिलिअरी नर्स-मिडवाइफरीचें शिक्षण घेणाऱ्या नर्सेस तीन महिने स्वास्थ्य केंद्रांतून प्रात्यक्षिक शिकण्याकरितां येतात. आकोला जिल्ह्यांत ही सोय चार प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांतून करण्यांत आलेली आहे. जनरल नर्सिंग कोर्सच्या प्रशिक्षितांना

ग्रामीण विभागाच्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. स्वास्थ्य केंद्र प्रमुख मेडिकल ऑफीसरचें उपयोगाकरितां युनिसेफनें एक मोटार दिली असून प्रत्येक मेडिकल ऑफीसर दररोज सकाळीं मुख्य ठिकाणी काम करून दुपारीं आपले परिक्षेत्रांत दौरा करून येतो. गरज पडेल तेव्हां ग्रामीण विभागांतून रोग्यांना केंद्राच्या मुख्य ठिकाणीं उपचाराकरितां आणण्यास तिचा ॲम्ब्युलन्स सारखाहि उपयोग होतो.

याशिवाय प्रत्येक तालुक्यांत एक सॅनिटरी इन्स्पेक्टर व चार मदतनीसाचे एक सॅनिटर पथक नेमण्याची योजना असून तें पथक खेड्यांत जावून सांड पाणी, सार्वजनिक संडास, मुत्रीघरें वगैरे स्वच्छ कसे ठेवावे याचें प्रात्यक्षिक देतात. अशी सहा पथके सध्यां जिल्ह्यांत काम करीत आहेत.

## आर्थिक मदत

ग्रामपंचायतींना, नगरपालिकांना वगैरे स्वच्छ संडास व आरोग्यकारक व्यवस्थेकरितां स्वास्थ्य विभागाकडून अनुदान, कर्ज वगैरे रुपानें मदत केली जाते.

## यात्रांची व्यवस्था

यात्रा, सार्वजनिक मेळे वगैरे ठिकाणीं पिण्याकरितां जंतुविरहित पाण्याची सोय करण्यांत येते व स्थानिक व्यवस्था कमिटीस आरोग्य संरक्षणांत मार्गदर्शन कलें जातें.

## मलेरिया निर्मूलन मोहीम

मलेरिया निर्मुलनाची मोहीम जिल्ह्यांत दोन वर्षापूर्वी सुरूं झाली असून त्याकरितां स्थापन झालेल्या मलेरिया कंट्रोल युनिटनें जिल्ह्यांतील प्रत्येक खेड्यांत डी. डी. टी. फवारण्यांचें काम केलें. यापुढें प्रत्येक खेड्यांतील तापान आजारी असलेल्या माणसांच्या रक्ताची तपासणी सुरूं झाली असून ज्यांना मलेरिया असेल अशांना सरकारी खर्चानें औषधि पुरविण्याचें काम सुरूं होणार आहे.

## क्षयरोग प्रतिबंधक मोहीम

जिल्हाभरांतून बी. सी. जी. च्या टीमनें टीके लावून तपासण्यांचें व क्षयरोग प्रतिबंधक इन्जक्शन्स् देण्याचें काम पूण झालें आहे. १९५८-५९ सालीं देवी प्रतिबंधक मोहीम करून एकंदर ६० टक्के लोक-संख्येला देवी टोचण्यांत आल्या.

## कुष्टरोग निवारण

मूर्तिजापूर येथें शासकीय कुष्टरोग उपचार केंद्र आहे. कारंजा नगरपालिकेनें एक क्लिनिक चालविलें असून त्यास सरकारी मदत देण्यांत येते. आठ दवाखान्यांतून कुष्टरोगावर औषधें देण्याची सोय आहे. याशिवाय पिंजर, आकोट , बाळापूर, पातूर, कामरगांव आणि वाशिम या ठिकाणीं कुष्टरोगाची पाहणी व उपचार करणारी पथकें असून तें खेड्याखेड्यांत जाऊन व शक्यतोतर घरोघर जाऊन औषधें पोंहचवतात. अशा प्रकारची पथकें उरलेल्या विकास खंडातूनही लवकरच स्थापन करण्यांत येतील.

## महारोगी सेवा मंडळ, तेल्हारा

डॉ. प्रकाशचंद्र गौरीशंकर पुरोहित नांवाचे एक गृहस्थ, तेल्हारा, येथे खाजगी रीतीने १ आगष्ट १९५७ पासून महारोग उपचाराचें काम करीत आहेत. वाडी, अहमदपूर, पंचगव्हाण, बेलखेड व तेल्हारा अशी त्यांची चार उपचार केंद्रें असून सर्व केंद्रें मिळून ६३८ रोगी औषध घेत आहेत, पैकीं ४०० पुरुष आहेत. या उपचार केंद्रामधून सुरुवातीपासून ज्यांनी औषध घेण्यास सुरुवात केली त्यापैकीं बरेचसे रोगी बरे होत आलें असून २५ रोगी पूर्ण बरे झाले व त्यांनी लग्नें देखील केली आहेत.

डॉ. पुरोहित हे दिल्ली बोर्डाचे आयुर्विद्या विशाद असून त्यांनी दतपूर येथें महारोग उपचाराचें शिक्षण व डिप्लोमा घेतला. नंतर सेवाग्राम येथें व वरोडा येथें अठरा महिने उपचारांचें काम करून तेल्हारा येथें स्वतंत्र रीतीनें कार्य करण्यास सुरवात केली. आपल्या कार्याकरितां त्यांनी ३१ डिसेंबर १९५८ रोजीं महारोगी सेवा मंडळ नांवाची संस्था स्थापन केली व रजिस्टर केली. ते स्वतः संस्थेचे सेक्रेटरी म्हणून काम करतात. संस्थेस श्री. ब्रिजमोहन मोरारका यांनी दोन गुंठे जागा दिली असून त्याचें भूमिपूजन व इमारतीचा शिलान्यास १ डिसेंबर १९५८ रोजीं त्यावेळचे मुंबई राज्याचे स्वास्थ्य मंत्री, श्री. मा. सा. कन्नमवार, यांचें हस्तें झाला. डॉ. पुरोहित हे अॅलोपॅथिक औषधाबरोबरच आयुर्वेदीय औषधांचाही वापर महारोगावर करतात.

## कुटुंब नियोजन कार्य

जिल्ह्यांत एकूण ९ कुटुंब नियोजन केंद्रें असून त्यापैकीं सात खेडे विभागांत व दोन शहर विभागांत आहेत. ग्रामीण भागांतील केंद्रांत प्रशिक्षित अशी एक नर्स ठेवण्यांत आलेली असून ती आजूबाजूच्या १०,००० लोकवस्तीत प्रत्येक कुटुंबाशी संपर्क प्रस्थापित करून त्यांना सल्ला देते व जी दांपत्यें नियोजन करावयास तयार असतील त्यांना औषधे व साधनें फुकट पुरवते व पुनः पुनः त्यांचेकडे जाऊन ते साधनांचा उपयोग योग्य रीतीनें करतात किंवा नाहीं याची पाहणी करते. पुरुषांना सल्ला देण्याचें काम प्राथमिक स्वास्थ्य केंद्राचे डॉक्टर करतात. आतांपर्यंत २६,००० दंपत्यांना भेटून सल्ला दिला व त्यापैकीं २,०१० कुटुंबे कुटुंब नियोजन करीत आहेत.

शहर विभागांत कुटुंब नियोजन केंद्र चालविण्याचें काम खाजगी संस्थाकडे देण्यांत येतें व त्याच्या खर्चास सरकारी मदत देण्यांत येते.

## कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

पुरुषांचे बाबतींत शस्त्रक्रिया करण्याकरितां आतांपर्यंत सात शिबीरे घेण्यांत आली व सुमारे ३६१ इसमांनी स्वखुषीनें शस्त्रक्रिया करून घेतली. याशिवाय दवाखान्यांतून जवळजवळ २३२ इसमांनी शस्त्रक्रिया करून घेतली. सरकारी योजनेनुसार प्रत्येक शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यास २० रुपये, शस्त्रक्रियेस उद्युक्त करणारास माणशी दोन रुपये व याकरितां शिबीर घेणाऱ्या संस्थेस माणशी ५ रुपये मिळतात.

पुढील पांच वर्षांत ग्रामीण विभागांतून ४३८ केंद्रें व शहर विभागांतून ४५० केंद्रें स्थापन करण्याची योजना आहे.

## फिरतें रुग्णालय

आकोला, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांकरितां एक पूर्ण साधनानिशी व कर्मचाऱ्यानिशी सुसज्ज असें फिरतें रुग्णालय स्थापन झालें असून त्याचें मुख्य ठिकाण आकोला येथें आहे. साथ, यात्रा वगैरे ठिकाणीं जरूरीच्या वेळीं तेथें जावून हें रुग्णालय काय करिते.

# शिक्षण व्यवस्था

पहिल्या वर्गापासून पदवी परीक्षेपर्यंतचा शिक्षणक्रम एकूण १४ वर्षांचा आहे. त्यांत प्रायमरी, सेकंडरी व विद्यालयीन अशा तीन पायऱ्या (अवस्था) आहेत. प्रायमरी अवस्थेंत मराठीच्या चार वर्गांचा समावेश होतो. कांहीं शाळांतून मराठीच्या चार वर्गाला जोडून आणखी तीन वरचे वर्ग असतात. व त्या तीन वर्गांतून इंग्रजी हा विषय ऐच्छिक असतो. अशा शाळांना इंडियन मिडल् स्कूल म्हणतात. ज्या शाळांतून मराठी ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यांत येतो व जेथें फक्त पुढले चारच वर्ग असतात व जेथें इंग्रजी हा विषय आवश्यक असतो अशा शाळांना इंडियन इंग्लिश मिडल् स्कूल म्हणतात. याचे वरती मॅट्रिकच्या परिक्षेपर्यंत दोन वर्ग असतात. त्यांना हायस्कूल असें संबोधलें जातें. इंडियन इंग्लिश मिडल् स्कूल व हायस्कूल यांचा समावेश सेकंडरी अवस्थेंत होतो. मॅट्रिक परीक्षेपर्यंतचें सर्व शिक्षणाचें माध्यम मराठी, हिंदी अथवा उर्दु आहे.

## प्रायमरी शिक्षण

प्रायमरी शिक्षणाची जबाबदारी शहरांतून नगरपालिकांनी व खेडे विभागांतून जनपद सभांनी घेतली आहे. प्रायमरी शिक्षणाच्या फक्त सात सरकारी शाळा आहेत. नगरपालिकांतून प्रायमरी शिक्षणाचे फक्त चार वर्ग आहेत. जनपद क्षेत्रांतून प्रायमरी शाळेचे प्राथमिक चार व कित्येक ठिकाणीं इंडियन मिडल् स्कूलचे आणखी तीन मिळून सात वर्ग आहेत. अशा शाळांची संख्या जिल्ह्यातून फक्त २०१ आहे. प्रायमरी शिक्षण संस्थांच्या शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संख्येंत उत्तरोत्तर वाढ होत आहे. १९५९-६० सालीं मुलांच्या १,११३ व मुलींच्या ५२ मिळून १,१६५ प्रायमरी शाळा होत्या. जिल्ह्यातील एकूण १,४०० खेड्यांपैकीं १,००५ खेड्यांत शाळा आहेत व आजूबाजूची ३०० गांवें त्यांचा फायदा घेऊ शकतात. आतां-पर्यंत २०० लोकवस्तीच्या प्रत्येक खेड्यांतील मुलांना प्राथमिक शिक्षणाची सोय झाली असून आणखी फक्त १०० शाळा उघडल्यास जिल्ह्यांच्या प्रत्येक खेड्यांतून प्राथमिक शिक्षणाची सोय झाल्यासारखें होईल.

१,१६५ शाळांपैकीं १,०५९ शाळा खेडेविभागांत व १०६ शाळा शहरविभागांत आहेत, पैकीं ७९५ शाळांना स्वतःच्या इमारती आहेत. १९६०-६१ सालांत प्रायमरी शाळांची संख्या १,२३० झाली व त्यांत जाणाऱ्या मुलांची संख्या ६६,८५१ व मुलींची संख्या ३३,५७४ मिळून एकूण विद्यार्थी १००,४२५ आहेत व त्यांना शिकविण्याकरितां शिक्षक व शिक्षिका मिळून ४,०२० आहेत पैकीं २,०९९ प्रशिक्षित व १,९२१ अप्रशिक्षित आहेत.

## बुनियादी शिक्षण

सर्वच प्रायमरी शाळांतील शिक्षणक्रम बुनियादी पद्धतीचा आहे. पण ज्या शाळांतून मूलोद्योगाचें शिक्षण सुरू झालें आहे अशा सुमारें १०० शाळा आहेत. पैकीं सात सरकारी व बाकीच्या जनपदाच्या आहेत. यांतून कताई, विणकाम किंवा कृषि हे मूलोद्योग शिकविले जातात. या शाळांना बेसिक स्कूल्स् असें संबोधिलें जातें, कारण त्यांतून मुख्य शिक्षण मूलोद्योगाचें व इतर शिक्षण त्याचे अनुषंगानें देण्याची पद्धत आहे. ज्या शाळांतून फक्त प्राथमिक शिक्षणाचें चार वर्ग आहेत त्यांना कनिष्ट बुनियादी शाळा व ज्या शाळांना प्राथमिक व इंडियन मिडल् स्कूलचें आणखी तीन असें सात वर्ग आहेत त्यांना उच्च बुनियादी शाळा समजलें जातें.

## इंडियन मिडल् स्कूल्स्


इंडियन मिडल् स्कूल्स् मधून इंग्रजी ऐच्छिक असलें तरी सध्यां सर्व विद्यार्थी तो विषय घेतातच अशा शाळांची संख्या आता वाढत नाहीं.

## इंडियन इंग्लिश मिडल् स्कूल्स् (पूर्व प्राथमिक शाळा)

प्राथमिक चार वर्गाचें शिक्षण संपल्यावर पुढल्या चार वर्गाचें शिक्षण या शाळांतून होतें. यांत इंग्रजी हा विषय आवश्यक असतो म्हणून यांना इंग्लिश मिडल् स्कूल्स् म्हणतात. यांतहि शिक्षणाचें माध्यम मराठी, हिंदी किंवा उर्दू आहे. याच शाळांना पूर्वी ए. व्ही. स्कूल्स् असें म्हणण्यांत येत असें. या शाळांची

# अकोला जिल्हा

## आरोग्य व्यवस्था



संख्या एकूण १७ आहे व विद्यार्थ्यांची संख्या मुलें २,९७८ व मुलीं ३८५ मिळून ३,३६३ आहे. प्रशिक्षित शिक्षक व शिक्षिका ६३ व अप्रशिक्षित शिक्षक व शिक्षिका ७९ मिळून एकूण १४२ आहेत. ज्या पूर्व प्राथमिक शाळा माध्यमिक शाळांना (हायस्कूल्सना) जोडून आहेत अशांची संख्या वरील १७ मध्यें नाहीं. त्यांचा समावेश माध्यमिक शाळेंत केला आहे.

## माध्यमिक शाळा (हाय स्कूल्स्)

माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम पूर्व माध्यमिक शाळानंतर तीन वर्षाचा असे तो आतां दोन वर्षाचा करण्यांत आला आहे. म्हणजे विद्यार्थी पहिल्या वर्गापासून १० वर्षात मॅट्रिक होऊं शकतो. माध्यमिक शाळांची जिल्ह्यांतील संख्या मुलांच्या ३९ व मुलींच्या ५ मिळून ४४ आहे. ३९ पैकीं फक्त चार शाळा सरकारी असून बाकीच्या खाजगी शिक्षण संस्थांच्या आहेत. एकंदर विद्यार्थी १७,९१३ असून त्यापैकीं १५,५८३ मुलें व २,३३० मुलीं आहेत. शिक्षणाचें माध्यम मराठी, हिंदी किंवा उर्दू आहे.

पूर्वमाध्यमिक व माध्यमिक मिळून ६१ शाळांपैकीं फक्त १७ शाळा खेडेविभागांत व ४४ शहर-विभागांत आहेत. खेड्यांत शाळा काढण्याची लोकांची इच्छा आहे पण जागेच्या व शिक्षकांच्या अभावीं तें शक्य होत नाहीं. विद्यार्थ्यांना राहण्याकरितां वसतिगृहांचीदेखील सोय असणें जरूर आहे.

## उच्च माध्यमिक शाळा

ज्या माध्यमिक शाळांतून तीन वर्षाचा मॅट्रिकचा अभ्यासक्रम असून तो उच्च दर्जाचा आहे अशांना उच्च माध्यमिक शाळा म्हणतात. आकोला व वाशिम येथील सरकारी माध्यमिक मुलांच्या शाळा ह्या अशापैकीं असून इतर माध्यमिक शाळादेखील आपलें रुपांतर उच्च माध्यमिक म्हणून करून घेण्याच्या प्रयत्नांत आहेत. या शाळांतून मॅट्रिक पास होणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयाचें शिक्षणघेण्यापूर्वी प्री-युनिव्हर्सिटी वर्गात बसावें लागत नाहीं. साध्या माध्यमिक शाळांतून पास होणाऱ्या विद्यार्थ्यास बसावें लागतें.

## टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, आकोला

टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर ही संस्था १९२० सालीं राष्ट्रीय शिक्षणाकरितां निघाली व स्वातंत्र्य मिळेपर्यंत ती राष्ट्रीय चळवळीचें केंद्र समजली जात असे. स्वराज्य मिळाल्यानंतर तिला खास संस्था म्हणून मान्यता देण्यांत आली व तेथील विद्यार्थी मॅट्रिकच्या परीक्षेस बसूं लागले. या शाळेंत इंग्रजी पहिली पासून मॅट्रिकपर्यंतचे सहा वर्ग असून शिक्षणाकरितां मुळींच फी घेण्यांत येत नाहीं. फक्त गरीब विद्यार्थ्यांनांच प्रवेश देण्यांत येतो. संस्थेचा खर्च संस्थेच्या मालकीची शेती, सरकारी अनुदान, लोकांकडून मिळालेल्या देणग्या व खादी भांडार, सरंजाम कार्यालय, तेलघाणी, चर्मालय वगैरे शाळेतर्फे सुरूं असलेल्या धंद्याचे उत्पन्नावर चालतो. शिक्षक फक्त ठराविक वेतनमान घेतात. संस्थेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी तेथेंच राहिले पाहिजे असा नियम आहे.

संस्थेला स्वतःची अशी इमारत आहे. संस्थेंत लोहारकाम, सुतारकाम व विणकामाची सोय असून दोन वर्षापूर्वीपर्यंत शाळेतील विद्यार्थीच शालेय शिक्षण सांभाळून या धंद्यांचें शिक्षण घेत असत. सध्यां धंदे शिक्षणाची शाखा अलग करण्यांत आली असून एकच विद्यार्थी दोनही शिक्षणक्रम घेऊं शकत नाहीं. धंदे शिक्षणातील विद्यार्थ्याचा पूर्ण खर्च सरकार देतें व त्यांना पूर्ण वेळ धंदे शिक्षणच घेतलें पाहिजे असा नियम आहे. या सर्व कारणांमुळेंच शाळेला खास शाळा असें मानण्यांत येतें. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या २६५ आहे.

जिल्ह्यांत शिक्षणाची वाढ किती झपाट्यानें होत आहे याची कल्पना खालील तक्त्यावरून येईल :—

| वर्ष | प्राथमिक शाळा | इंडियन मिडल् स्कूल्स | इंडियन इंग्लिश मिडल स्कूल्स | हायस्कूल्स |
| --- | --- | --- | --- | --- |
| | १ ते ४ वर्ग | १ ते ७ वर्ग | ५ वा ते ८ वा वर्ग | पांचवीपासून मॅट्रिक-पर्यंत |
| | | **शाळांची संख्या** | | |
| १९५०-५१ ... | ६१३ | ७५ | १२ | २१ |
| १९५५-५६ ... | ७९० | ११५ | १४ | २८ |
| १९५९-६० ... | ९१५ | १९८ | १६ | ३४ |
| मुलींच्या शाळा | ०४९ | ००३ | ०४ | ०५ |
| | | **विद्यार्थ्यांची संख्या** | | |
| १९५१-५२— | | | | |
| मुलें ... | २८,७८६ | १०,८७९ | १,९६५ | ६,२२३ |
| मुलीं ... | ८,७१९ | २,५१४ | १५० | ६८३ |
| एकूण ... | ३७,५०५ | १३,३९३ | २,११५ | ६,९०६ |
| १९५५-५६— | | | | |
| मुलें ... | ४०,३६० | १९,११७ | १,९७७ | १०,५७५ |
| मुलीं ... | १२,५५६ | ५,०८२ | १७६ | १,३५८ |
| एकूण .. | ५२,९१६ | २४,१९९ | २,१५३ | ११,९३३ |
| १९५९-६०— | | | | |
| मुलें ... | ७०,१२५ | २८,९११ | २,८१० | १४,१०८ |
| मुलीं ... | १८,२०१ | ९,७३१ | ४०४ | १,८८९ |
| एकूण | ८८,३२६ | ३८,६४२ | ३,२१४ | १५,९९७ |
| मुलींच्या शाळेतील मुलीं. | ८,१८० | १,२४३ | ६११ | १,८८७ |
| एकूण ... | ९६,५०६ | ३९,८८५ | ३,८२५ | १७,८८४ |

प्रायमरी शिक्षणाचा भार नगरपालिका व जनपद सभा आणि माध्यमिक शिक्षणाचा भार खाजगीं संस्था किती प्रमाणांत उचलतात व कोणी किती खर्च १९५९-६० सालीं केला तें खालील तक्त्यावरून दिसेल :—

| संख्या | | शाळांची संख्या | मुलें | मुलीं | एकूण | शेंकडा प्रमाण | खर्च रुपयांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१९५९-६०** | | | | | | | |
| **हायस्कूलस् (माध्यमिक शाळा).** | | | | | | | |
| सरकारी ... | मुलांच्या. | ४ | १,६९६ | १९५ | १,८९१ | १४.०२ | ४,९५,५७४ |
| | मुलींच्या. | १ | ... | ६०२ | ६०२ | | |
| जनपद ... | मुलांच्या. | ३ | ४६३ | ११६ | ५७९ | ३.२६ | ५०,८५१ |
| | मुलींच्या. | ० | ... | ... | ... | | |
| नगरपालिका | मुलांच्या | २ | १,२८३ | ५५ | १,३३८ | ७.५२ | ९९,५३४ |
| | मुलींच्या. | ० | ... | ... | ... | | |
| खाजगी ... | मुलांच्या. | २५ | १०,६६६ | १,५२३ | १२,१८९ | ७५.२० | १२,४२,८३१ |
| | मुलींच्या. | ४ | ... | १,१८७ | १,१८७ | | |
| एकूण ... | | ३९ | १४,१०८ | ३,६७८ | १७,७८६ | १०० | |
| **इंडियन इंग्लिश मिडल् स्कुलस्.** | | | | | | | |
| सरकारी ... | मुलांच्या. | ५ | १,५३३ | १८६ | १,७१९ | ४४.९५ | १,२८,७५५ |
| | मुलींच्या. | ... | ... | ... | ... | | |
| जनपद ... | मुलांच्या. | ३ | २७५ | ३८ | ३१३ | ८.१८ | २५,९६८ |
| | मुलींच्या. | ... | ... | ... | ... | | |
| नगरपालिका. | मलांच्या. | १ | ७१ | १५ | ८६ | १४.२५ | ३८,९५६ |
| | मुलोंच्या. | २ | .. | ४५९ | ४५९ | | |
| खाजगी ... | मुलांच्या. | ७ | ९३१ | १६५ | १,०९६ | ३२.६२ | ८९,०९५ |
| | मुलींच्या. | २ | ... | १५२ | १५२ | | |
| एकूण ... | | २० | २,८१० | १,०१५ | ३,८२५ | १००.०० | |

| संख्या | | शाळांची संख्या | मुलें | मुलीं | एकूण | शेंकडा प्रमाण | खर्च रुपयांत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **प्रायमरी शाळा** | | | |
| सरकारी ... | मुलांच्या. | ७ | १,६३० | ४७६ | २,१०६ | ७.५५ | ३७,२०,४०५ |
| | मुलींच्या. | ३४ | ... | ६,२२४ | ६,२२४ | | |
| जनपद ... | मुलांच्या. | १,०३९ | ५७,६३० | २४,१४६ | ८१,७७६ | ७४.६५ | ८,११,८९२ |
| | मुलींच्या. | ६ | ... | ६१६ | ६१६ | | |
| नगरपालिका. | मुलांच्या. | ५९ | १३,१९९ | ३,०६७ | १६,२६६ | १६.९८ | ३,४८,९९७ |
| | मुलींच्या. | ११ | ... | २,४६६ | २,४६६ | | |
| खाजगी ... | मुलांच्या. | ८ | ५५७ | २४३ | ८०० | ०.८२ | ३,६२,०२२ |
| | मुलींच्या. | १ | ... | ११७ | ११७ | | |
| एकूण ... | | १,१६५ | ७३,०१६ | ३७,३५५ | १,१०,३७१ | १०० | |

## प्रशिक्षणाच्या सोयी

प्रायमरी शाळांतीलशि क्षकांच्या प्रशिक्षणाकरितां १ उर्दू व २ मराठी बेसिक ट्रेनिंग कॉलेजेस आहेत, याशिवाय जे शिक्षक प्रशिक्षित आहेत पण बुनियादी पद्धतींत प्रशिक्षित नाहींत अशांना बेसिक पद्धतींत आणण्याकरितां वाशिम येथें एक प्रशिक्षण केंद्र आहे. या केंद्रांत व उर्दू बेसिक ट्रेनिंग कॉलेजांत विदर्भांतील आठही जिल्ह्यांतील शिक्षकांना प्रवेश देण्यांत येतो. स्त्री शिक्षिकांकरितां एक प्रशिक्षण केंद्र नुकतेंच या वर्षी आकोला येथें सुरू झालें आहे. इंडियन इंग्लिश मिडल् स्कूल मधील शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम या जिल्ह्यांत नाहीं. पदवीधर शिक्षकांच्या प्रशिक्षणाकरितां आकोला येथें एक बी. टी. कॉलेज आहे.

## तांत्रिक शिक्षणाच्या सोयी

आकोला येथें एक व्होकेशनल हायस्कूल असून तेथें सुतार काम, लोहारकाम, इत्यादि व्यवसाय शिकविण्यांत येतात. दोन वर्षांपासून इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टीट्यूशन नांवाची संस्था निघाली असून तेथे ड्राफ्ट्समन (सिव्हिल) फिटर, ईलेक्ट्रिशिअन व मेकॅनिकल अशा चार प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी आहेत. मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश असून प्रशिक्षण कालांत २० रुपये स्टायपेंड मिळतो. टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरांतील पूर्वीची धंदे शिक्षणाची शाखा स्वतंत्र करण्यांत आली असून तेथेंहि धंदे शिक्षणाची पूर्ण सोय आहे. आकोला येथील शिवाजी हायस्कूलमध्येंदेखील धंदे शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे.

## सक्तिचें शिक्षण

चार शहरांत व ३४ खेड्यांत मिळून ३८ गांवीं प्राथमिक शिक्षण मुलांकरितां सक्तीचें करण्यांत आलें असून चार शहरांतील मुलांची शाळातील संख्या १९५९-६० सालीं ४,७५५ व खेड्यांतील शाळातील विद्यार्थ्यांची संख्या ४,७३२ होती.

## शिष्यवृत्त्या

उत्तेजनाकरितां व मदत म्हणून हायस्कूलमधून हुषार पण गरीब विद्यार्थ्यांना दरडोई २० रुपयेप्रमाणें १० व इंडियन इंग्लिश मिडल्स्कूल मधून दरडोई १२ प्रमाणें ३३ व मागासलेल्या वर्गांकरितां इंडियन मिडल् स्कूल्स् मधून दरडोई १२ प्रमाणें १० स्टायपेंडस् देण्यांत येतात. याशिवाय हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून खेडे विभागांतील सर्वांत हुशार अशा पहिल्या तीन विद्यार्थ्यांना पूर्व माध्यमिक शाळेंत १५ रुपये माध्यमिक शाळेंत २५ रुपये व कॉलेजांत ५० रुपयेप्रमाणें शिष्यवृत्त्या गेल्या वर्षांपासून देण्यांत येवूं लागल्या आहेत.

## शारीरिक शिक्षण

शाळांतून खेळांच्या सोयी करण्यांत येतात व दरवर्षी प्राथमिक शाळा, पूर्वप्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांचे व शाळेंत न जाणाऱ्या तरूणांच्या सांघिक व वैयत्तिक खेळांत स्पर्धा भरवण्यांत येतात.

## महाविद्यालयें

संपूर्ण जिल्ह्यांत आर्टस् कॉलेजेस ३, कॉमर्स १, सायन्स १, लॉ १, कृषि १, व बी. टी. १ अशी आठ महाविद्यालये आहेत. पैकीं कृषि व बी. टी. महाविद्यालय सोडून इतर सर्व खाजगी शिक्षण संस्थांनी चालविली आहेत. वाशिम व आकोट येथील आर्टस् कॉलेजे सोडून इतर सर्व आकोल्यांत आहेत. आकोट येथील महाविद्यालय याच वर्षी सुरू झालें असून तेथें सध्या फक्त प्री-युनिव्हर्सिटी वर्ग आहेत. इतर महाविद्यालयांतून पदवी परीक्षेच्या तीन वर्षाचा पूर्ण अभ्यासक्रम सुरू आहे. पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम घेण्यापूर्वी मॅट्रिक झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांस (उच्च माध्यमिक शाळांतून पास झालेले सोडून) प्री-युनिव्हर्सिटी क्लासेसची परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेचा १ वर्षांचा अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महाविद्यालयांत आहे. आर्टस्, सायन्स, कॉमर्स, लॉ व कृषि महाविलयातील विद्यार्थ्यांची संख्या १,७०० आहे.

याशिवाय होमिओपॅथी व बायोकेमिस्ट्रीची दोन महाविद्यालये व आयुर्वेदाचें एक महाविद्यालयहि आकोला येथें आहे.

## शिक्षणाच्या सवलती

खाली दिलेल्या शिक्षण विषयक सवलती जिल्ह्यांत उपलब्ध आहेत :—

(१) ६ ते १४ वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षण मोफत.
(२) शेत विरहीत शेत मजूरांच्या मुलांमुलींस पूर्ण फी माफ.
(३) वीस एकरापेक्षां कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे मुलांमुलींस पूर्ण फी माफ.
(४) इंडियन टेरिटोरिअल आर्मीतील ग्रहस्थांचें मुलांमुलींस पूर्ण फी माफ.
(५) काम करीत असतांना मृत्यू पावलेल्या शिपायांचे मुलांमुलींस पूर्ण फी माफ.
(६) राजकीय चळवळीतील कार्यकर्त्यांचे मुलांमुलीस पूर्ण फी माफ.
(७) वार्षिक १,२०० रुपयांपेक्षां कमी उत्पन्न असणारांचे मुलांमुलींस पूर्ण फी माफ.
(८) दोनशे रुपयांपेक्षां कमी पगार असलेले सरकारी नोकर, स्थानिक संस्थांतील कर्मचारी व सरकार मान्य शाळांतील शिक्षक यांचे मुलांमुलींस फी मध्यें सवलत.
(९) अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांस कोणत्याही तऱ्हेच्या शिक्षणाकरितां फी पडत नाहीं. परीक्षेच्या फीची माफी मिळते व शिवाय शिक्षणाकरितां शिष्यवृत्ती मिळते.

वरील सवलतीमुळें हरिजन व अनुसूचित जमाती यांची विद्यार्थ्यांच्या संख्येंत झालेली वाढ खालील तक्त्यांवरून दिसून येईल :—

| वर्ष | | अनुसूचित जाती | | एकूण | अनुसूचित जमाती | | एकूण | निर्वासित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुलें | मुलीं | | मुलें | मुलीं | | |
| १९५७-५८ | हायस्कूल .. | १,११९ | ८३ | १,२०२ | ७२ | ७ | ७९ | ११८ |
| | ए. व्ही. स्कूल . | २३२ | २६ | २५८ | १३ | ... | १३ | ३० |
| | एकूण ... | १,३५१ | १०९ | १,४६० | ८५ | ७ | ९२ | १४८ |

| वर्ष | | अनुसूचित जाती | | एकूण | अनुसूचित जमाती | | एकूण | निर्वासित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुलें | मुली | | मुलें | मुली | | |
| १९५८-५९ | हायस्कूल ... | १,१४६ | ४१ | १,१८७ | १०५ | ७ | ११२ | ७९ |
| | ए. व्ही. स्कूल्स. | २७१ | २७ | २९८ | २६ | ... | २६ | ५२ |
| | एकूण ... | १,४१७ | ६८ | १,४८५ | १३१ | ७ | १३८ | १३१ |
| १९५९-६० | हायस्कूल ... | १,६७४ | १७६ | १,८५० | ९७ | २४ | १२१ | ... |
| | ए. व्ही. स्कूल्स. | ३२० | २३ | ३४३ | २४ | ७ | ३१ | ... |
| | एकूण ... | १,९९४ | १९९ | २ १९३ | १२१ | ३१ | १५२ | ... |

## प्रौढ शिक्षण

प्रौढांना साक्षर करण्याकरितां खेडयापाडयांतून प्रौढांचे वर्ग रात्रीच्या वेळीं भरविलें जातात. स्थानिक शिक्षकच बहुतेक असें वर्ग चालवतात व त्यांना प्रत्येक महिन्यास १० रुपये देण्यांत येतात. वर्गांकरितां लागणारा खर्च संवर्ग विकास खंड व शिक्षा विभाग यांचेकडून केला जातो. या वर्गांतून लिहणें-वाचणें शिकून तयार झालेल्या इसमास संवय रहावी म्हणून खेडयाखेडयांतून पुस्तकें वाचावयास देण्याची सोय जिल्हा ग्रंथपालाकडून केली जाते. जिल्हा ग्रंथालयाची २८५ केंद्रें १९५९-६० अखेरपर्यंत जिल्हयांत होती. याशिवाय १५० खेडयांतून वाचनालयें आहेत त्यांनाही जिल्हा ग्रंथालयाकडून वाचण्याकरितां पुस्तकें पुरवली जातात.

या वर्षी शिवजयंतीच्या महुर्तावर जिल्यांत २७ गांवीं ग्राम शिक्षण मोहीम सुरुं करण्यांत आली असून पुरुषांचे १०३ व स्त्रियांचे १४० वर्ग सुरुं आहेत व त्यांत १,३७८ पुरुष व २,१५४ स्त्रिया शिक्षण घेत आहेत. एकूण २४३ लोक शिकवण्याचे काम करीत आहेत. सर्व कामें निर्वेतन व स्थानिक इसमांकडूनच होत आहेत. आपलें गांव संपूर्ण साक्षर करण्याची जबाबदारी आपलीच जाणून त्या कामास लागलेल्या लोकांचा हा प्रयोग आहे.

# समाज कल्याण योजना

मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीकरितां समाज सेवा विभागातर्फे कांहीं योजना जिल्ह्यांत कार्यान्वित केल्या जातात. १९६०-६१ सालीं ज्या योजना सुरू आहेत त्यांची माहिती खालीं दिली आहे. योजनांचे प्रकार पांच आहेत :—

(अ) आदिवांसी कल्याण योजना.

(ब) हरिजन कल्याण योजना.

(क) आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गासंबंधीं योजना.

(ड) केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना.

(इ) इतर कल्याणकारी योजना.

**आदिवासी कल्याण योजना.**—या योजना आठ असून त्यापैकीं प्रमुख योजना खाली दिल्या आहेत.

**शैक्षणिक सवलती.**—आदिवासींच्या मुलांना महाविद्यालयीन धरून सगळें शिक्षण विना शुल्क देण्यांत येतें व त्यांच्या शुल्काइतकी रकम त्या शाळेला सरकार कडून मिळते. शिवाय हुषार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. १९५९-६० सालांत या योजनेखालीं २६ विद्यार्थ्यांना ४८० रुपये फी म्हणून व ५८० विद्यार्थ्यांना ४,७६१ रुपये शिष्यवृत्ती म्हणून व ४० रुपये परीक्षेची फी म्हणून देण्यांत आले.

**धंदे चालविण्याकरितां मदत.**—कोंबड्या व बकऱ्या पाळणाऱ्यांना कोंबड्या व बकऱ्या, शेतकऱ्यांना शेतीकरितां बैल, बी बियाणें व शेतीची अवजारें पुरविली जातात. दुधाचा धंदा करणाऱ्यांना दुभती जनावरें घेण्यास कर्ज व अनुदान दिलें जाते, घरगुती धंदा करणारांना धंद्याकरितां व आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां ५०० रुपये पर्यंत मदत दिली जाते.

**घर दुरुस्तीसाठीं मदत.**—घर दुरुस्तीसाठीं आवश्यक सामानाचा पुरवठा केला जातो.

## हरिजन कल्याण योजना

**शैक्षणिक सवलती.**—हरिजन विद्यार्थ्यांना विना फी पूर्ण शिक्षण मिळते व त्यांचे फी इतकी रकम त्याचे शाळेस किंवा कॉलेजास सरकारकडून दिली जाते. शिवाय हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. वसतिगृह चालविणाऱ्या रजिस्टर्ड किंवा समाज सेवा विभागानें मान्यता दिलेल्या खाजगी संस्थेस प्रत्येक हरिजन विद्यार्थ्यामागें दरमहा २० रुपये, विद्यार्थीनीमागें दरमहा २५ रुपये मदत देण्यांत येते. विद्यार्थ्याच्या पालकाचें उत्पन्न मात्र वार्षिक १,८०० रुपयांपेक्षां कमी असावयास पाहिजे. खास हरिजनांकरितां वसतिगृह असेल व त्यांत सवर्ण हिंदूंना प्रवेश दिला असेल तर अशा प्रत्येक विद्यार्थ्यामागें २० रुपये देण्यांत येतात. जिल्ह्यांतील ९ वसतिगृहांना या योजनेखालीं मदत मिळतें. कॉस्मॉपॉलिटन छात्रालयांतून हरिजन व आदिवासींच्या मुलांना राहण्याचा व जेवण्याचा जो मासिक खर्च येतो तो मिळतो. अशी दोन वसतिगृहें आकोला जिल्ह्यांत आहेत. वाशिम तालुक्यांत मालेगांव येथें एक बालवाडी चालविण्यांत येते व आकोला येथें एक संस्कार केंद्र चालविण्यांत येतें. बालवाडीचा सर्व खर्च सरकार देते व संस्कार केंद्रास मदत देतें.

**धंद्यासाठीं सवलती.**—हरिजनांना आपले धंदे चालविण्यासाठीं ७५ टक्के विनाव्याजी कर्ज व २५ टक्के अनुदान देण्यांत येतें. वाजंत्र्यांना साहित्याची खरेदी करण्यास मदत मिळतें. दुधाचा धंदा करणारांना दुभती जनावरें विकत घेण्यास ३०० रुपये पर्यंत कर्ज मिळतें.

**घरें बांधण्यासाठीं व दुरुस्तीसाठीं.**—खेडे विभागांतील हरिजनांना घर बांधण्याकरितां जागा नसल्यास किंवा असलेलें घर अपुरें असल्यामुळें नवीन घर बांधण्यास जागा घेण्याकरितां २०० रुपये पर्यंत मदत देण्यांत येते. दुसऱ्या एका योजनेखालीं घर दुरुस्तीसाठीं सामानाचा पुरवठा करण्यांत येतो व तिसऱ्या एका योजनेप्रमाणें घर बांधण्यास ७५० रुपये पर्यंत मदत मिळते.

**घरभाडें देण्याची योजना.**—ग्रामपंचायत क्षेत्रांत सवर्ण हिंदू घर मालकांनी सवर्ण हिंदू वस्तींतील घरांत हरिजनांना राहूं दिल्यास घरमालकास घर भाड्याच्या ५० टक्के रक्कम शासनाकडून जास्तीची मिळू शकते.

हरिजन कल्याण योजनाखालीं १९६०-६१ सालीं खालील मदत देण्यांत आली :—

| योजना (१) | मदत (आंकडे रुपयांत) (२) |
|---|---|
| (१) हरिजन विद्यार्थ्यांना फी ३,५६४ विद्यार्थ्यांना मिळून ... ... | ९४,४१६.०० |
| (२) शिष्यवृत्ती ४४८ विद्यार्थ्यांना मिळून ... .. .... ... | १८,१८०.०० |
| (३) परीक्षेची फी ९९ विद्यार्थ्यांना मिळून (१९५९-६०) ... ... | १,९४९.०० |
| (४) हरिजन वसतिगृहांना अनुदान ९ वसतिगृहें मिळून ... ... ... | २१,२७५.०० |
| (५) कॉस्मापॉलिटन वसतिगृहांना अनुदान ९ वसतिगृहांना मिळून ... | १६,२२२.०० |
| (६) वालवाडीकरितां खर्च ... ... ... ... ... | २,७२०.०० |
| (७) संस्कार केंद्र, आकोला ... ... ... ... ... | १,०८२.०० |
| (८) घरगुती उद्योग धंद्यांना आर्थिक मदत व कर्ज ३८ इसमांना मिळून ... | ६,५००.०० |
| (९) दुभती जनावरें धंद्याकरितां घेण्यास कर्ज व मदत ८ इसमांना मिळून ... | १,५००.०० |
| (१०) घरासाठीं जागा घेवून देणें १६ इसमांना मिळून ... ... ... | ३,२००.०० |
| (११) घर दुरुस्तीसाठीं मदत ३५ लोकांना मिळून ... ... ... | ४,७००.०० |
| (१२) सवर्ण हिंदूंना घर भाड्याबद्दल ४ इसमांना मिळून ... ... ... | ५००.०० |
| (१३) हरिजन व सवर्ण हिंदू यांच्या मिश्रविवाहाचा सत्कार ... ... | ५००.०० |
| (१४) अनुसूचित जमातींच्या कॉलनी करितां २५ इसमांना ... ... | १८,८००.०० |
| (१५) सहा नगरपालिका व दोन ग्रामपंचायतींना भंग्यांकरिता हातगाड्या विकतघेण्यास मदत. | २६,५००.०० |
| (१६) दोन सार्वजनिक संस्थांना हरिजन कार्याकरितां मदत ... .. | १८,२९९.०० |
| (१७) कोर्ट कामांत मदत १ इसमास ... ... | ५०.०० |


## आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासंबंधीच्या योजना

ज्यांच्या पालकांचें उत्पन्न वार्षिक १,२०० रुपयांपेक्षां कमी आहे अशा कोणत्याहि जातीच्या विद्यार्थ्यास आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाचा समजण्यांत येतें व त्याची फी सरकार भरते. या योजनेखालीं ८,६७० विद्यार्थ्यांना २,९५,२०७ रुपयांची मदत १९६०-६१ सालांत देण्यांत आली.

## केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना

**घर बांधण्यासाठीं मदत.**—जो हरिजन घर बांधण्यासाठीं स्वत: रोख रकम, किंवा सामान किंवा श्रमदानाच्या स्वरूपात २५० रुपये खर्च करावयास तयार असेल अशास सरकार ७५० रुपये मदत देतें. घर ठराविक नमुन्यानुसार बांधावें लागतें. यासाठीं १९६०-६१ सालीं ४४ इसमांना ३३,००० रुपये देण्यांत आले.

**हरिजनांना पिण्याची सोय.**—पिण्याच्या पाण्यासाठीं सार्वजनिक विहीर बांधण्यास २,००० रुपये पर्यंत मदत देण्यांत येते. जास्ती रुपये लागल्यास गांवकऱ्यांनी खर्च करावयाचे असतात. याकरितां १९६०-६१ सालांत नऊ विहिरींना मिळून १७,५०० रुपये देण्यांत आले.



अकोला जिल्हा
शिक्षण व्यवस्था
मल्टीपर्पज हायस्कूल
हायर सेकंडरी स्कूल
लोअर सेकंडरी स्कूल
मुलींची स्वतंत्र माध्यमिक शाळा
अकोली जहागीर
हिवरखेड
अडगाव
अकोट
तेल्हारा
मुंडगाव
दहिहांडा
गांधीग्राम
उरळ
मुर्तिजापूर
माना
अकोला
बाळापूर
कान्हेरी
वाडेगाव
पातूर
कारंजा
वनोजा
मंगरूळ
मेडशी
मालेगाव
शिरपूर
वाशिम
अनसिंग
रिसोड
इंडियन इंग्लिश मिडल स्कूल्स
शासकीय उच्च बुनियादी शाळा
इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीट्यूट
व्यवसायिक माध्यमिक शाळा
तांत्रिक शिक्षणाच्या सोयी असलेल्या शाळा
बालसुधार गृह
बेसिक ट्रेनिंग कॉलेज
बेसिक ट्रेनिंग सेंटर
बी.टी. कॉलेज
महाविद्यालयें
मुक बधिर विद्यालय
टीप- खूणेसमोरील आंकडे संस्थांची संख्या दाखवितात

## इतर कल्याणकारी योजना

**समाज कल्याण कार्य करणाऱ्या संस्था.**—यापैकी ज्या संस्था रजिस्टर्ड आहेत अशांना समाज सेवा विभागातर्फे मान्यता देवून दरवर्षी आवर्ती व अनावर्ती अनुदान देण्यांत येतें. याकरितां ठराविक नमुन्याबर कागदपत्रासह समाज सेवा अधिकारी, आकोला, यांचेकडे एप्रिल महिन्यांत अर्ज करावे लागतात. या योजनेनुसार सात संस्थांना १९५९-६० सालीं ५,५५० रुपये देण्यांत आले.

**शारीरिक कल्याण.**—शहर व खेडे विभागांत शाळा व कॉलेजबाहेरील तरुणांत कार्य करणाऱ्या रजिस्टर्ड संस्थांना व्यायाम, खेळ वगैरेचें कार्य करण्याकरितां मदत देण्यांत येतें. गेल्या वर्षी बळेगांव, शिर्ला, उगवा, पोटी व बेंबळा येथील ग्रामपंचायतींना मिळून २,१७५ रुपये नवीन आखाडे काढण्यास देण्यांत आले व इतर १५ ठिकाणच्या आखाड्यांना मिळून ७५० रुपये देण्यांत आले.

**प्रौढांचे सामने.**—हे सामने आयोजित करण्यास जनपदास दरवर्षी २५० रुपये अनुदान देण्यांत येतें.

**कलाकारांना सहाय्य.**—दारिद्र्यग्रत खितपत पडलेल्या नाटककार, कवि, लेखक वगैरे ज्यांनी कला, वाङमय किंवा नाट्यक्षेत्रांत भरीव कार्य केलें अशांना मदत देण्यांत येते. गेल्या वर्षी दोन इसमांना १,२०० रुपये मदत देण्यांत आली.

**गैरसरकारी कलापथकांना मदत.**—स्थायिक व फिरत्या कलापथकांना सामुग्री विकत घेण्यास अनुक्रमें १०० व २०० रुपये अनुदान देण्यांत येतें. मागल्या वर्षी १४ कलापथकांना मिळून २,२०० रुपये अनुदान देण्यांत आलें.

**हरिजनांचा विकास.**—हरिजनांच्या कल्याणाकरितां स्वयंस्फूर्तीनें कार्य करणाऱ्या रजिस्टर्ड संस्थांना त्यांच्या प्रगतीसाठीं अनुदान मिळू शकते.

**कायद्याचा सल्ला व मदत.**—दिवाणी दाव्यांतील वादी किंवा प्रतिवादी हरिजनांना व अस्पृश्यतेच्या कारणाकरितां ज्यांनी इतरांवर फौजदारीं खटले चालू केले अशा हरिजनांना त्यांच्या खटल्यांत वकील ठेवून मिळेल.

दरवर्षी अस्पृश्यता निवारण सप्ताह पाळण्यांत येवून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस बक्षिस देण्यांत येतें. गेल्या वर्षी हें बक्षिस उगवा ग्रामपंचायतीस मिळालें.

**आदिवासींचा विकास.**—आदिवासी लोकांच्या विकासाठीं बहूउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करावयाची योजना असून समाज सेवा विभागातर्फे त्या संस्थेस ५,००० रुपये कर्ज बिनव्याजी मिळेल. संस्थेजवळ कमीत कमी ५०० रुपये भांडवल असावयास हवें व सभासद ७५ टक्के आदिवासी असावे. संस्थेस असाच धंदा करावा लागेल कीं ज्यामुळें आदिवासी लोकांची आर्थिक स्थिति सुधारूं शकेल.

**मूक व बधिर विद्यालय आणि बाल सुधार गृह.**—ह्यांची माहिती पान अठरावर देण्यांत आली आहे.

# सिंचन व विद्युत् प्रकल्प

आजपर्यंत विहिरीच्या पाण्याशिवाय सिंचनाच्या इतर कोणत्याहि सोयी जिल्ह्यांत नाहींत. दुसऱ्या योजनाकालांत कित्येक ठिकाणांची तपासणी करून या दृष्टीनें विचार करण्यास सुरुवात झाली. मोठे, मध्यम व लघु असें सिंचन योजनांचे खर्चाच्या दृष्टीनें तीन विभाग पडतात. आजपर्यंत १ कोटीच्या वरच्या खर्चाच्या योजनांना मोठ्या योजना समजत परंतु तिसऱ्या योजनाकालांत पांच कोटीपेक्षां जास्त खर्चाच्या योजनांनाच मोठ्या योजना समजण्यांत येईल. सध्याच्या दंडकाप्रमाणें काटेपूर्णा नदीवरील धरणाची योजना ही मोठ्या योजनेंत समाविष्ट होते.

### काटेपूर्णा प्रकल्प

आकोला शहरापासून दक्षिणेकडे आकोला-मंगरूळ रस्त्यावर २२ मैलावर वास्तापूर येथें काटेपूर्णा नदीस एक बांध घालण्यांत येवून तेथून उत्तरेकडे १०½ मैल खाली गेल्यावर खांबोरा येथें एक छोटासा बंधारा बाधण्यात येईल व तेथून कालवे काढण्यांत येतील. वास्तापूर येथील धरण पूर्णपणें मातीचें राहणार असून त्याची उंची ९७ फूट, लांबी ६,१३६ फूट व पायाजवळील रूंदी ६३३ फूट व टोकावरील रुंदी २० फूट असेल. धरणाचें जलग्राह क्षेत्र (कॅचमेंट एरिया) १९८.५ चौरस मैल असून होणाऱ्या जलाशयांत ३,०७२ एकर (सुमारे ५ चौरस मैल) जमीनीवर ३,४५० दशलक्ष घनफूट पाणी राहील. व ७४,००० एकराच्या परिसरातील वहितीखाली असलेल्या ४०,००० एकरापैकीं २४,००० एकर जमीनीचें ओलीत होवूं शकेल.

धरणाच्या जागीं पायाच्या खोलीचा अंदाज घेण्याकरितां बोअरिंगचें व कर्मचाऱ्यांना राहण्याकरितां तात्पुरती घरें बांधण्याचें काम चालू आहे. खांबोरा येथें बंधाऱ्याच्या जागीं पोंचण्याकरितां सडक तयार करण्यांत येत असून आकोला-मूर्तिजापूर मार्गावरील वणी फाट्यापासून तीन मैल रस्ता तयार झाला आहे. कालवे खोदण्याच्या जागेची १३ मैलांची पाहणी पूर्ण झाली आहे.

प्रकल्पाचा खर्च सुरुवातीस १८० कोटी आकारण्यांत आला होता परंतु दुरुस्त अंदाजाप्रमाणें तो २,३३,१२,८०० रुपये पर्यंत वाढला असून तेवढी रकम मंजूर करण्यांत आली आहे. या प्रकल्पाचें काम तिसऱ्या योजना कालांत पूर्ण होईल.

### एकबूर्जी तलाव प्रकल्प

दहा लाखाचेवर खर्च येणाऱ्या योजनांचा समावेश मध्यम प्रतीच्या प्रकल्पांत होतो. एकबूर्जी तलाव प्रकल्प ही मध्यम प्रतीची योजना असून वाशिम तालुक्यांत वाशिमपासून सहा मैलावर एकबूर्जी व केकत-उमरा गावाच्यामध्ये दोन टेकड्या जोडून चंद्रभागा नदीचें पाणी अडवून एक तलाव तयार करण्यांत येईल. धरणाची लांबी २,६०० फूट, उंची ७७ फूट व टोकाशी रुंदी १६ फूट असेल. बांध पूर्णपणें मातीचा असून तळ्यांत ४९८.९१ दशलक्ष घनफूट पाणी राहील. यांतून १३ मैल लांबीचा एक व १० मैल लांबीचा दुसरा असें दोन कालवें काढण्यांत येवून शेजारच्या ११ गावांतील ७,५०० एकर जमीनीस पाणी मिळेल. धरणावरती एकूण ४३ लक्ष रुपये खर्च व्हावयाचे असून आतांपर्यंत धरणाच्या खालची पाण्याची झिरप थांबवण्याकरिता चर खोदण्याचें व जलरोधक बांध पट्ट्यांतून झिरपणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठीं उभेआडवे चर खोदून त्यात रेती व खडी भरण्याचें कामावर १,२५,००० रुपये खर्च झाले आहेत. हें काम तिसऱ्या योजनाकालांत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. तळ्याचें जलग्रह क्षेत्र २९ चौरस मैल व जलव्यापक क्षेत्र ५४० एकर असेल.

### मोर्णा व निर्गुणा नदीवरील धरणें

मोर्णा व निर्गुणा नदीवरील धरणांच्या योजनांची तपासणी करण्यांत आलीं असून त्या योजनांना मंजूरी मिळून त्या देखील तिसऱ्या योजनाकालांत हातीं घेतल्या जाण्याची, बरीच शक्यता आहे. दोनहि धरणाच्या जागा बाळापूर तालुक्यांत असून त्यांच्या खर्चाचा अंदाज अनुक्रमें १,०९,००,००० रुपये व ७४,००० रुपये असून ओलीताचा अंदाज ८ २०० व ८,००० एकरांचा आहे.

## ऋषि तलाव, कारंजा

हा तलाव पूर्वीचाच असून तो वाढविण्याचें व दुरुस्त करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. पूर्ण करण्यास ७५,००० रुपये खर्च होतील व ४२५ एकर जमिन ओलीत होवूं शकेल.

## लघुसिंचन योजना

वरील शिवाय मौजाबंदी (ता. वाशिम), पिंपरी खुर्द (ता. मंगरूळ), सायखेड (ता. मंगरूळ), बोरवाडी (ता. मंगरूळ) येथें तळीं निर्माण करण्याच्या योजनांची प्राथमिक तपासणी झाली असून खर्चाचे अंदाज तयार करण्यांत आले आहेत व शक्यतेच्या कोटीत ठरल्यास त्या तिसऱ्या योजनाकालांत हातीं घेण्यांत येतील. खालीं दिलेल्या योजना प्राथमिक तपासणीकरितां सिंचन विभागाकडे आहेत :—

(१) अडाण नदीच्या उपनदीवर अंजनी येथें तलाव करण्याची योजना, तालुका मंगरूळ.
(२) गिरोली येथें गोरकी नाल्यावर बांध घालून तलाव करण्याची योजना, तालुका मंगरूळ.
(३) विश्वामित्र नाला अडवून पांगरी येथें तलाव करण्याची योजना, तालुका बाळापूर.
(४) गोरकी नाल्यावरील चिंचखेड येथील तलाव, तालुका मंगरूळ.
(५) अमदारी (ता. मंगरूळ) येथील तलाव.
(६) फुलउमरी (ता. मंगरूळ) येथील तलाव.
(७) वडकुंभ (ता. मंगरूळ) येथील तलाव.
(८) मोहरी येथें अडाण नदीच्या उपनदीवर बांध घालून तलाव योजना , तालुका मंगरूळ.
(९) सोनाल येथें अडाण नदीच्या उपनदीवर बांध घालून तलाव योजना, तालुका मंगरूळ.
(१०) अंबापूर तालुका मंगरूळ येथील भामरूण नाल्यावरील बांध, तालुका मंगरूळ.
(११) पोहऱ्याजवळ गोंडेगांव येथील तलाव योजना.
(१२) आकोट तालुक्यांत मार्डी येथें तलाव करण्याची योजना.

वरीलपैकीं चार योजनांची प्राथमिक तपासणी सुरूं झाली असून इतर योजनांची तपासणी क्रमाक्रमानें घेण्यांत येईल.

वरील खेरीज छोटचा बंधाऱ्याकरितां २७ योजना व पूरापासून संरक्षण करण्याकरितां ९ योजना अशा ३६ योजना सिंचन विभागांकडे विचाराकरितां पाठविण्यांत आल्या आहेत.

## पारस विद्युत् प्रकल्प

आकोल्यापासून १८ मैलावर बाळापूर तालुक्यांतील पारस या ठिकाणीं हा प्रकल्प सुरूं असून या ठिकाणीं ३०,००० किलोवॅट वीज सुरुवातीस निर्माण करण्यांत येईल व ताबडतोब तिची वाढ ६०,००० किलोवॅटस् पर्यंत करण्यांत येईल. तिसऱ्या योजनाकालांत या केंद्रांतून ९०,००० किलोवॅट वीज निर्माण होवूं शकेल इतकी वाढ होईल. १,२०,००० किलोवॅट वीज निर्माण करावयास लागणाऱ्या सर्व सोयींची तरतूद आजच येथें करण्यांत आली आहे.

पारस हें महाराष्ट्रांतील तिसरे थर्मल पॉवर स्टेशन आहे. येथें लागणाऱ्या पाण्याच्या सोयी-करितां जवळच मन नदीवर एक छोटासा ५०० फूट लांबीचा व ७४ फूट उंचीचा बांध घातला असून तेथून विद्युत्गृहास दररोज २½ दशलक्ष गॅलन पाणी मिळूं शकेल. आकोला जिल्ह्यांतील हा मोठा व प्रेक्षणीय प्रकल्प असून त्यास तीन कोटी रुपये खर्च येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर खापरखेडा, बल्लारशा ग्रीड सिस्टीमशी तो जोडला जाईल. येथून निर्माण होणारी वीज विदर्भाची तूट भरून काढून मराठवाडा व खानदेशाचा कांहीं भाग यासहि पुरवठा करूं शकेल. या प्रकल्पातून वीज देण्यास मार्च ३१, १९६१ रोजीं सुरुवात झाली आहे.

# सामूहिक विकास कार्य

आकोला जिल्ह्यांत विकास खंडांचे कार्य १९५३ च्या ऑक्टोबरपासून सुरूं झाले. सध्यां जिल्ह्यांत एकूण १३ विकास खंड असून संपूर्ण जिल्हा विकास खंडांच्या क्षेत्रांत आलेला आहे. १३ पैकीं आकोट, आकोला, बाळापूर, मूर्तिजापूर, मंगरूळ व रिसोड हें सहा खंड दुसऱ्या अवस्थेंत, तेल्हारा, मानोरा, कारंजा, पातर, वाशिम व बार्शीटाकळी (ता. आकोला) पहिल्या अवस्थेंत व मालेगांव (ता. वाशिम) पूर्वा-

ग्रामीण जनतेत विकासानुकूल मनोवृत्ती निर्माण करून व त्यांना स्वावलंबी बनवून, शासनाच्या निरनिराळ्या विभागाच्या योजना खेड्यापाड्यांतून कार्यान्वित करण्याचें महत्वाचें कार्य विकास गटांनीं केलेलें आहे. खर्च झालेली रकम आणि झालेलें कार्य या दृष्टीनें सर्व खंड नेहमींच अ वर्गांत राहिले आहेत. १९५६ सालीं ज्या विकास खंडांचें रूपांतर सामूहिक विकास खंडांत (सी. डी.) झालें त्यांत मंगरूळपीर विकास खंड द्विभाषिक मुंबई राज्यांत पहिला ठरला होता. तसेंच १९५७ सालीं जे विकास खंड प्रथमावस्थेंत गेले त्यांत पातूर व कारंजा हे खंड नागपूर विभागांत अनुक्रमें पहिले व दुसरे आणि सबंध मुंबई राज्यांत अनुक्रमे तिसरे व चवथे ठरले. ३० जून १९६० रोजीं संपलेल्या तिमाहींत झालेल्या मूल्यमापनानुसार प्रथमावस्था विकास खंडांतून १०५.६ टक्के रक्कम खर्च झाली आणि खर्चाचें हें प्रमाण विदर्भ विभागांत सर्वत उत्कृष्ट गणले गेले. प्रथमावस्था विकास खंडांपैकीं पातूर, कारंजा व वाशिम हें 'अअ' वर्गांत आले व उरलेल्या दोनपैकीं तेल्हारा 'अ' व मानोरा 'ब' वर्गांत आला. पण यांना देखील 'अअ' वर्गांत आणण्याचे प्रयत्न चालू आहेत.

शेतीचें उत्पन्न वाढविण्याच्या कार्याला विकास खंडांत महत्वाचें स्थान आहे. त्याकरितां सुधारलेली बी-बियाणें वाटणें, खतें वाटणें कंपोस्ट खताचें खड्डे तयार करावयास लावणें, चौफुली पद्धतीची पेरणी करण, पीक संरक्षणाचें उपाय करणें वगैरे कामें करण्यांत येतात. शेतकऱ्यांना पीक स्पर्धेतून भाग घेण्यास लावण्यांत येते, त्यांच्या सहकारी संस्था बनवण्याचे प्रयत्न केले जातात, सुधारलेल्या पद्धतीच्या शेतीची प्रात्यक्षिकें दिलीं जातात. आणि जास्तींत जास्त शेतकऱ्यांना सघन पद्धतीनें शेती करावयास प्रवृत्त केलें जातें. मागे शेतकी व्यवस्था या प्रकरणांत उल्लेखिलेलीं सगळीं कामें कृषि विभागाच्या मार्गदर्शनाखालीं पण विकास खंड अधिकाऱ्यांनीच घडवून आणली आहेत. शेती सुधारणेच्या बाबतींत विकास खंडांच्या सुरुवातीपासून ३० सप्टेंबर १९६० पर्यंत जें कार्य करण्यांत आलें त्याची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल :—

| कार्य (१) | संख्या (२) | |
|---|---|---|
| (१) शेतकी संघांची स्थापना . . . . . . . . | १,०८४ | |
| (२) संमिश्र खतांचे खड्डे . . . | २४,९३९ | |
| (३) ओलीताखालीं आणलेली जमीन . . | ९,०३८ | एकर. |
| (४) ओलीताच्या विहीरी . . . | १,४५५ | |
| (५) जुन्या विहीरींची दुरुस्ती . . . . . . | १,५२८ | |
| (६) ऑईल एंजिन्स . . . . . . | ४३६ | |
| (७) विजेचे पंप्स . . . . . . . . | ३४३ | |
| (८) उठित केलेली जमीन . . . . . . . . | ३९,०३९ | एकर. |
| (९) सुधारलेल्या बियांचे वांटप . . . | १६१,३३१ | बंगाली मण. |
| (१०) रासायनिक खतांचे वांटप . . . . . | २०७,०६२ | बंगाली मण. |
| (११) सेवा सहकारी व क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी . . . | ७३५ | |

कुटीर उद्योगांच्या वाढीकरितां निरनिराळ्या व्यावसायिकांच्या प्रशिक्षणाचें वर्ग घेतले जातात व त्यांना शक्य असल्यास सहकारी पद्धतीनें धंदा चालवण्यास मदत केली जाते व तें शक्य नसल्यास वैयक्तिक कर्ज दिलें जातें. अशा प्रकारचे कर्ज आतांपर्यंत ३३,१८४ रुपये देण्यांत आलें आहे.

आरोग्य व्यवस्थेकरितां शोषक खड्डे, रस्तेदुरुस्ती, नाल्या सार्वजनिक संडास, मुत्रीघरें वगैरे तयार करून घेण्यांत येतात. सप्टेंबर ३० पर्यंत ३०,३८२ शोषक खड्डे, ६३,७४६ यार्ड नाल्या व ७५८ सार्वजनिक संडास तयार करण्यांत आले.

ग्रामीण जनतेचा राहणीचा व कलात्मक दर्जा सुधारावा म्हणून शाळा, समाज शिक्षणाचे वर्ग, बालवाड्या, महिला मंडळें, युवक मंडळें वगैरे सुरू करण्यांत आली असून त्यांची संख्या खालील प्रमाणें आहे :—

| | |
|---|---|
| शाळांच्या इमारती ... ... ... | २९५ |
| बालवाड्या ... ... ... ... | ४९ |
| लायब्ररीज ... ... ... ... | १७७ |
| वाचनालये ... ... ... ... | १८० |
| मनोरंजन गृहें ... ... ... ... | १४८ |
| रेडिओ सेटस् ... ... ... ... | २२० |
| कलापथकें ... ... ... ... | ४१ |
| युवक मंडळें ... ... ... ... | ७२२ |
| महिला मंडळें ... ... ... ... | ३८८ |

विकासांच्या सर्वच प्रयत्नांत सरकारी मदती बरोबरच जनतेच्या मदतीचा देखील भाग असावा लागतो. आजपर्यंत जनतेनें श्रमदान किंवा नगदी रकमेच्या रूपानें उचललेल्या वाट्याची किंमत २९,१३,७३५ रुपये आहे. विकासाचें कोणते ना कोणतें काम झालेले नाहीं अशीं खेडी जिल्ह्यांत फारच कमी आहेत. निरनिराळ्या खेड्यांनी श्रमदानानें आपापली गांवें मुख्य रस्त्याला जोडण्याकरितां केलेल्या जोड रस्त्यांची एकूण लांबी ३७ मैल असून विकासाची जास्तीत जास्त कामें आपापल्या गावांत ज्यांनी घडवून आणली व जे कोणत्याही विकास कार्यांत उत्साहानें भाग घेतात अशा आदर्श गावांची संख्या जवळ जवळ ५० आहे.

## जिल्हा विकास मंडळ

विकासाच्या योजनांना गतिमान करण्याकरितां व त्या लोकमतानुवर्ती करण्याकरितां जिल्ह्यांत एक विकास मंडळ आहे. विधानसभा, विधान परिषद, लोकसभा आणि राज्यसभा यांवर जिल्ह्यातून निवडून गेलेले सभासद ९, सरकारी अधिकारी १९ व गैर-सरकारी सभासद ४६ असें ७४ सभासद विकास मंडळांत असून त्याच्या निरनिराळ्या विषयांकरितां उप-समित्या आहेत. कलेक्टर हे मंडळाचे अध्यक्ष आहेत व उपाध्यक्ष गैर-सरकारी सभासदातील आहेत व सर्व उप-समित्यांचे ते अध्यक्ष असतात. मंडळास एक मानद सचिव (ऑनररी सेक्रेटरी) असून हा गैर-सरकारी सभासदांपैकीं असतो. निरनिराळ्या खात्यांचे जिल्हा प्रमुख हे त्या त्या उप-समित्यांचे सेक्रेटरी म्हणून काम करतात व आपापल्या विभागाच्या योजना उप-समिती पुढें विचाराकरितां ठेवतात. निरनिराळ्या सप्ताहांचें आयोजन देखील विकास मंडळामार्फतच केले जातें. दरवर्षी कृषि, पशु व कुटिर उद्योगांचे प्रदर्शन भरवून जिल्ह्यांतील प्रगतीची माहिती सर्व लोकांस करून देण्यांत येते व उत्तम नमूने आणणारांस उत्तजनार्थ बक्षिसें दिली जातात.

# अल्प बचत कार्य

अल्प बचतीचें कार्य १९४९-५० पासून सुरूं झाले. या कामाकरितां सुरूवातीस केंद्रीय सरकारचा एक जिल्हा संघटक होता व तोच जिल्ह्यांत अधिकृत एजंट वगैरे नेमून बचतीचें कार्य घडवून आणीत असे. १९५५-५६ पासून हें कार्य राज्य सरकारांकडे देवून त्याची जबाबदारी कलेक्टरवर टाकण्यांत आली. तेव्हांपासून राज्य सरकारची शासन यंत्रणा देखील यांत भाग घेवूं लागली व बचतीच्या कार्यास जोर चढला. अधिकृत एजंटांची संख्या वाढविण्यांत आली. शासनानें देखील जिल्हावार लक्ष्य ठरवून देण्यास सुरूवात केली व तें पूर्ण करण्याची अहमहमिका सुरूं झाली. १९५७-५८ सालांत २४ लाखाच्या इष्टांकापैकीं ९०.०६ टक्के रकम जमा करण्यांत येवून मुंबई राज्यांत आकोला जिल्ह्यास चौथा नंबर मिळाला. १९५८-५९ सालीं आकोला जिल्ह्यानें १३२.५३ टक्के रकम जमा करून नागपूर विभागांत पहिला क्रमांक व त्याबद्दल एक ढाल मिळविली. १९६० सालीं अतिपूरानें पिकें बुडाल्यामुळें फारशी बचत होवूं शकली नाहीं. या वर्षी इष्टांकाच्या २४० टक्के रकम जमा करून दोन लाख रुपयांचें बक्षिस मिळविलें आहे.

### अल्प बचत यंत्रणा

बचतीचें कार्य समाजांत दृढमूल होण्याकरितां खेड्यापाड्यांतून त्याचा प्रसार व प्रचार करण्यांचें कार्य जोरांत सुरूं आहे. जिल्ह्यांत एकूण ८६३ अधिकृत एजंटस् कार्य करीत आहेत. पैकीं १० ग्रामपंचायती आहेत. इंटरनल एजटस्ची संख्या ९१ आहे. स्त्रियांमध्यें कार्य करण्याकरितां अल्पबचत महिला मंडळ स्थापन झाले असून संस्थेच्या नांवर एजन्सी घेवून सर्व स्त्री सभासद अल्पबचतीचें कार्य करीत आहेत.

### बचतगट

जिल्ह्यांत एकूण जमा होणाऱ्या रकमेंत खेडे विभागातून जमा होणारी रकम ८० टक्के असते. पांच हजार ते पन्नास हजार पर्यंत बचत करणारांची संख्या जिल्ह्यांत फक्त ५० आहे. त्यांतील २५ ते ५० हजार पर्यंत रकम गुंतवणारे फक्त २५ आहेत. सगळ्या सरकारी कार्यालयांतून बचत गट स्थापन झाले आहेत तसेच जनपदांचे सगळे शिक्षक बचत करूं लागले आहेत. कामगारांच्या व इतर संस्थांमधून देखील बचत गट सुरूं करण्याचे प्रयत्न चालूं आहेत. जिल्ह्यांत सुमारे ४०० बचत गट असून त्यापैकीं २०० गट प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे आहेत, व १०० गट एका कुटुंबाचा एक या प्रमाणें १०० कुटुंबांचें आहेत.

आकोला सेंट्रल जेल मधील कैद्यांनी व कर्मचाऱ्यांनीही आपला बचत गट स्थापन केला असून नियमितःपणें बचत केली जाते.

### बचत शाळा

शाळांतून विद्यार्थ्यांना बचतीची संवय लागावी म्हणून तेथेंही बचत करवून घेण्याचे प्रयत्न करण्यांत येतात. सरकारी माध्यमिक मुलींची शाळा, आकोला, सरकारी पूर्व माध्यमिक शाळा, आकोट, सरकारी माध्यमिक शाळा, मंगरूळ व चवरे हायस्कूल, कारंजा या शाळांतील सर्व विद्यार्थी बचत करूं लागले असून त्या शाळा बचत शाळा झाल्या आहेत. या बाबतींत आकोट शाळेचें कार्य उल्लेखनीय आहे. बचतीचें कार्य प्रथम त्याच शाळेंत सुरूं झाले व १९५८-५९ सालीं जिल्ह्यातील पहिली व उत्तम बचत शाळा म्हणून तिला बक्षिस मिळाले. १९५९-६० सालीं झालेल्या कार्याबद्दल देखील त्याच शाळेचा पहिला क्रमांक येवून बक्षिसाचा मान तिनेंच मिळवला. १९६०-६१ सालाकरितां ३,२२५ रुपये जमा करण्याचें शाळेनें ठरवले होतें, पण डिसेंबर १५ पर्यंत त्यांनी आपले लक्ष्य पूर्ण केले.

### बचत ग्राम

खेड्यांतील प्रत्येक कुटुंबानें बचत करावी अशी खटपट बऱ्याच ठिकाणीं गेल्या वर्षीपासून सुरूं झाली असून १९६० च्या अखेरीस अशा बचत ग्रामांची संख्या ६५ असून त्यापैकीं दोन गांवें आदिवासींची आहेत. जिल्ह्यातील एकूण खेड्यांच्या $\frac{1}{3}$ म्हणजे ५०० खेडीं बचत ग्रामें करण्याचा प्रयत्न चालूं आहे. ज्यांना जास्त रकम एकदम गुंतवतां येत नाहीं अशा कुटुंबांना पोस्टल सेव्हिंग्ज बँकेत खाती उघडण्यास प्रवृत्त करण्यांत

येतें. जिल्ह्यांतील एकूण २७० पोस्टापैकीं १२० पोस्टांतून ही सोय आहे. या वर्षी संचित बचतीच्या ठेवीची खाती सुरू करण्यास लावण्याचे प्रयत्न करण्यांत येत असून या वर्षाकरितां १,००० खातीं उघडण्याचें निश्चित झाले आहे. पैकीं डिसेंबर १५ पर्यंत ८८० खातीं उघडली गेली आहेत.

## सर्टिफिकीटांच्या तारणावर कर्ज मिळण्याची सवलत

नॅशनल प्लॅन सर्टिफिकीटांच्या तारणावर कर्ज देण्याची सवलत सुरू झाल्यापासून बरेचसे धनिक व व्यापारी देखील अल्पबचत योजनेंत पैसा गुंतवूं लागले आहेत. आकोला येथें सर्वच बँका सर्टिफिकीटाच्या तारणावर पैसे देवूं लागल्या आहेत.

## अल्प बचत सल्लागार मंडळ

अल्पबचत कार्यांत जनतेचें सहकार्य मिळवण्याकरितां प्रमुख नागरिकांचें एक सल्लागार मंडळ नेमण्यांत आले आहे. यांत सरकारी ९ व गैर-सरकारी २८ असे एकूण ३७ सभासद असून जिल्हाध्यक्ष हे मंडळाचे सभासद आहेत. दोन महिन्यांतून एकदां या मंडळाची सभा भरून झालेल्या कामाचा आढावा व पुढील कार्याचा विचार करण्यांत येतो.

## कांही प्रसिद्ध ठिकाणें


निसर्ग सौंदर्याच्या दृष्टीनें पाहण्यासारखी अशी ठिकाणें या जिल्हयांत नाहींत. नुकत्याच सुरूं झालेल्या खांडवा ते हिंगोली रेल्वे मार्गावरील आकोट ताल्क्याचे वायव्य दिशेस ज्या ठिकाणीं हा रेल्वे मार्ग सातपुड्याचे डोंगर ओलांडून जातो त्या ठिकाणीं कोरलेले बोगदे व पहाडास वळसा घालून घेतलेल्या वळणाचा मार्ग पाहण्यासारखा आहे व हौशी प्रवाशांचे तो लवकरच आकर्षण ठरेल. त्याचप्रमाणें आकोल्यापासून ११ मैलावर आकोट रोडनें गांधीग्राम येथें झालेले महात्मा गांधींचें स्मारकहि पाहण्यासारखें आहे. पयोष्णी (पूर्णा) नदींत महात्मा गांधींच्या अस्थी विसर्जन करून त्या ठिकाणीं महात्माजींचें स्मारक उभारण्याकरितां एक स्मारक समिति आकोल्यांत स्थापन झाली. त्या समितीनें येथें एक महात्माजींचा पूर्ण संगमवरी पुतळा व सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वातंत्र्य युद्धांत मृत्यु पावलेल्या इसमांच्या स्मारकानिमित्त प्रत्येकी एक इमारत बांधून तयार केली आहे. या शिवाय त्या ठिकाणीं एक दवाखानाहि काढण्यांत आला आहे. पुतळ्याचें व स्मारकाच्या इमारतींचें अनावरण आणि उद्घाटन त्या वेळच्या मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें २ आक्टोबर १९५८ रोजीं महात्माजींच्या जन्मदिनीं झाले. आकोट तालुक्यात आकोट येथें एक पाषाणाचा सुमारे सहा फूट उंचीचा बसलेला नंदी व वारी येथें हनुमानाची मूर्ति पाहण्यासारखी आहे. ती स्वत: समर्थ रामदास स्वामींनी बसवली अशी आख्यायिका असून मूर्तीची उंची सहा फूटापेक्षां जास्त आहे.

## ऐतिहासिक अवशेष

विदर्भाचा इतिहास फार पुरातन असून याठिकाणीं बुद्ध, वाकाटक, चालुक्य, यादव, मोंगल, निजाम भोसले वगैरेचें राज्य झाले. त्यामुळें ऐतिहासिक अवशेष या जिल्हयांत ठिकठिकाणीं आहेत. देवगिरीच्या रामदेवराव यादवांचा दिवाण हेमाडपंत यानें बांधलेली हेमाडपंती देवालयें आजमितीसहि ठिकठिकाणीं आढळतात. तसेंच मोंगलांच्या व निझामांच्या काळांत जीवन असुरक्षित असल्या कारणानें ठिकठिकाणीं गांवच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी आपल्या संरक्षणाकरितां बांधलेल्या गढ्या देखील ठिकठिकाणीं आहेत. प्रत्येक गढी म्हणजे मातीची एक टेकडी असून त्यास आजूबाजूस बुरूज व भव्य प्रवेशद्वार असे. गढी संपूर्ण पांढऱ्या मातीची असून ही घर बांधण्यास अत्यंत उपयोगी अशी आहे. आजमितीस बहुतेक गढ्या पडलेल्या असून गावांतील लोक सर्रास तेथील माती आपल्या कामांकरितां वापरतात. कित्येक ठिकाणीं गांवच्या संरक्षणाकरितां परकोट बांधलेले असून प्रवेशाकरितां लहान मोठी दारें व बुरूज असत. कित्येक ठिकाणीं अशा परकोटाचे अवशेष मोडकळीस आलेल्या स्थितींत अद्यापहि पहावयास मिळतात. कांही ठळक अवशेषांची माहिती खालीं दिली आहे.

**नरनाळा.**—आकोट तालुक्यांत उत्तरेस सातपुड्याचे डोंगरांत आकोटपासून १४ मैलावर हा किल्ला असून तो बराच जुना व मोठा आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची ३,१६१ फूट व घेर चौदा मैल आहे. याचे तेलीयागड, जाफराबाद व नरनाळा असे तीन भाग असून तटास एकूण ६७ बुरूज व २१ लहान व सहा मोठे दरवाजे होते. पैकीं आकोट, शहानूर, दिल्ली व महाकाली दरवाजा हे कायम आहेत. आंत पाण्याची १९ टाकी आहेत.

किल्ला केव्हां बांधला याबद्दल एकमत निश्चित नाहीं. सर्व किल्ला एकाच वेळीं बांधला गेला नसावा असें दिसतें. फरिश्तानें लिहून ठेवलेल्या इतिहासाप्रमाणें बहामनी वंशातील नववा राजा अहमदशहा यानें इ. स. १४२५ त गाविलगड बांधला व नरनाळा दुरूस्त केला असा उल्लेख आहे. पण १९१० सालीं प्रसिद्ध झालेल्या आकोला गॅझेटियरच्या मताप्रमाणें तो इ. स. १४२५ तच बांधला गेला असें आहे. शहाणूर दरवाज्याची बांधणी चांदा येथें गोंड राज्यांनी बांधलेल्या किल्ल्यासारखी असली तरी तो इ. स. १४२५ चें अगोदर बांधला गेला असें समजण्याचें कारण नाहीं, असें गॅझेटिअर म्हणते. सध्याच्या स्वरूपांत तो किल्ला बहामनी वंशातील अहमदशहा यानें इ. स. १४८४ त पूर्ण केला असें दिसतें. महाकाली दरवाज्यावरील नक्षीकाम प्रेक्षणीय असून त्यावरील फारशी लेखावरून तो फत्तेउल्ला-इमाद-उल्-मुलक यानें इ. स. १४८७ त बांधला, असा गॅझेटिअरमध्यें उल्लेख आहे. त्यानंतर किल्ला इमादशाही बादशहांचे ताब्यांत व नंतर मोंगलांचे ताब्यांत गेला. औरंगजेबानें बांधलेला खास महाल, मशीद, बारादारी, सिलाखाना,



अकोला जिल्हा
विकास खंड, प्रकल्प व पिकें
सिंचन प्रकल्प तिसऱ्या योजना कालांत पूर्ण होतील
आकोट
तेल्हारा
पूर्णा नदी
अकोला
मुर्तिजापूर
पारस विद्युतप्रकल्प
बाळापूर
बार्शिटाकळी
बांध
पातूर
काटेपूर्णा प्रकल्प
कारंजा
मंगरूळ
मालेगाव
मानोरा
वाशिम
एकबुर्जी प्रकल्प
रिसोड
गवतं, लांकूड, बोबू
ज्वारी
कापूस
गहूं हरबरा वाटाणा.
जलाशय
तहसिलीची सरहद्द
विकास खंडाची सरहद्द
विकास खंडाचें मुख्य ठिकाण
कालवा
ओलिताखाली येणारा भाग

नगारखाना वगैरेचे पडके अवशेष अद्याप येथें आहेत. येथें एक दर्गा असून त्याचे दर्शनानें कुत्रें चावलेले लोक बरे होतात असा समज आहे. येथें एक नवगजी (२७ फूट) तोफ असून ती इ. स. १६७० त बसवली असा तिच्यावर लेख आहे. मोंगलानंतर तो भोसले नंतर निजाम व नंतर इंग्रजांचे ताब्यांत गेला. १८५७ सालापर्यंत तेथें तोफा व दारूगोळा असे. त्या वर्षी तो काढून आकोटास आणला.

किल्ल्याच्या पायथ्याशीं शहानूर या गांवीं जनपद सभेनें बांधलेली धर्मशाळा असून प्रवाशांना उतरण्याची सोय आहे. तिसऱ्या योजना कालांत शहानूर ते नरनाळा रस्ता दुरूस्त करण्यांत यावयाचा असून आकोट पासून थेट वर किल्ल्यावर मोटारनें जातां येईल.

हा किल्ला पुरातन वस्तू संरक्षण कायद्याखालीं सरकारनें सुरक्षित ठेवण्यास घेतला आहे.

**बाळापूर.**—हें सध्यां तहसीलीचें मुख्य ठिकाण आहे. मोंगलांच्या काळांत दक्षिणेतून उत्तरेकडे जाण्याचे मार्गावर हें महत्त्वाचें ठिकाण होतें. जहांगीर, शहाजहान व औरंगजेब हे गादीवर येण्यापूर्वी दक्षिणेचे सुभेदार म्हणून येथें राहिले. अकबराची मुलें मुराद व दानियल हे येथून १० मैलावर शहापूर येथें रहात असत. पूर्वीच्या काळीं बाळापूर हा अत्यंत श्रीमंत असा परगणा होता. येथें एक छोटासा किल्ला असून तो औरंगजेबाचा मुलगा अझिमशहा यानें इ. स. १७२१ त बांधण्यास सुरूवात केली व इलिचपूरचा पहिला नबाब इस्माइलखान यानें तो इ. स. १७५७ त पूर्ण केला, असा गॅझेटिअरमध्यें उल्लेख आहे. मन आणि म्हैस नद्यांच्या संगमावर किल्ला बांधलेला असल्यामुळें पूर्वीच्या काळीं तो अत्यंत सुरक्षित समजला जात असे. किल्ल्याला दोन परकोट असून बाहेरचा कोट अष्टकोनी व प्रत्येक कोनावर बुरूज व आंतील कोट चौकोनी व प्रत्येक कोनावर बुरूज बसलेला आहे. किल्ला पूर्ण विटांचा बांधलेला असून सध्यां तेथें तहसील कचेरी आहे.

गांवच्या दक्षिणेंस नदीच्या तीरावर २५ फूट चौरस चबुतऱ्यावर एक ३३ फूट उंचीची व २४ खांबाची छत्री बांधली आहे. ही औरंगजेबाचा सरदार मिर्झा राजा जयसिंग यानें बांधली असा समज आहे. छत्री पांच घुमटांची असून मधला घुमट सर्वांत मोठा आहे. छत्रीच्या छतांचें नक्षीकाम अत्यंत प्रेक्षणीय आहे. छत्री व किल्ला दोनहि ठिकाणें पुरातन वस्तू संरक्षण कायद्याखालीं सुरक्षित आहेत.

या ठिकाणीं मुसलमानांची दोन प्रमुख घराणी आहेत. पैकीं जहागिरदारांचें जें घराणें आहे त्यांचे मूळ पुरुष सय्यद महम्मूद कादरी येथें आले त्यावेळीं त्यांनी बगदाद येथील मिरान मोहिउद्दीन सय्यद अब्दुल कादीर जिलानी यांचा दाढीचा केस व हजरत-इ-इमाम अबू हनीफ यांनी ८ व्या शतकांत लिहिलेल्या कुराणाची हस्त लिखित प्रत आणली व त्या दोनहि वस्तू अद्याप जहागिरदार घराण्यातील श्री. महम्मूदमिया कादरी यांचेकडे पहावयास मिळतात. मूळ पुरुष सय्यद महम्मूद कादरी हे संत होते व जहांगीरचे आधीचे काळांत बाळापूरास आले. त्यांची जी कबर कादरी जहागिरदार यांचे वाड्यात आहे तिचा कळस कोणत्याहि बाजूनें पाहिला तरी विरूद्ध बाजूस झुकलेला दिसतो. जहागीरदार साहेबांच्या वाड्याचा लोखंडी दरवाजा भव्य व प्रेक्षणीय आहे.

**कारंजा.**—पूर्वीच्या पुणें ते नागपूर व हैद्राबाद ते दिल्लीकडे जाणाऱ्या मार्गावर असल्यामुळें मोंगलांचे काळीं हें गांव फार महत्त्वाचें व सधन समजलें जात असे व येथें पूर्वी फार मोठा व्यापार चालत असें. श्री शिवाजी महाराजांनी इ. स. १६७० सालीं हें शहर लुटून बरीच लूट नेली. येथें रोकडा रामाचा मठ व कल्याण स्वामीचा मठ असे दोन मठ असून ते दोन्ही श्री समर्थ रामदास स्वामीचे शिष्यांनी स्थापन केलें असें मानलें जातें. येथील कागदपत्र धुळ्याचे समर्थ सांप्रदायी श्री. शंकरराव देव यांनी संशोधनाकरितां नेलें आहेत. श्री रामदासाचा मठ म्हणून एक तिसरा मठ तंजावर येथील मठातील भीमदास नांवाचे शिष्यानें स्थापन केलेला आहे. त्या मठांत जो मारूती आहे त्याचें तोंड नियमाप्रमाणें दक्षिणेस नसतां उत्तरेस आहे.

**गुरु मंदिर.**—गुरु चरित्राच्या पोथीतील श्री नृसिह सरस्वती यांचें कारंजा हें जन्मस्थान आहे. श्री नृसिह सरस्वती हे मूळ नगरनाईक काळें यांचे घराण्यांतील. हे भोसल्यांचे सावकार होते. सध्यां त्यांचा वंश काशीस राहतो व त्यांचा वाडा श्री. घुडे यांनी विकत घेतला असून अद्याप कायम आहे. तपस्वी

अण्णासाहेब पटवर्धन हे श्री नृसिंह सरस्वतीचें शिष्य होते व आपल्या गुरुचें जन्मस्थान म्हणून गुरुच्या प्रेरणें-वरून ते येथें दर्शन घेवून गेले. तसेंच गरूडेश्वरी समाधिस्थ झालेले श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंभेस्वामी हे देखील आपले गुरु श्री नृसिंह सरस्वतीचें हें जन्मस्थान म्हणून इ. स. १९१० व १९१२ मध्यें येथें येवून दर्शन घेवून गेले व त्यामुळेंच श्रीमन्नृसिंह सरस्वती येथें जन्मले ही गोष्ट उघड झाली. इ. स. १९१३ सालीं श्री ब्रह्मानंद सरस्वती नांवाचे एक संन्यासी कारंजा येथें येवून वाडयांत दर्शनास गेले व येथें गुरुमहाराजांचे मंदिर बांधण्याची आज्ञा आहे असें म्हणून मंदिर बांधण्याच्या तयारीस लागले व तें काम १९२४ मध्यें पूर्ण झालें. सध्यां ज्या जागीं गुरुमंदिर आहे तें श्रीनृसिंह सरस्वतीचें जन्मस्थान व श्री. काळे यांचे हवेलींत जी नृसिंहाची भित समजली जाते ती त्यांची वेदचर्चा करण्याची जागा होती असें मानलें जातें.

गुरुमंदिराची व्यवस्था ट्रस्टीकडे असून पूजेकरितां प्रत्येकीं १५१ रुपये बऱ्याच शिष्यांनी दिलें असून त्या निधीच्या व्याजांतून पूजेअर्चेचा खर्च वर्षभर चालतो. यात्रेकरूंना उतरण्याकरितां मंदिरास लागूनच संस्थेची धर्मशाळा आहे.

कारंजा हें गांव मूर्तिजापूर तालुक्यांत असून आकोला येथून मोटारनें व मूर्तिजापूर येथून रेल्वेनें जातां येते. येथें जैनांची मोठी देवालयें असून तेथील तीर्थंकरांच्या मूर्ती रत्नाच्या आहेत. जैन पंथाच्या अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचाहि बराचसा सांठा तेथें आहे.

**वाशिम.**—याचें पूर्वीचें नांव वत्सगुल्म होतें व ही वत्सऋषींची तपोभूमि होती, असें मानलें जातें. वत्सगुल्म महात्म्य म्हणून जी पोथी उपलब्ध आहे त्यांत हें तीर्थक्षेत्र असून येथें १०८ तीर्थें असल्याचें दिलें आहे. यापैकीं कित्येक आजहि वाशिमच्या परिसरांत दिसतात. वायुपुराण व पद्मपुराणातहि वत्सगुल्म हें तीर्थ-क्षेत्र म्हणून उल्लेख आहे. येथील पद्मतीर्थ आज कायम असून येथें देवगिरीचे राजे यादव १२ व्या शतकांत स्नानास आले होते असें मानतात. वाकाटकच्या एका वंशाची राजधानी १४ व्या शतकांत येथें होती व त्यावेळीं येथील वाङ्मय व कला बऱ्याच प्रसिद्धीस आल्या होत्या. वाकाटकांनी दिलेले कांहीं ताम्रपट येथें सांपडले.

ज्योतिषांनी जी पृथ्वीची मध्यरेषा कल्पिली आहे ती येथून जाते व त्या रेषेचा मध्यहि येथेंच असून त्या ठिकाणीं मध्यमेश्वराचें देऊळ होतें. त्याच्या जीर्णोद्धाराचे प्रयत्न सध्यां सुरूं आहेत.

येथील बालाजीची प्रसिद्ध मूर्ति वत्सगुल्म महात्म्यांत वर्णिलेल्या जनार्दनाच्या मूर्तिसारखी असून ती पूर्वीच्या काळची असावी व पुढें मोंगलांच्या भीतीनें ती गाडून टाकली गेली व पुढें शके १७०० मध्यें अचानक जमीन उकरतांना सांपडली असें मानलें जातें. सध्यांचें बालाजी मंदिर भोसल्यांचे सरदार श्री. काळ यांनी शके १७८० मध्य बांधले व सांपडलेल्या मूर्तीची तेथें स्थापना केली.

वाशिमचा सर्व इतिहास उजेडांत आणण्याचा प्रयत्न करणारे श्री. शंकर गोपाळ ऊर्फ अण्णासाहेब डवीर यांनी वाशिमच्या महत्त्वाबद्दल ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्या खालील प्रमाणें :—

(१) वत्स ऋषीची तपोभूमि.
(२) बालाजीचें मंदिर.
(३) पद्मतीर्थ.
(४) वाकाटक वंशाची राजधानी.
(५) वच्छोमी (वैदर्भी) रीतीचें व विद्या, कला, संस्कृती यांचें केंद्र.
(६) गुणाढ्याचें जन्मस्थान.
(७) मध्यमेश्वर तीर्थ.
(८) वात्सायनांच्या कामसूत्रांत (३ रें व ४ थें शतक) सांगितलेल्या चालीरीतीचें उगमस्थान.
(९) दोन प्राचीन जैन मंदिरे.

**पातुर येथील गुहा.**—पातूर, बाळापूर रस्त्यावर पातूरपासून दोन मैलावर एका छोटयाशा टेकडींत दोन गुहा खोदलेल्या आहेत. प्रत्येक भागांत समोर मोठे जाड खांब, मागे पडवी व त्यामागें एक खोली आहे. यापैकीं पश्चिमेकडील गुहा कायम असून पूर्वेकडील गुहेचे खांब नवीन बांधले आहेत. ह्या गुहा पुरातन वस्तू संरक्षणाच्या कायद्यान्वयें संरक्षित आहेत ; पण सध्यां अत्यंत दुर्लक्षिलेल्या स्थितींत आहेत.

**बार्शीटाकळी येथील मंदिर.**—बार्शीटाकळी गांव आकोल्यापासून मंगरूळ रस्त्यावर १२ मैलांवर असून तेथें देवीचें व महादेवाचें अशीं दोन जुनी मंदिरें आहेत. पैकीं देवीचें देऊळ फार जुनें असून संपूर्ण दगडाचें आहे व त्यावर सुंदर असें नक्षीकाम कोरलेलें आहे. देवळाच्या आंत देवीच्या मागच्या भिंतीवर संस्कृत लेख कोरलेला असून त्यावरून तें शके १७९८ मध्यें बांधलें असावें, असा अंदाज आहे. हें देऊळ पुरातन वस्तू संरक्षण कायद्यान्वयें संरक्षित आहे. दुसरें महादेवाचें मंदिर देवीच्या देवळाचे मानानें अलिकडचें आहे. हें अर्धे दगड व अर्धे विटांचे असून दगडावरील नक्षीकाम उत्तम आहे. दोन्ही देवळें हेमाडपंती समजलीं जातात. याशिवाय येथें निजाम व भोसले यांच्या कचेऱ्या असलेले जुनें वाडे आहेत.

**आसदगड (आकोला).**—औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या शेवटीं त्याचा मुख्य प्रधान आसदखान यास आकोला हें गांव जहागीर होतें. त्याचा कारभारी खाजा अब्दुल लतीफ यानें आकोल्याचा परकोट व एक मोठा किल्लेवजा बुरूज बांधला व त्यास आसदगड असें नांव दिलें. बुरूजावरती एक खोलीवजा इमारत असून ती पुरातन वस्तू संरक्षण कायद्यान्वयें संरक्षित आहे. आकोला नगरपालिकेनें आतां या किल्ल्याची दुरूस्ती केली असून तेथें स्वातंत्र्य युद्धांत मृत्युमुखीं पडलेल्या वीरांचें स्मारक म्हणून आझाद पार्क नांवाचें उद्यान तयार केलें आहे. सध्यां हें स्थळ आकोल्यांतील प्रेक्षणीय स्थळांपैकीं झालें आहे.

## यात्रेची ठिकाणें

**लोणी.**—लोणी हें वाशिम तालुक्यांत परभणी जिल्ह्याच्या सीमेजवळ असून येथें श्री. सखाराम महाराज नांवाचे सत्पुरुष होवून गेले. ते शके १८०० मध्यें कार्तिक व।। १४ वीस समाधिस्थ झाले. तेव्हांपासून त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्यानें तीन दिवस फार मोठी यात्रा भरते. लाखो लोक यात्रेस येतात व सर्वांस महाराजांचें संस्थानकडून शिधा मिळतो. पुण्यतिथीच्या दिवशीं लाखो लोक जेवण घेतात. इतक्या लोकांच्या स्वयंपाकाची व वाढण्याची व्यवस्था मात्र उत्तम ठरून गेलेली आहे. परिसरांतील कित्येक गांवांतून स्वयंपाकांतील पदार्थ तयार करणारीं कुटुंबे ठरलेलीं आहेत. त्याप्रमाणें त्या त्या कुटुंबांतील एक एक गृहस्थ ठरलेल्या वेळीं येतो व सगळेजण मिळून ठरलेला पदार्थ शिजवतात. याप्रमाणें निरनिराळे गट निरनिराळे पदार्थ तयार करतात. वाढण्याचीहि जबाबदारी याचप्रकारें परिसरांतील गांवांतील कुटुबांतून वाटली गेली आहे. त्यामुळें लाखो लोकांच्या पंक्तीचा स्वयंपाक व वाढण्याचें काम बिनाखर्चानें व नियमितपणानें होतें. याशिवाय दर्शनास येणाऱ्या यात्रेकरूंना जेवण मिळण्याची व्यवस्था वर्षभर कायम स्वरूपाची आहे. संस्थानास उत्पन्नाची बाब भक्तांनी देवापुढें ठेवलेल्या दक्षिणेशिवाय दुसरी नाहीं.

या ठिकाणीं मराठवाड्यांतील परभणी, नांदेड व वऱ्हाडांतील सर्वच जिल्ह्यांतून लोक यात्रेस येतात व बराच मोठा व्यापार होतो. आकोला जिल्ह्यांत याचेइतकी मोठी यात्रा दुसरी नाहीं.

**आकोट.**—हें तालुक्याचें ठिकाण असून या ठिकाणीं कार्तिक व।। ६ ला श्री. नरसिंग महाराजांची यात्रा भरते व ती एक महिना राहते. श्री. नरसिंग महाराज हे स्वतः आकोट तालुक्यांतील जळगांव नाठे येथील राहणारे कुणबी समाजांतील होते व त्यांचे गुरु उमरा येथील मुसलमान संत कुतुबअली शाह होते. श्री नरसिंग महाराजांची शिष्यशाखा सर्वच समाजांत असून त्यांचें सर्व वास्तव्य आकोट येथेंच झालें. ते शके १८०८ इ. स. १८८८ त समाधिस्थ झाले. यात्रांचें महत्त्व पूर्वी बाजाराच्या दृष्टीनें देखील बरेच असे व यात्रेंत आलेलीं दुकानें एक महिनाभर रहात. पण सध्यां सर्वच वस्तूंचीं कायम दुकानें आकोटांत झालीं असल्यामुळें या दृष्टीनें यात्रेचें महत्त्व कमी झालें आहे. मंदिराचे मालकीची ५०० एकर जमीन आहे.

**मंगरूळ.**—मंगरूळ हें आकोल्यापासून ४० मैलांवर आग्नेय दिशेस असून तालुक्याचें ठिकाण आहे. येथें सैय्यदना मौलाना हजरत हयात कलंदर रहमतुल्ला अलम नांवाच्या पीराचा (संताचा) दर्गा असून हें गांव त्यांनीच वसवलें व त्यांचेच नांवानें मंगरूळ पीर असें ओळखलें जात असें. या गांवाचें नांव मंगरूळपूर असल्याचाहि उल्लेख एका ठिकाणीं सांपडतो. वली दादा हय्यात कलंदर हे मूळ अरबस्थानांतून येवून प्रथम म्हैसूर संस्थानांत राहिले व तेथून पैगंबराच्या आज्ञेवरून मंगरूळास आले व सध्यांच्या दर्ग्याच्या

ठिकाणीं राहिले. ते हिजरी सन ६५१ (इ. स. १२४० अंदाजे) मध्यें जम्मादी उस्मानी महिन्यात समाधिस्थ झाले. त्यांनी आपली कबर स्वतःच बांधली व निर्याणाच्या दिवशीं त्यांत जिवंत प्रवेश केला अशी आख्यायिका आहे म्हणून त्यांस हयात म्हणजे जिवंतच समजतात. पैगंबरवासी होण्याच्या दिवसापासून तीन दिवस उरूस भरतो. पूर्वी हिंदू व मुसलमान मिळून लाखो लोक यात्रेस येत असत. आतां सुमारें २५,००० लोक येतात. दर्ग्यास निजाम-उल्मुलक यानें दोन गांवें जहागीर दिलीं होती. तीं १९४८ त खालसा झालीं. तेव्हांपासून १,१७० रुपये दरसाल ग्रॅण्ट मिळते व २,००० रुपये भाड्याचे व २,००० रुपये शेतीचें उत्पन्न येतें. संस्थानच्या मालकीची २०० एकर जमीन असून तिची व्यवस्था १९५२ पासून पंच कमिटी पाहते व तेव्हांपासून दर्ग्याची व उरूसाची व्यवस्था सुधारत आहे.

**बिरबल नाथाची यात्रा.**—मंगरूळासच माघ शु. १४ स बिरबल नाथाची यात्रा भरते. ती चार दिवस चालते. बिरबल नाथ हे मूळ पंजाबांतून आले ते संवत् १९८४ माघ शु. १४, तारीख ४ फेब्रुवारी १९२८ रोजीं समाधिस्थ झाले. त्यांचें एक मंदिर बांधलें असून त्यास २५ एकर जमीन आहे. मंदिराची व्यवस्था श्री. लालसिंग जमादार ट्रस्टी म्हणून पाहतात.

**तराळा.**—मंगरूळापासून आकोल्याकडे ६ मैलांवर तराळा येथें सैय्यद अकबर अलिशाह कलंदर शाह यांचा दर्गा आहे. हे मूळ अफगाणिस्थानांत इरात येथे राहणारे. बालपणापासून देवाकडे लक्ष असल्यामुळें घरून ११व्या वर्षी निघाले व गुरुच्या शोधांत मक्कामदिना,हिंदुस्थान वगैरेंत भटकले व मंगरूळच्या दादा हयात कलंदर यांनी स्वप्नांत दिलेल्या आदेशावरून तराळा येथें येवून राहिले व तेथेंच समाधिस्थ झाले. केव्हां आले व केव्हां समाधिस्थ झाले याच्या तारखा उपलब्ध झाल्या नाहींत. पण सन १९२३ सालीं रज्जब महिन्याच्या १ ल्या तारखेस समाधिस्थ झाले असावे, कारण त्या तारखेपासून तीन दिवस उरूस भरतो. दर्ग्यास उत्पन्नाची बाब कांही नाहीं पण अफगाण लोकांच्या देणग्या पुष्कळ येतात. दर्ग्याची इमारत प्रेक्षणीय असून सेवेच्या निमित्यानें या ठिकाणीं २७ पठाण लोक राहतात व चरितार्थ चालवतात. पूर्वी उरूसास पुष्कळ लोक जमत पण आतां २०० ते ४०० लोकांपेक्षां जास्त लोक जमत नाहींत.

**पातुर.**—आकोला-वाशिम रोडवर आकोल्यापासून २० मैलांवर असून येथें नानासाहेब व शेखबाब असे दोन संत फार पूर्वी होवून गेले व दोघांच्याहि नांवाने नानासाहेबांचे पातूर किंवा पातूर शेखबाबू म्हणून हें गांव प्रसिद्ध आहे.

नानासाहेब महाराज हे मूळ पातूर येथील राहाणारे. त्यांचा जन्म शके १६०० (इ. स. १६७८ सालीं) आमले घराण्यांत झाला. ते मार्कीनाथ महाराजांचे शिष्य होते. ते माघ शु.॥ ५ स समाधिस्थ झाले. त्याच दिवशीं त्यांची यात्रा भरते. यांचें देऊळ कोणी बांधलें व केव्हां बांधलें याबद्दल अधिकृत माहिती उपलब्ध नाहीं. संस्थानास उत्पन्नाचें साधन कांहीं नाहीं. ५० वर्षापूर्वी येथें मोठी यात्रा भरत असे. आतां ती जवळजवळ बंद झाल्यासारखी आहे. संस्थानाची व्यवस्था श्री. भगवान विष्णुदास आमले पहातात. श्री. नानासाहेब महाराज गीतेवर प्रवचन करीत. शके १६२६ मध्यें श्री. मुकुंदराज महाराजांनी नानासाहेबांचे चरित्रावर ग्रंथ लिहून पूर्ण केला असें कळतें. आज संस्थानाची स्थिती समाधानकारक नाहीं.

# सामाजिक संस्था

शिक्षण व सहकार क्षेत्रांतील सोडून इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या बऱ्यांच संस्था जिल्ह्यांत आहेत. त्यांपैकीं कांहींची माहिती खाली दिलीं आहे:—

## भारत सेवक समाज

जनतेला स्वत:च्या उन्नतीकरितां स्वत:च प्रयत्न करावयास उद्युक्त करण्याचे उद्देशानें ही संस्था कार्य करीत असून त्यामार्फत वेळोवेळीं विद्यार्थ्यांची, शिक्षकांची वगैरे शिबीरें घेवून श्रमदानानें विधायक कार्य करण्यांत येतात. आकोला जिल्ह्यांत समाजानें ११ मैल लांबीचे जोडरस्ते, शाळेच्या १५ इमारती व लायब्ररी, पंचायत घर, सुतिकागृह यांची प्रत्येकी एक इमारत बांधण्यास मदत केली. याशिवाय जिल्ह्यांत पांच बालवाडया, एक शिवणकला वर्ग, ३२ भगिनी मंडळें, एक लायब्ररी, एक कुटुंब नियोजन केंद्र, एक महारोग निवारण केंद्र, हरिजन स्त्रियांकरितां संस्कार केंद्र, सुतिकागृह वगैरे संस्था चालविल्या जातात.

## मध्यवर्ति सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्ड

सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डाची एक शाखा महाराष्ट्र स्टेट सोशल वेलफेअर बोर्ड ही असून त्यामार्फत आकोला जिल्ह्यांत आकोला, वाशिम व मूर्तिजापूर अशा तीन विकास खंडांत प्रत्येकी एक प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन कमिटी नेमण्यांत आली आहे व तिचेमार्फत वेलफेअर बोर्डाचीं कामें विकास खंडांत केलीं जातात. हें बोर्ड विशेषत: स्त्रियां व मुलें यांतच कार्य करतें. बालवाडया चालवणें, महिला मंडळें चालवणें, स्त्रियां व मुलें यांना फुकट औषध देणें, मुलांना दूध देणें, दाया ठेवून बाळंतपणांत मदत करणें, स्त्रियांशी वैयक्तिक संबंध ठेवून त्यांना मुलांची जोपासना, घरांतील स्वच्छता, सजावट, मगनचुल्याचा (बिनधुराच्या चुलीचा वापर) वगैरे बाबतींत सल्ला देणें हीं कामें बोर्डाकडून करण्यांत येतात. यांना खर्चाकरितां भारत सरकार, राज्य सरकार व विकास खंड यांतून पैसे मिळतात.

## हरिजन सेवक संघ

संघाचें जिल्ह्यांतील प्रमुख कार्यालय आकोला येथें असून इतरत्र कार्यकर्ते आहेत व हरिजनांच्या उन्नतीच्या सरकारी योजनांचा हरिजनांना फायदा मिळवून देणें, अस्पृश्यता निवारणाचा प्रचार करणें वगैरे कामें करतात.

## निलाखे टाइपरायटिंग ॲकॅडमी

श्री. शांताराम निळकंठ निलाखे व श्री. दामोदर निळकंठ निलाखे या बंधुद्वयांनी शॉर्टहॅण्ड व टाइपरायटिंग शिकवण्याकरितां ही संस्था काढली आहे. सरकारी टाइपरायटर्स दुरुस्त करण्याचें काम यांनाच दिलें जातें. निलाखे बंधु हे फार जलद टाइप करण्यांत प्रविण असून श्री. शांताराम निळकंठ निलाखे हे १९४६ पासून हिंदुस्थानांत जलद टाइप करण्यांत दरवर्षी पहिले आले आहेत. १९५४ सालीं कोलंबो येथें झालेल्या चाचणींत मिनिटास ११७ शब्द टाइप करून ते आशियांत पहिले आले व १९५८ मध्यें १४५.९ शब्द टाइप करून त्यांनी जगांत पहिला नंबर मिळवला. त्यांनी मराठी टाइपरायटरचा की बोर्ड स्वत: तयार केला असून त्यांत कमीत कमी कीज ठेवून मराठींतील सगळीं मुळाक्षरें टाइप करण्याची सोय केली आहे.

श्री. दामोदर निळकंठ निलाखे हे शांतारामपंतांचे धाकटे बंधू असून १९५४ व १९५७ सालीं त्यांनी देखील हिंदुस्थानांत सुवर्णपदक मिळवलें व १७ जानेवारी १९६० रोजीं ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ शार्टहॅंड रायटर्स असोसिएशननें घेतलेल्या परीक्षेंत मिनिटास १११.९ शब्द टाइप करून अखिल भारतांत पहिला क्रमांक मिळवला.

## स्त्रियांच्या संस्था

**मातृ सेवा संघ** (आकोला).—ही नागपूर येथील मातृसेवा संघाची शाखा असून यांनी एक सूतिकागृह चालवलें आहे. कुटुंब नियोजन केंद्र लवकरच सुरू होणार आहे.

**महिला परिषद** (आकोला).—ही अखिल भारतीय महिला परिषदेची शाखा असून यांचेमार्फत बालक मंदिर व स्त्रियांकरितां शिवण कामाचा डिप्लोमा कोर्सचा वर्ग चालविला जातो व त्याकरितां सरकारी मदत मिळते.

**बाल विकास समिति.**—ऑल इंडिया चाइल्ड वेलफेअर सोसायटीची ही शाखा असून नुकतीच सुरू झाली आहे. बालकांच्या कल्याणाकरितां कार्य करणें व ज्या संस्था असें कार्य करीत आहेत त्यांच्या अडचणी दूर करून मदत करणें हा यांचा उद्देश आहे. बालक मंदिराच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करून कार्याची सुरुवात करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**अल्पबचत महिला क्लब** (आकोला).—स्त्रियांत अल्पबचतीचें कार्य करण्याकरितां ही संस्था स्थापन झाली असून त्यामुळें मिळणाऱ्या कमिशनच्या उत्पन्नांतून शिशु संवर्धनाचें कार्य करण्याचा यांचा उद्देश आहे. व त्याप्रमाणें एक बालक मंदिर कमिशनच्या उत्पन्नावर आकोला येथें सुरू करण्यांत आलें आहे.

याशिवाय शारदा समाज (आकोला) व राष्ट्रीय महिला मंडळ (आकोला) अशा दोन स्वतंत्र संस्था असून दोनहि पक्षभेदरहित अशा आहेत. शारदा समाजांत शिकलेल्या मध्यमवर्गीय स्त्रियांची संख्या जास्त आहे. फक्त राष्ट्रीय महिला मंडळांतच समाजाच्या सगळ्या स्तरांतील स्त्रियां सभासद आहेत. प्रत्येक स्त्री संस्थेचें एक तरी बालक मंदिर असून आकोला शहरांतील बालक मंदिराची संख्या १० आहे.

वाशिम येथे वनिता समाज नांवाची संस्था असून ती स्त्रियांकरितां भरतकाम, शिवणकामाचें वर्ग व बालक मंदिर चालवतात.

## ग्रंथालय

बाबूजी देशमुख वाचनालय, आकोला, हासमसेठ लायब्ररी, आकोला व सनातन धर्म पुस्तकालय, आकोला अशीं तीन ग्रंथालयें मोठ्यापैकीं आहेत. तीनहि संस्थांना स्वतःच्या मालकीच्या इमारती असून पुस्तकांचा साठाहि बराच आहे. बाबूजी देशमुख वाचनालय ही संस्था १०० वर्षांची जुनी आहे. सनातन धर्म वाचनालय ५० वर्षांपूर्वी सुरू झालें. हिंदु धर्माची प्रमाणित पुस्तकें, ग्रंथ, पोथ्या वगैरे धार्मिक वाङ्मयाचा सांठा पुष्कळ आहे. नुकताच स्त्री व बाल विभागहि उघडण्यांत आला आहे. येथें वाचण्यास वर्गणी लागत नाहीं. हासमसेठ लायब्ररी ही एका मुसलमान ट्रस्टनें चालविली असून तेथें उर्दू पुस्तकांचा सांठा बराच आहे. अलायन्स मिशननें गेल्या वर्षापासून एक अलायन्स लायब्ररी सुरू केली आहे. याशिवाय पुस्तक विक्रेत्यांचे दुकानांतून शालेय व महाविद्यालयीन पुस्तकें वाचावयास मिळण्याची सोय आहे. आकोट, वाशिम, तेल्हारा, कारंजा येथें सार्वजनिक वाचनालयें आहेत पण त्यांची परिस्थिती भरभराटीची नाहीं. मूर्तिजापूर, बाळापूर, मंगरूळ हीं तालुक्यांचीं ठिकाणें असूनहि तेथें ग्रंथालयें नाहींत. एकूण सार्वजनिक ग्रंथालयांची जिल्ह्यांतील संख्या २४ आहे.

## फिरतीं वाचनालयें

आकोला येथे जें शासकीय जिल्हा ग्रंथालय आहे त्यांचेमार्फत ४ (सी) स्कीम खालीं १२६ ग्रंथालय केंद्रें आहेत. पायलट स्कीमखालीं ६२ ग्रंथालय केंद्रें असून प्रत्येक केंद्रास सत्रंजी, पेट्रोमॅक्स व आलमारी पुरविली जाते. अशीं १० केंद्रें दरवर्षी उघडलीं जातात. याशिवाय पूर्वीच्या समाज शिक्षण योजनेप्रमाणें पुस्तकांच्या ७३ पेट्या जिल्ह्यांतून वाटण्यांत आल्या होत्या व त्या ठिकठिकाणीं फिरविल्या जात. त्यांचीहि व्यवस्था आतां जिल्हा ग्रंथालयाकडेच आली आहे. कांहीं अटींवर नागरिकांनाहि घरीं वाचावयास पुस्तकें देणें सुरू झाल्यामुळें या ग्रंथालयासहि आतां सार्वजनिक ग्रंथालयाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. खास बाल वाचनालयाचा विभाग उघडणाऱ्या ग्रंथालयास जिल्हा ग्रंथालयाकडून दरवर्षी १६० रुपये अनुदान मिळतें सहा ग्रंथालयांनी याचा फायदा घेतला आहे. शिक्षण खात्याकडून ग्राम वाचनालयें उघडलीं जातात. अशीं १५० ग्राम वाचनालयें जिल्ह्यांत आहेत. व त्यांनाहि जिल्हा ग्रंथालयाकडून पुस्तकें पुरविलीं जातात. जिल्ह्यांतील कोणत्याहि संस्थेस वाचनाकरितां जिल्हा ग्रंथालयाकडून पुस्तकें पुरविली जातात व त्याकरितां कांहीं फी घेतली जात नाहीं.

## वर्तमानपत्रें व नियतकालिकें

मातृभूमि व शिवशक्ती अशी दोनच मराठी दैनिकें आकोला येथें नियमितपणानें निघतात. पैकीं मातृभूमि हें ३० वर्षांचें जुनें असून शिवशक्ती सुरू होवून फक्त एक वर्ष झालें. नवा समाज, किसान, जमाना व विदर्भ हीं साप्ताहिकें निघतात पण त्यांचा आकार व प्रसार अत्यंत अल्प आहे. जनाना हिंदी भाषेंत निघतें. सर्व वर्तमानपत्रें आकोला येथेंच निघतात. नागपूरचें तरुण भारत, महाराष्ट्र, हितवाद, नागपुर टाइम्स, पुण्याचें केसरी, तरुण भारत व मुंबईचीं सर्व इंग्रजी-मराठी दैनिकें जिल्ह्यांत वाचलीं जातात. दिल्लीचीं व मद्रासचीं पत्रें येतात पण त्यांचे वाचक कमी. गुजराथी भाषेंतील जन्मभूमिचे वाचक गुजराथी समाजांतून जास्त आहेत. मराठीचीं सर्व मासिकें येतात व तीं घरोघर वाचावयास देणारी फिरती वाचनालयें आकोला शहरांतून बरीच आहेत. इतर ठिकाणीं अद्याप ह्या पद्धतीचा प्रसार फारसा झाला नाहीं.

आकोला नगरपालिकेनें नगर सेवक पाक्षिक नगरपालिकेची माहिती देण्याच्या उद्देशानें दोन वर्षांपूर्वी सुरू केलें आहे. अशा प्रकारचें हें एकच पत्र या जिल्ह्यांत आहे.

## भारत कृषक समाज

अखिल भारतीय भारत कृषक समाज दिल्लीची जिल्हा शाखा आकोला येथें असून प्रत्येक तालुक्यास एक अशा सहा शाखा आहेत. शेतीचें उत्पन्न वाढविण्याकरितां व शेती नवीन सुधारलेल्या पद्धतीनें करण्याकरितां शेतकऱ्यांत प्रचार करणें व शेतीच्या समस्यांचा विचार करण्याकरितां परिसंवाद घडवून आणणें, शेतकऱ्यांच्या सफरी आयोजित करणें, वगैरे कामें केलीं जातात. गेल्या वर्षीच्या दिल्ली येथील जागतिक प्रदर्शन पाहण्यास जवळ जवळ ४०० शेतकऱ्यांची एक सहल आयोजित करण्यांत आली होती. सुमारें तीन वर्षांपासून समाज या जिल्ह्यांत कार्य करीत असून दोन परिसंवाद आयोजित करण्यांत आले होते.

## सर्वोदय ग्राम स्वराज्य परिवार : देवरी

सामुदायिक जिवनाचा एक अभिनव प्रयोग या जिल्हांत देवरी या गांवीं सर्वोदयवादी बारा कुटुंबांनीं मे १, १९६० पासून सुरू केला आहे. त्या दिवशीं या बारा कुटुंबांनीं सर्वोदय ग्राम स्वराज्य परिवार नांवाची संस्था स्थापन करून तिचें सभासदत्व पत्करलें. परिवारांत सामील झालेल्या बारा कुटुंबापैकीं चार शेत-मालक, दोन शिवण-काम करणारे, एक सुतारकाम करणारा, एक मोटार एजंट व इतर शेत मजूरी करणारे आहेत. शेत मालकांनीं आपली संपूर्ण ३० एकर जमीन परिवाराचे मालकीची केलीं. तसेंच इतर धंदेवाल्यांनीहि आपापली मजूरी व उत्पन्न मे १ पासून परिवारांत जमा करण्यास सुरूवात केली.

परिवार हें एक मोठें संयुक्त कुटुंब समजलें जात असून त्यात ५० माणसें आहेत. कुटुंबाला लागणाऱ्या निरनिराळया गरजा भागविण्याची कामें निरनिराळया माणसांकडे वाटून देण्यात आली आहेत. उदाहाणार्थ कुटुंबास लागणारा धान्य व किराणा एकजण पाहतो, दुसरा औषध पाण्याची व्यवस्था ठेवतो तर तिसरा मुलांचें शिक्षण वगैरेची सोय पाहतो. या प्रमाणें प्रत्येकाकडे निरनिराळी खातीं वाटून देण्यांत आल्यामुळें इतर मंडळींना चिंता करण्याचें कांहीं कारण उरलें नाहीं व ते आपलें दररोजचें काम निश्चित मनानें करूं शकतात. मजूरी किंवा काम शोधण्याची देखील कोणास काळजी करावी लागत नाहीं. कुणाकडे पाहुणे आले तर ते परिवाराचेच समजले जातात व परिवाराच्या प्रतिष्ठे प्रमाणें त्यांचें स्वागत केलें जातें. यंदा परिवारातील मुलींची लग्नें देखील परिवाराच्या खर्चातूनच करण्यांत आली.

परिवारास लागणारा सर्व प्रकारचा माल एकदम खरेदी करण्यामुळें खर्चांत बरीच बचत होते. सर्वांचें उत्पन्न व खर्च एकत्र होत असल्यामुळें कित्येक कुटुंबास पूर्वीपेक्षां जास्त चांगल्या रीतीनें राहतां येवं लागलें आहे. व्यसनांना नियमानें आळा घातला नसला तरी इतरजण अनाठायीं खर्च करीत नसतां आपणच तो कसा करावा या जाणीवेनें त्यांचीं व्यसनें आपोआप कमी होवूं लागली आहेत. आपले उत्पन्न आपल्यावर होणाऱ्या खर्चापेक्षां कमी राहूं नये म्हणून प्रत्येकजण जास्तीत जास्त काम करूं लागला आहे.

परस्परांत वाढलेला भ्रातृभाव व सहानुभूति हा परिवारापासून झालेला सर्वांत मोठा फायदा होय. सर्व कुटुंब प्रमुख दररोज सायंकाळीं एकत्र जमून सर्व प्रश्नांचा विचार करतात व एक मतानें निर्णय घेतात. परिवाराचें यश त्याच्या प्रमुखांच्या कुशल नेतृत्वावर अवलंबून आहे. परिवारानें घालून घेतलेले निर्बंध खुषीनें घालून घेतलेले आहेत. आवश्यक वाटल्यास परिवारांतून निघून जाण्याची पूर्ण मुभा असली तरी कुणींहि निघून जाण्याचा विचार तर करीत नाहींच पण इतर कुटुंबांत देखील परिवारास सामील होण्याची ईच्छा निर्माण झाली आहे व हेंच परिवाराच्या यशाचें गमक आहे.

देवरीगांव आकोला-आकोट सडकेवर आकोल्यापासून २० मैल व आकोटपासून ८ मैलावर शेगांव फाटचावर आहे.

GPN—J-221—DPM—14-11-61—8,000.

# अकोला जिल्हा

## ग्रामिण नभोवाणी केंद्र



REFBK-0028957